# निवडक लेख

[भाग २ रा]

९८३२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ९८२२

२३७

निबंध
१५।६।६०
९८२२

REFBK-0005715

नारायण गोविंद चापेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: /निबंध
क्रमांक ..१८८२.. नों. दि: १५।५।८०

# निवडक लेख

## [ भाग २ रा ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम ...... वि. निबंध
अनुक्रम ...... १८२२ दी. दि. १६।६।६०

नारायण गोविंद चापेकर

'एड्मंड बर्कचें चरित्र', 'पैसा', 'गच्चीवरील गप्पा', 'वैदिक निबंध',
'समाजनियंत्रण' इत्यादि पुस्तकांचे कर्ते व
कार्याध्यक्ष म. सा. परिषद्

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ५७१५

REFBK-0005715

चैत्र शु. १५ शक १८५४

3/2

मुद्रकः— सीताराम वासुदेव फडणीस, बी. ए,
'आर्यसंस्कृति-मुद्रणालय',
१९८ (१८), सदाशिव पेठ, टिळकरस्ता, पुणें नं. २

ह्या पुस्तकांतील लेखन शुद्धलेखनसमितीने ठरविलेल्या नियमानुसार असलेलें वाचकांस आढळून येईल.

प्रकाशक :—नारायण गोविंद चापेकर,
बदलापूर, जि. ठाणे.

... संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ विः ...निबंध
क्रम ...१०२२... नोंद दि: ...१६।६।६०

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

ह्या पुस्तकांत एकंदर २२ लेखांचा संग्रह केला आहे. गेल्या पंचवीस वर्षांत वेळोवेळीं लिहिलेल्या लेखांचें संकलन करून प्रसिद्ध करण्याची कल्पना कांही प्रेमळ मित्रांनी सुचविली. व ती मला पटलीहि. पण महाराष्ट्रांतील लेखकांची दैना माहित असल्यामुळे हा दगदगीचा, लुप्ताभिमानाचा व आंतबट्याचा व्यवहार करण्याकडे मनाची प्रवृत्ति होईना. नाटकें, कादंबऱ्या व शालोपयोगीं पुस्तकें ह्यांवाचून इतर मराठी पुस्तकांकडे बहुधा कोणाची धांव जात नाही. तेव्हा आपणच हौसेने लिहावें पण शिवाय छापखाना पहावा, पैसे खर्च करावे आणि ते वसूल करण्याकरता ऐपतदार स्नेह्यांच्या दाराशीं जाऊन त्यांस पुस्तक विकत घेण्याबद्दल आळवावें ही नामोशीची गोष्ट करण्यास कोणाला हुरूप असणार ? पण दैवयोगाने गणेश महादेव आणि कंपनीचे उत्साही मालक रा. वीरकर ह्यांनी पुस्तकप्रसिद्धीची जबाबदारी पतकरल्यामुळे मनांत योजिलेल्या कार्याला व्यक्त स्वरूप देतां आलें. रा. वीरकर यांनी छपाईचें काम वक्तशीर व उत्कृष्ट करून दिल्यामुळे त्यांचे आभार मानणें हें माझें आद्य कर्तव्य आहे.

ह्या पुस्तकांतील बहुतेक लेख ग्रंथमाला, विश्ववृत्त व विविधज्ञानविस्तार ह्या मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. फलज्योतिषावरील निबंध लोकशिक्षणांत प्रसिद्ध झाला असून वैदिकधर्मावरील चार लेख धर्मजागृति मासिकांत प्रसिद्ध झाले.[1] बाकीच्यांपैकी अनुक्रमें १ ते ४, ६–७ व १४ ते १७ हे लेख ग्रन्थमाला, विश्ववृत्त ह्या मासिकांत येऊन गेले आहेत. ह्याशिवाय जे राहिले ते सर्व विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध करण्यांत आले होते.[1]

मासिकांतील माझा पहिला लेख " शिकवावें कसें " हाच होय. ह्या[1] लेखसमूहांत वैदिक धर्मावर ४, चलनविषयक ५, परीक्षणात्मक ५ व बाकीचे इतर विषयांवर आहेत.[1] लेखांच्या योग्यतेविषयी अर्थातच निःपक्ष-

---

१ ह्या आवृत्तीत फेरफार केल्यामुळे हीं विधानें अर्थहीन झालीं आहेत.

पातानें अभिप्राय देणें मला शक्य नाही. त्याचा निर्णय वाचकांवरच सोंपविणें जरूर आहे. तथापि[१] चलनविषयक निबंध त्या विषयांतील विद्यार्थ्यांना अंशतः तरी उपयुक्त होतील असा भरंसा वाटतो.[१] त्याचप्रमाणे, आठवर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले वैदिकधर्मावरील लेख हिंदुसमाजघटनेचा विचार करणाऱ्या धुरीणांना सध्या बऱ्याच अंशानें उपकारक होतील अशी माझी खात्री आहे. ह्या लेखांत निर्दिष्ट केलेलीं मतें अश्रुतपूर्व असावींत असें वाटतें. निदान बुद्धिपुरःसर तरी मी ह्या लेखांनी निव्वळ प्रतिध्वनि काढलेला नाही. आमच्या आचारांना स्मृतिप्रामाण्य नसून सदाचार हाच प्रमाण आहे हें ह्या निबंधांत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. बाकीच्या निबंधांबद्दल विशेष लिहिण्याचें कारण नाही.

हे निबंध प्रसिद्ध करतांना मला कै. रा. विनायक कोंडदेव ओक यांचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. विद्यार्थी म्हणून माझ्यावर त्यांचा लोभ असे व माझें लहानपणापासून त्यांच्याकडे जाणें असे. त्यामुळे लेखनव्यवसायाचें प्रोत्साहन मला त्यांच्याकडून मिळालें. ह्या गोष्टीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें हाच एक त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्याचा अल्पसा मार्ग आहे. मनुष्य जात्या अनुकरणशील आहे. म्हणून विद्यार्थीदशेंत अनुकरणीय माणसांशीं निकट संबंध घडल्यास इष्ट परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. असो.

मराठीमध्ये निरनिराळ्या विषयांवर स्वतंत्र मोठी ग्रंथरचना खरोखर व्हावयास पाहिजे. पण अशा ग्रंथरचनेला अवश्य अशा फुरसुतीच्या अभावीं निबंधवजा लेखच सध्याच्या परिस्थितींत प्रसिद्ध होणें अपरिहार्य आहे. परिस्थिति झपाट्याने बदलत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. विश्वविद्यालयाचे पदवीधर मराठींत लिहूं लागले आहेत. सरकारी नोकरीचीं बंधनें ज्यांना नाहीत असेहि बरेच पदवीधर ह्यांपैकी आहेत; विश्वविद्यालयांत मराठीला ठाव मिळाला आहे तेव्हा आता विस्तृत व भरीव ग्रंथरचना प्रसवण्याची आशा करण्यास जागा झाली आहे. प्रस्तुत पुस्तक मात्र निर-

१ ह्या आवृत्तींत फेरफार केल्यामुळे हीं विधानें अर्थहीन झालीं आहेत.

निराळ्या विषयांवरील लेखांची खिचडीच आहे; ती मराठी वाचक वर्गाला रुचकर लागो म्हणजे झालें. अठरा धान्यांच्या ह्या कडबोळ्याचा निदान एवढा तरी फायदा असतो की, त्याचा अव्हेर सर्वस्वी होत नाही. विद्यार्थी, सामान्य वाचक, प्राचीन विद्याभ्यासक ह्यांपैकी कोणाच्या तरी अभिरुचीला ह्या पुस्तकांतील निबंध पात्र होण्याचा संभव आहे. सारांश, तरुण, होतकरू मंडळीला यत्किंचितहि ह्या पुस्तकापासून फायदा झाला तरी सुद्धा छपाई व्यर्थ गेली नाही असें समाधान मानून घेतां येईल.

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ति गणेश महादेव आणि कंपनीने स. १९२४ सालीं प्रसिद्ध केली. पहिली आवृत्ति संपल्यामुळे दुसरी आवृत्ति काढण्याचें मनांत आलें. ह्या पुस्तकांतील लेख विद्वानांकरता नाहीत; कारण ते तितक्या किंमतीचे नाहीत हें उघड आहे. तथापि विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग होण्याचा संभव आहे. ह्या आशेने निरनिराळ्या वेळी लिहिलेले हे किरकोळ लेख पुनः मुद्रित होत आहेत. शिवाय बाजारांत दमडीचीहि किंमत येण्या-सारखी नसली तरी मी आणि माझें ह्या दुकलीने पछाडलेला माणूस आपण आणि आपलें हींच काय तीं जगांत किंमतवान आहेत असें समजत असतो. हें मनुष्यस्वभावांतील व्यंग त्याला स्वस्थ बसूं देत नाही. आपण बाजारांत गेलों तर सर्व पदार्थांची किंमत कमी करतों; फार तर बरोबर करूं. परंतु स्वतःची योग्य ती किंमत ठरवणारा ह्या जगांत तरी दुर्मिळ. ह्याशिवाय हे लेख प्रसिद्ध करण्याचें दुसरें कारण देणें अशक्य आहे.

निरनिराळ्या लेखांच्या दरम्यान कालाचें अंतर बरेंच असल्यामुळे कित्येक ठिकाणीं विचारसंगति अथवा द्विरुक्ति होणें अपरिहार्य आहे. परंतु त्यामुळे लेखकाचें विचारविकसन समजण्यास साधन होत असल्याकारणाने किरकोळ फेरफार खेरीज करून सर्व लेख जसेच्या तसे छापले आहेत. हिंदुधर्माचें स्वरूप हा लेख ह्याच आवृत्तींत प्रथम घातला आहे. पहिल्या आवृत्तींतील बरेच लेख ह्या आवृत्तींतून कमी केले आहेत. परीक्षणें सर्व गाळलीं आहेत. परीक्षणांचें स्वतंत्र पुस्तक छापण्याचा विचार आहे. तसेंच ऐतरेयब्राह्मण-विषयक लेख "वैदिक निबंधां"त समाविष्ट केल्यामुळे प्रस्तुत आवृत्तींतून गाळले आहेत. त्याचप्रमाणे चलनविषयक निबंध "पैसा" पुस्तकांत घातल्याकारणाने ह्या आवृत्तींत आढळणार नाहीत. ह्या प्रमाणे ह्या आवृतीचें स्वरूप बरेंच पालटलें आहे. कायदा, सौंदर्य, समाजशास्त्राची तोंडओळख, मराठी भाषेचा फुलोरा वगैरे कांही निबंध ह्या आवृत्तींत अगदी नवीन आहेत.

ह्या पुस्तकाचे दोन भाग केवळ सोयीकरता केले आहेत.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों वि. ..................

## अनुक्रमणिका (भाग १ ला)


रामायण .... .... .... .... १

चरित्रनायकाच्या गुणांबरोबर दोषांचें वर्णन करावें कीं नाही ? ३२

फलज्योतिष .... .... .... .... ४२

स्नेह .... .... .... .... .... ५२

सौंदर्य.... .... .... .... .... ६५

समाजशास्त्राची तोंडओळख .... .... .... ७८

मराठी भाषेवरील सावट .... .... ... ८८

मराठी भाषेचा फुलोरा .... .... .... ११५

मराठी मासिकें .... .... .... .... १३९


## अनुक्रमणिका (भाग २ रा)


कायदा .... .... .... .... १६७

कोर्टसंचार .... .... .... .... १७७

वैदिक धर्म ( लेखांक १ ला ) .... .... .... २०२

,, ( लेखांक २ रा ) .... .... .... २१३

,, ( लेखांक ३ रा ) .... .... .... २२५

,, शूद्राविषयीं विवेचन ( लेखांक ४ था ) .... २३९

,, हिंदूंच्या धर्माचें स्वरूप ( लेखांक ५ वा ) .... २४९

संतांची कामगिरी .... .... .... .... २५७

शिकवावें कसें ? .... .... .... .... २६५

सरकारी खर्चाचें स्वरूप .... .... .... २८२

अंदाजपत्रकें .... .... .... .... ३०२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
निबंध
१९२२ १५५५०
दा. क्र. ६८७५

# कायदा

मराठी भाषेंत कायदा हा परकी शब्द आता अगदीं रूढ होऊन बसला आहे. मुळचा तो म्लेंच्छ भाषेंतील शब्द आहे. आमचा शब्द वापरावयाचा असेल तर धर्म हाच शब्द वापरला पाहिजे. धर्मशास्त्र या सारखा अभिजात शब्द सोडून कायदेशास्त्र हा धेडगुजरी अथवा अकरमाशा शब्द सध्या आपण वापरीत असतों. या दोन शब्दांच्या अर्थांत त्यांच्या स्वभावानुरूप जमीन अस्मानाचें अंतर आहे. कायदा म्हणजे आज्ञा अथवा वरिष्ठ माणसाने कनिष्ठ माणसाला केलेला हुकूम; उलट धर्म म्हणजे कर्तव्य. कायदा या शब्दाने कर्ता सूचित होतो पण धर्म शब्दाने फक्त कार्य ध्वनित होतें. कायदा करणारा त्याने केलेल्या कायद्याने अथवा नियमाने बद्ध नाही असा समज आहे. आणि तो ऐतिहासिक दृष्ट्या कांहीसा समर्थन करतां येण्यासारखा आहे. कारण कायदा करणाऱ्या राजाला कायदा नियंत्रित करूं शकत नव्हता असें आपण युरपच्या इतिहासांत पहातों. पण आमच्याकडील ऋषींची कल्पना निराळीच होती. “ कामात्मा विषमः क्षुद्रो दण्डेनैव निहन्यते, ” तसेंच “ धर्माद्विचलितं हन्ति नृपमेव सबांधवं. ” धर्माप्रमाणें म्हणजे कायद्याप्रमाणे न वागणाऱ्या राजाचा नाश होतो असें मनूने स्पष्ट सांगितलें आहें. आर्यांचा राजा कायदे करीत नसे. कायदे करणें हें त्याचें कामच नाही. कायद्याप्रमाणे प्रजेचें पालनकरणें हेंच त्याचें काम. “ प्रजा धर्मेण पालयन् ” ( हारीत ) “ चलतश्चैनान्स्वधर्मे एव स्थापयेत् ” ( गौतम )

राजाने कायदा म्हणजे धर्म काय आहे हें ब्राह्मणांपासून समजून घेऊन त्याप्रमाणे अंमलबजावणी करावयाची. “ ब्राह्मणो धर्मान्

प्रब्रूयात्" असें वसिष्ठ म्हणतो. संसाराविषयी निरपेक्ष असणाऱ्या ब्राह्मणांनी राजाला धर्म सांगावयाचा. धर्म म्हणजे राजाच्या मुखांतून लहरीच्या क्षणांत प्रसव पावणारा हुकूम नव्हे अथवा राजाचें बूड बळकट होण्याकरता काढलेलें फरमान नव्हे. समाजाची स्थिति व प्रगति ज्याच्या योगाने सिद्ध होईल तोच धर्म किंवा कायदा. बृहदारण्यकोपनिषदांत धर्म आणि सत्य हीं एकच म्हणून सांगितलें आहे. "यो वै स धर्मः सत्यं वै तत् तस्मात्सत्यं वदन्तमाहुर्धर्मं वदतीति धर्मंवा वदन्तम् सत्यं वदतीति"; जें बावनकशी सत्य नाही तो धर्म नाही. त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होणार नाही. म्हणून सरकारने कायदा केलेला काय आहे इतकेंच पाहून भागणार नाही. तर तो कायदा कायदा या संज्ञेला पात्र आहे काय हें प्रथम तपासून पहावें लागतें. पण इकडेच सर्वांचें दुर्लक्ष होतें.

कायदा हा समाजाकरता असतो. राजाकरता नसतो. तो राजाने करावयाचाहि नसतो. राजाने प्रजेच्या संमतीशिवाय कायदे करणें आणि धन्याने आपल्या चाकराला हुकूम सोडणें यांत स्वरूपतः कांहीच भेद नाही. त्यांना धर्माचें स्वरूप कधीच प्राप्त होणार नाही. समाजाला अनुरूप कायदा समाजाने आपण होऊन करून घेतला पाहिजे. बाहेरच्या माणसाने लादलेला कायदा हा कायदाच नव्हे. या दृष्टीने विचार करतां लोकांचे प्रतिनिधी नसलेल्या धारासभांत पूर्वी सरकारने जे कायदे केले ते सर्व बेकायदेशीर कायदे होत. जुने सर्व कायदे सरकारने पुनः आजच्या कौन्सिलांकडून पास करून घेतले पाहिजेत. इंग्लिश लोक जोंपर्यंत हिंदुस्थानांत कायमचे रहिवासी झाले नाहीत तोंपर्यंत ते हिंदी समाजाचे घटक होत नाहीत. आणि म्हणून परकी लोकांनी केलेले कायदे कायदेशास्त्राप्रमाणे बातलच मानले पाहिजेत.

मराठीमध्ये आजपर्यंत कायदेशास्त्रावर कोणी लिहिलें नाही ही जशी आश्चर्याची तशीच खेदाची गोष्ट आहे. कायद्याच्या तत्त्व-

ज्ञानाचा अभ्यास आम्ही केला नाही. त्यामुळे आमच्याइकडे कायदा समजणारीं माणसेंच नाहीत. ज्याचें हित त्यानेच पाहिलें पाहिजे. परक्याला त्यामध्ये हात घालतांच येत नाही. एकाचें हित दुसऱ्याला कसें समजणार ? स्वार्थ साधणारा माणूस परहिततत्पर कसा असूं शकेल ? त्याचा स्वार्थ आड आल्यावांचून राहणार नाही. धर्माचे नियम घालून देणाऱ्या प्राचीन ऋषींना स्वार्थ यत्किंचितहि साधावयाचा नसे. म्हणून इंग्लंडहून येणाऱ्या साहेबाचें मत हिंदी कायदा करतांना विचारांत घेणें मूर्खपणाचें आहे. सरकारी नोकरांना विशेषतः परकी नोकरांना कायदेकौन्सिलांत मतें देण्याचा अधिकार असतां कामा नये. अशा मतांच्या जोरावर मंजूर झालेले कायदे बेकायदेशीर होत. लोकांच्या इच्छेंत कायद्याचा कायदेपणा असतो. समाजाचें कल्याण हाच मुख्यतः कायद्याचा हेतु असला पाहिजे. लोकांच्या स्वातंत्र्याचें नियंत्रण करणारे अधिकार राजाला कायद्याने देतात, नाही असें नाही; पण त्याने समाजाचें हित साधेल म्हणून. लोकांचा आपणांला पाठिंबा आहे असें भासविण्याचा प्रयत्न सरकारकडून हमेश केला जातो याचें कारण हेंच. कौन्सिलांत शिरणें म्हणजे सरकारचा हा प्रयत्न यशस्वी करून देणें होय. सर्व कायदे आपण तपासून पाहिले तर आपणांस असें आढळेल की, समाजाची सोय करणें, समाजाची स्थिति आणि उत्कर्ष हीं साधणें असें कांहीतरी प्रत्येक कायद्याचें कार्य असतें. या कसोटीला जो कायदा उतरणार नाही तो कायदा या संज्ञेसच प्राप्त होणार नाही. राजद्रोहाचा कायदा तर अगदींच निराधार असतो. प्रजेवर व प्रजेच्या मत्तेवर राजाची पूर्ण मालकी आहे असें मानलें तरच राजद्रोहाच्या कायद्याचें समर्थन करतां येईल. पण मग प्रजेच्या कल्याणाकरता निर्माण केलेली राज्यव्यवस्था असें कधींहि म्हणतां येणार नाही. एखाद्या जमीनदाराने आपल्या जमिनीच्या व्यवस्थेकरता गुलाम पाळावे याच स्वरूपाचा राजा आणि प्रजा यांचा तो संबंध होईल. तात्त्विक दृष्ट्या प्रजेनें राजाला राजा

बनविलें असें मानल्यावांचून गत्यंतर नाही. पूर्वीं जगांतील सर्व घटनेला शारीरिक बलाने प्रेरणा मिळत होती. पण सध्या पाशवी बलाच्या जागीं मानवी बुद्धि अथवा विवेकशक्ति अधिष्ठित झाली आहे. तेव्हा विचारशक्तीला जी व्यवस्था पटणार नाही ती कोणीही मान्य करणार नाही. जेथे कोणीहि राजा प्रजेवर शारीरिक सामर्थ्यावर अथवा सेनेच्या जोरावर राज्य करूं पाहतो तेव्हा त्या ठिकाणीं राजनीतिशास्त्र मूळ धरीत नाही. शास्त्राचा कांहीच उपयोग नाही. राज्यकर्त्याची लहर अथवा इच्छा यांतच सर्व नियंत्रणाचा उगम असतो. तेथे शास्त्राला कोण पुसणार? तेव्हा खरें म्हटलें असतां राजद्रोहाचा कायदा कोणत्याहि राष्ट्रांत असतां कामा नये. प्रजेची इच्छा तीच आपली इच्छा, असें मानून राज्यकारभार करणाऱ्या राजाला कोणापासूनहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं. इंग्लंडांत राजद्रोह कोणाच्या स्वप्नांतसुद्धा प्रकट होणार नाही. राजद्रोहाचा कायदा केलाच तर तो प्रजेच्या एकंदर प्रतिनिधींपैकी शेकडा ९० जणांनी अनुकूल मत दिल्याशिवाय करतां कामा नये. तसेंच शेंकडा २५ प्रतिनिधींना हा कायदा रद्द करावासा वाटेल तेव्हा तो रद्द करतां आला पाहिजे. वस्तुतः राष्ट्रद्रोहापुढे राजद्रोहाची कांही किंमत नाही. आपल्या पीनलकोडांतील १२४ अ हें कलम ज्यांना कांही अर्थ नाही अशा शब्दांनी बनविलेलें आहे. अशा अर्थशून्य शब्दांचें अवडंबर माजविणाऱ्या कलमाच्या आधारावर न्यायाधीश असंख्य लोकांस शिक्षा देत आहेत. हें सर्व अविवेकाचें फल होय.

खरा अथवा मुख्य कायदा म्हटला म्हणजे पीनलकोड होय. बाकीच्या सर्व कायद्यांना उपकायदे म्हणतां येईल. व्यक्तीव्यक्तींमधील व्यवहार चिरस्थायी व निश्चित स्वरूपाचे असावेत म्हणून सरकारास तत्संबंधी नियम करावे लागतात. कराराचा कायदा, स्थावर मिळकतीची देवघेव करण्याबाबतचा कायदा, दस्तैवज नोंदण्याविषयींचे कायदे हे सर्व एकाच वर्गांतले होत. व्यक्तीचे

व्यवहार पार पाडणें, हाच अशा कायद्यांचा उद्देश असतो. राज्य-व्यवस्थेच्या खर्चाकरितां कर बसवावे लागतात, म्हणून कायदे करण्याचा प्रसंग येतो. या सदरांत पुष्कळ कायदे पडतात. वारसा-संबंधांचे कायदे सरकार बहुधा आपण होऊन नवीन करीत नाहीं. या बाबतींत रूढीलाच महत्त्व दिलें जातें. लोकांनी आपण होऊन मागणी केल्यास नवीन कायदा सरकार करतें. लोकांचे व्यवहार सुरळीत व्हावे म्हणून केलेले कायदे हे विशेष महत्त्वाचे नसतात. सरकारचाहि त्यांत विशेष आग्रह नसतो आणि लोकांचीहि फारशी त्यांसंबंधी कुरकुर नसते. कायद्याचें स्वरूप विधिनिषेधात्मक असतें. करासंबंधीचे कायदे विधिरूप असतात. तुम्ही कर द्या, असें सरकार प्रजेस सांगतें. कर नाही दिल्यास मिळकत विकून तो वसूल करण्यांत येतो. याच्या उलट तुम्ही अमूक गोष्ट करूं नका असें सरकार बजावतें. याउपर ती कोणी केल्यास त्याने गुन्हा केला असें होतें व त्यास त्याबद्दल शासन करण्यांत येतें. हें आचरण समाजाच्या विरुद्ध होतें असें मानतात. कोणतें आचरण समाजाच्या विरुद्ध होईल याविषयी मतभेद होणें स्वाभाविक आहे. प्रत्येक व्यक्तीच्या प्रत्येक कृत्याचा परिणाम समाजांतील दुसऱ्या व्यक्तींवर होतो. हा समज जसजसा सर्वमान्य होईल तसतसें गुन्ह्याचें क्षेत्र विस्तृत होत जाईल. उदाहरणार्थ, दाराशीं अळूं लावणें हा पीनलकोडामध्ये घालण्याइतका गुन्हा समजला जाण्याचा संभव आहे. अळवाच्या योगाने हिंवतापाची सांथ उद्भवते, त्यामुळे गांवांतील लोक आजारी पडतात अथवा मरतातहि, म्हणून दाराशीं अळूं लावणें म्हणजे गुन्हा करणें होय. करूं नये तें केलें म्हणजे शिक्षा पाहिजेच. आमच्याकडे या सर्व गोष्टी पूर्वी धर्मांत पडत. हल्लीच्या आणि पूर्वीच्या कल्पनांत आणखी भेद आहे. करांची बाबत वगळली तर आज्ञेच्या स्वरूपाचा कायदा सध्या सरकार करीत नाही. पूर्वी या गोष्टीचा अन्तर्भाव धर्मशास्त्रांत होत असे.

प्रत्येकानें प्रातःकाळीं लवकर उठून स्नान करावें हें समाजाच्या हिताचें ठरलें तरी तसा कायदा करण्याचें धोरण तूर्त तरी कोणतेंहि सरकार पतकरीत नाही. कारण असा नियम प्रत्येकास पाळावयास लावणें सरकारच्या सामर्थ्यापलीकडे आहे. म्हणून प्रत्येक सरकार निषेधांवरच भागवितें.

विधीच्या बाबतींत सरकारी कायदे अपुरे पडतात. कारण विधि-नियमांची अंमलबजावणी करणें सरकारला शक्य नाही. पण समाजाच्या प्रगतीला निषिद्धाचरण न करणें याहिपेक्षा सदाचार पाळणें अधिक अवश्य आहे. एखाद्या समाजांत चोरी, शिनळकी, मद्यपान, भांडणतंटे वगैरे निंद्याचार कांही नसले तरी तेवढ्याने तो समाज उदयाच्या मार्गाला लागेलच असा नियम नाही. लोकांनी सत्क्रिया केलीच पाहिजे. समाजहितवर्धनाला अवश्यक त्या सर्व गोष्टी राष्ट्राने आचरणांत आणल्या पाहिजेत. या कामीं धार्मिक बंधनाचाच उपयोग विशेष होतो. यावरून धर्माकडे दुर्लक्ष करणें किती आत्मघातकीपणाचें आहे तें दिसून येईल. धर्माच्या हातून समाजाचें एक मोठें कार्य होत असतें. या गोष्टीचें महत्त्व लोकांना पटविलें पाहिजे. आरोग्यशास्त्राचे सिद्धान्त आमच्या धर्मांत समाविष्ट केले आहेत ते एवढ्याचसाठी.

सर्व कायद्यांत पीनलकोड हेंच काय तें मुख्य होय. त्याचा सूक्ष्म अभ्यास लोकांनी करणें अगत्याचें आहे. कित्येक गुन्हे दिवाणीस्वरूपाचे असल्यामुळे पीनलकोडांतून ते काढण्याची खटपट केली पाहिजे; तसेंच कैदेची शिक्षा व दंड अशा दोन शिक्षा एकाच गुन्ह्याला ठेवणें गैरशिस्त असल्यामुळे ही दुहेरी शिक्षा रद्द करण्याचे प्रयत्नहि लोकांनी करावयाला पाहिजेत.

कायदा हा सर्व समाजाकरता असतो हें खरें. तथापि केव्हा केव्हा समाजांतील कांही विशिष्ट वर्गाकरता म्हणून मुद्दाम कायदे करण्यांत येतात. एखाद्या वर्गाच्या संबंधानें अन्याय होत आहे, तो वर्ग नष्ट

होत चालला आहे, त्याला तगवणें हें सर्व समाजाच्या दृष्टीने हितावह आणि अवश्यक आहे अशी खात्री झाल्यावरच असल्या जातीचे कायदे करावे लागतात. उ. बायकांनी कारखान्यांतून काम करण्यासंबंधाने कायद्याने घातलेलें नियंत्रण. अशा कायद्याच्या मुळाशीं जें तत्त्व असतें त्यासंबंधी लोकांच्या स्पष्ट कल्पना पुष्कळ वेळां असत नाहीत असें आढळून येतें. वकिलांना किंवा न्यायाधिशांना कायदा नुसता समजून चालत नाही. कायद्याची मीमांसा करतां आली पाहिजे. बायकांना विशेष सवलती कां द्याव्या ? कारखानदार व स्त्रीकामगार यांमध्ये उघडउघड करार होतो त्या कराराप्रमाणे दोघांनी वागावें हा न्याय. असें असतां सरकारने मध्ये पडून झालेला करार रद्द कां समजावा ? आणि अमूकच करार करा, असा निर्बंध कां ठेवावा ? आपलें हिताहित बघण्याला स्त्रिया समर्थ नाहीत असें मानावयाचें काय ? मानावयाचें असेल तर ती गोष्ट समाजाने अगोदर जाहीर करावयास नको काय ? स्त्रीकामगारांच्या संबंधाने केलेला कायदा अपवादात्मक समजावयाचा की नाही ? या सर्व गोष्टींचा स्पष्ट खुलासा झाल्याशिवाय कायद्याची अंमलबजावणी नीट करतां येणार नाही. अपवादात्मक कायद्यांची व्याप्ति तेवढ्यापुरतीच मर्यादित करावी लागते. वाक्यांचे अर्थ करतांना कायद्याच्या बुडाशीं असलेलें तत्त्व विचारांत घ्यावें लागतें.

शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्याकरता म्हणून स. १८७९ सालीं एक कायदा मुंबई इलाख्याकरता करण्यांत आला. या कायद्यांतील सर्व कलमें मूर्खपणाचीं आहेतच, पण एका वर्गाला बुडवून दुसऱ्या वर्गाला तारण्याचा हा उपद्व्याप कोणत्या न्यायाने समर्थन करतां येईल ? जेथे लबाडी असेल तेथे व्यवहार निष्फळ ठरतोच; मग लबाडी नसतांना शेतकरीवर्ग सुधारण्याकरता सावकारांनीच फक्त का बुडावें ? शेतकरी सुधारणें अवश्य असेल तर या सुधारणेचा बोजा सर्व समाजाने उचलावयास नको काय ? शेतकरीवर्ग गरजू व अशि-

क्षित असल्यामुळे तो फसला जातो असें म्हणावें तर हें तत्त्व सर्वच अशिक्षित व गरजू लोकांच्या संबंधाने लागू कां करूं नये ? एखाद्या विशिष्ट वर्गासंबंधीचे कायदे फार दक्षतेने करावे लागतात. पण शेतखरीकायद्यांत सर्व हिंदुस्थानांतला मूर्खपणा एकवटलेला दिसतो.

कोणीहि मनुष्य त्याच्या जातीमुळे सरकारी नोकरीस नालायक ठरतां कामा नये. गव्हर्मेंट ऑफ् इंडिया ॲक्टचें कलम ९६ हेंच सांगतें. तरीसुद्धा सध्या सरकार ब्राह्मणांना ब्राह्मण म्हणून नोकरीस ठेवण्याचें नाकारतें. अशा रीतीने सरकारला आपण कायदा मोडूं देतां कामा नये. याबद्दल सरकारवर फिर्यादी होण्यासहि हरकत नाही.

आज अमलांत आहेत असे हिंदुस्थानसरकारचेच कायदे सुमारें २०० आहेत. याशिवाय प्रान्तिकसरकारचे निराळे. हें कायद्यांचे जाळें मनुष्याच्या व्यापाराबरोबर वाढतच राहणार. विमानें, बिनतारायंत्रें वगैरे निघाल्याबरोबर या नवीन शोधांस पोषक असे कायदे करावे लागले. मराठींत कित्येक कायद्यांचीं भाषान्तरें झालीं आहेत. कायदेशास्त्रावर तर कोणीच कांही लिहिलें नाही. कायद्याचीं भाषान्तरें क्लिष्ट झालीं आहेत यांत आश्चर्य नाही. त्यांतल्यात्यांत 'न्यायाश्रया' चीं भाषान्तरें कांही तरी वाचण्यासारखीं आहेत. 'न्यायाश्रया'कडून एकंदर ४२ कायद्यांचीं भाषान्तरें प्रसिद्ध झालीं आहेत. हिंदुधर्मशास्त्र व मुसलमानी शरा हीं पुस्तकें इंग्रजी न जाणणाऱ्या माणसाला समजतील अशीं आहेत. न्यायाश्रयकारांनी बरेच शब्द इंग्रजीच वापरले आहेत, हा जरी त्यांचा दोष नसला तरी ही खेदाची गोष्ट होय यांत संशय नाही. इंग्रजी न जाणणारे असंख्य लोक आहेत; त्यांच्यामध्ये न्यायाश्रयाचा फैलाव होईल तर कायद्याच्या वाङ्मयाला उत्तेजन येईल. कायद्याच्या ज्ञानाचा प्रसार खेडोखेडीं झाला पाहिजे. लोकांना कायदा अधिक कळूं लागेल तर कोर्टांतले दावे कमी होतीलच, पण शिवाय खालच्या दर्जाच्या सरकारी नोकरांच्या

अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य लोकांत उत्पन्न होईल. मुंबईच्या संग्रहालयांत लहानमोठ्या कायद्यांचीं ८९ पुस्तकें आहेत. मूळ कायदे मराठींतच लिहिले तर एतद्विषयक वाङ्मय झपाट्याने निर्माण होईल. मराठीचें भाषान्तर मग इंग्रजींत करावें. पण इंग्रजीचें मराठींत केलेलें भाषान्तर कांहीच समजत नाही. या म्हणण्याच्या समर्थनार्थ कांही पुस्तकांतले उतारे खाली देतों. ते वाचले असतां समजेल.

"ज्यावरून कोर्टांत फिर्याद आणली असतां चालेल, अशा करारांत खालीं सांगितलेले **गुण** अवश्य असले पाहिजेत.

**प्रकरण** १ परस्परांचें संमत
,, २ **वादीप्रतिवादींस** करार करण्याचा **अधिकार**
,, ३ कायदेशीर उद्देश
,, ४ **पुरतें कारण**
,, ५. कपटाचा अभाव
,, ६ कायद्यांत कांहीं विशिष्ट रीति सांगितल्या असल्यास त्या रीतींस **अनुसरून असणें**. (करारशास्त्र)

तोंडचें मृत्युपत्र लेखी मृत्युपत्राप्रमाणें **मजबूत** आहे. (क.९७.)

बायकोची चाल गैरशिस्त असल्याशिवाय अगर कोणतेहि कारणाशिवाय नवऱ्याने पाहिजे तर आपल्या बायकोस काडी मोडून द्यावी; परंतु **अधिक पसंत केलेल्या मताप्रमाणें**, नवराबायकोची सुटासूट कायम होण्यापूर्वी................(क. २०२.)

(मुसलमानी दिवाणी कायदा)

एखाद्या **दानाचें निरूपण** मृत्युलेखांत लिहिलें आहे, पण त्या निरूपणापैकी कांही **अंश** दानाकडे लागत नाही, असें असलें तर जें दान द्यावयाचा मृत्युलेख करणाऱ्याचा अभिप्राय होता तें दान

हेंच, असें त्या निरूपणावरून कार्यापुरतें स्पष्ट असल्यास निरूपणाचा जो अंश लागत नाहीं तो **अशुद्ध** समजून गाळावा व जें दान लिहिलें आहे तें अमलांत आणावें. (क. ६५.)

इसवी सन १८६५ चा आक्त दहावा."

यांसारखें लिखाण कोणाला तरी समजेल काय? या सर्वांला अपवाद म्हणजे रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनी लिहिलेलें बंगाल्यांतील जमीनदारी वहिवाट हें पुस्तक होय. मराठी धर्मविषयक वाङ्मयांत पहिलें व शेवटलें असें हें एकच पुस्तक होय.

राष्ट्रीयशाळांतून कायदा हा विषय अवश्य ठेवला पाहिजे. कायद्याचें ज्ञान हें एक राष्ट्रीयत्वाचें प्रमुख अंग मानलें जातें. कायद्याचीं मूलतत्त्वें प्रत्येकास अवगत असलीं पाहिजेत; परंतु आमच्या राष्ट्रीयपक्षाला याचें महत्त्व अद्यापि पटलेलें दिसत नाहीं. या लेखाने कायद्याच्या विषयाकडे सर्वांचें लक्ष लागावें अशी इच्छा आहे पण आशा मात्र नाहीं.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम........ वि: निबंध
... ९८२२ ... दि. २५५५६०

# कोर्टसंचार

ह्या देशांत इंग्लिशांचा अंमल सुरू झाल्यापासून राज्यव्यवस्थेंतील इतर अंगांप्रमाणे न्यायपद्धतिसुद्धा इंग्लिश धर्तीवर चालू झाली आहे. ह्या पद्धतीची आपणांस इतकी सवय झाली आहे की, ह्याव्यतिरिक्त दुसरी एखादी पद्धति असणें शक्य आहे कीं नाही, आणि असल्यास तिच्यांत जास्त चांगुलपणा असेल कीं नाही ह्याची प्रत्येकास शंका येत असते. परंतु दुरभिमान सोडून क्षणभर सूक्ष्म विचार केल्यास प्रचलित पद्धति सदोष आहे हें कबूल करणें प्रत्येकास भाग पडेल असें आम्हांस वाटतें. त्याचप्रमाणे अर्वाचीन पद्धतीहून भिन्न अशाहि पद्धति पूर्वी होत्या व सांप्रत आहेत हें इतिहासज्ञांस सांगण्याची जरूर नाही.

फार प्राचीन काळीं न्यायाचें काम कोणत्या रीतीने चालत असे ह्याचें थोडेंबहुत अनुमान स्मृतींवरून—विशेषतः नारदस्मृतीवरून—करतां येण्यासारखें आहे. ह्यांत निर्दिष्ट केलेले कानू अर्वाचीन कानूंशीं बऱ्याच अंशाने जुळण्यासारखे आहेत. त्याचप्रमाणे मृच्छकटिकांतील खुनाबद्दल चारुदत्ताची चौकशी करणारा न्यायाधीश हल्लीच्या हायकोर्टांतील खुर्चीवर बसण्यास अगदीच अपात्र होता असें म्हणतां येणार नाही.

अलीकडे म्हणजे मुसलमानी किंवा मराठ्यांच्या अमदानींत न्यायपद्धतीचें स्वरूप काय होतें ह्याची सविस्तर माहिती अद्यापि उपलब्ध नाही ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन करीत असतां एतद्विषयक जुने लेख प्रसिद्ध कां होऊं नयेत हें समजत नाही. ह्या संशोधकांत कोणी कायदेपंडित नाही हें एक त्याचें कारण असूं शकेल. खरें म्हटलें तर असले

कागद संरक्षण करून ठेवण्यांत प्रत्येकाचें हित असल्यामुळे ते मिळण्यास फारशी अडचण पडूं नये. जुने ठराव, समान वगैरे थोडेबहुत कागद जे आमच्या पाहण्यांत आले आहेत त्यावरून ह्या दिशेने प्रयत्न करणारांस फार अडचण पडेल असें आम्हांस वाटत नाही. असो. एवढें मात्र निश्चित की, कोणत्याहि खटल्याचा निकाल ग्रामाधिकाऱ्याकडून पूर्वी होत असे. एकाहून अनेक असे अभिज्ञ ग्रामाधिकारी, गांवांतील इतर सभ्यगृहस्थांच्या मदतीने गांवांतील तंट्याचा निकाल करीत. हे निकाल हल्लीच्या कोर्टांच्या निकालांहून अधिक समाधानकारक असले पाहिजेत ह्यांत संशय नाही. कायद्याने जखडलेल्या, तीन तीन वर्षांनी स्थानांतर पावणाऱ्या अनभिज्ञ अशा हल्लीच्या भाडोत्री न्यायाधिशाकडून खरा न्याय मिळणें मुष्किलीचें झालें आहे.

ग्रामसंस्थांची रचनाच अशी असे की, त्यांत अन्याय होण्याची भीति फार कमी असे. न्यायाचें काम अनेकांच्या हातीं असल्यामुळे पक्षपातीपणा होण्याचा संभव कमी असे. त्याचप्रमाणे गांवांतील लोकांची व त्यांच्या भांडणाची माहिती असल्याकारणाने त्यांच्या ठरावांस एकप्रकारचा भारदस्तपणा येई. अशा स्थितींत न्याय करण्याची पात्रता अंगीं येण्यास फारशी विद्वत्ता पाहिजे असेंहि नाही. कोणत्याहि सामान्य बुद्धीच्या माणसास परस्परांतील तंटे तोडण्यापुरती शक्ति असते. कायद्याची व्याख्या अरिस्टॉटलने केली आहे त्यावरूनहि हेंच सिद्ध होतें. तो म्हणतो मनोविकारांनी ग्रस्त न होतां केलेला जो सारासारविचार तोच कायदा : Law is reason without passion. अमेरिकेंत न्यायाधिशास येण्यास विलंब लागल्यास कोर्टांत हजर असलेल्या कोणत्याहि मनुष्यास दोन्ही पक्षकार न्यायाधिशाच्या खुर्चीवर बसावयास सांगून त्याच्याकडून आपल्या तंट्याचा निकाल लावून घेतात. ह्यावरून वरील म्हणण्यास बळकटी

येते. सारांश, खरा न्याय मिळण्याचा संभव मागील पद्धतींत जितका होता तितका हल्लीच्या पद्धतींत दिसत नाही.

ग्रामाधिकाऱ्यांशिवाय निरनिराळ्या ठिकाणीं पूर्वी न्यायाच्या कामीं मुद्दाम माणसें नेमलेलीं असत. मुख्य न्यायाधिशाशिवाय बाकीच्या खालच्या न्यायाधिशास न्यायाधिशाकडील कारकून असेंहि म्हणत असें वाटतें. शिवाय पेशव्यांकडे तंटा गेला असतां ते त्या विशिष्ट कामाचा निकाल करण्यासाठी मुद्दाम एखादा माणूस नेमीत असेंहि इतिहासावरून दिसून येतें. मुसलमानी अमदानींतील फारशी शब्द सांप्रतही कोर्टांतून वापरले जातात. उदाहरणार्थ, सदरअमीन, मुन्सफ, निशाणी, कैफियत, तकरार, फैसला इत्यादि. ह्या शब्दांवरुनसुद्धा न्यायाचें काम पूर्वी कसें चालत असे ह्याची अंशतः कल्पना करतां येईल.

न्यायगृहें, न्यायाधीश, वकील, पक्षकार, साक्षी आणि कायदा इतके हल्लीच्या न्यायपद्धतीचे घटकावयव होत. अर्थात् हे सर्व घटकावयव ज्या प्रमाणाने चांगले असतील त्या प्रमाणाने खरा न्याय मिळण्याचा संभव जास्त. परंतु असा योग क्वचित्‌च घडत असल्यामुळे सत्य बाहेर येणें दुर्घट झालें आहे.

१ प्रथमतः न्यायगृहांचा आपण विचार करूं. न्यायगृहांच्या रचनेचा पुढे होणाऱ्या निकालावर परिणाम घडतो हें वाचून पुष्कळांस आश्चर्य वाटेल व मानसशास्त्रानभिज्ञ लोकांस असें वाटणें साहजिक आहे. ह्या इलाख्यांतील अधिकारीहि अशा लोकांहून निराळ्या मनोवृत्तीचे आहेत असें मानण्यास कारण नाही. कारण कित्येक जिल्ह्यांतील कोर्टें इतकीं घाणेरडीं आहेत की, तेथे गेल्यावर तेथून केव्हा निघेन असेंच जाणारास झालें पाहिजे. पुष्कळ ठिकाणीं तर सरकारी कोर्टें बांधलेलीं नाहीत. अशा स्थळीं कचेरीच्या सोईची इमारत नसल्याने इमारतीच्या सोईने कचेरीचें काम करण्याचा प्रसंग येतो. न्यायदेवतेच्या पदकमलांचे एकनिष्ठ सेवक

म्हणूनच कीं काय न्यायालयांत न्यायाधिशास व इतरांस नम्रतापूर्वक वांकून चालावें लागतें. त्याचप्रमाणे प्राचीन स्टोईक (सर्वसह) तत्त्ववेत्त्यांचे पट्टशिष्य बनविण्याकरिताच जणू काय न्यायाधिशाच्या दृष्टीसमोर मलिन साहित्य व देखावा पडेल अशी खबरदारी घेतलेली असते. कोर्टांत बसण्यास जागा नाही एवढ्याच कारणाकरिता त्या कोर्टांत वकिली करण्याची परवानगी देतां येत नाही असा शेरा होतकरू वकिलांच्या अर्जावर मारण्याचा प्रसंग कित्येक डिस्ट्रिक्ट जज्जांस येत असेल. सूर्य आपलें तेज फाजील फांकतो अशा समजुतीनेच की काय प्रकाशहीन अशा कांही न्यायगृहांतून काच बसवून नेमस्त प्रकाश कृत्रिम उपायांनी फक्त न्यायाधिशाच्या टेबलापुरता घेतलेला असतो. अशा कोर्टांत बसण्याचा प्रसंग आल्याने बसणाराचा उत्साहभंग होतो व त्यामुळे त्याच्या हातून उत्कृष्ट काम होण्यास विघ्न येतें. ह्या उघड गोष्टीकडे अद्यापि दुर्लक्ष कां केलें जावें समजत नाही. मन जर आनंदित नसेल तर महत्त्वाचीं कामें उरकण्यास अवश्य जी एकाग्रता ती असूं शकत नाही. न्यायखात्यापासून एकंदरींत फायदा असतां असलीं जुनाट भाडोत्री कोर्टें अद्यापि रहावीं हें आश्चर्य आहे.

कोर्टांच्या ज्या नवीन इमारती सरकारने बांधल्या आहेत त्याहि सर्व सोईच्या व सशास्त्र आहेत असें नाही. प्रथमतः ह्या इमारती फार लहान बांधल्या गेल्या आहेत; म्हणजे चेम्बर, काम चालतें ती जागा, वकिलांची खोली इत्यादि कांही भाग जास्त विस्तृत असावयास पाहिजेत. नैसर्गिक अवश्यकतेच्या सोयीहि पुष्कळ ठिकाणीं असत नाहीत. खुर्च्या, जाजमें, टेबलें, गाद्या, लोड इत्यादि सामान स्वच्छ, सुंदर व नवीन फारच थोडक्या कोर्टांच्या नशिबीं येतें. ह्या बाबतींत डिस्ट्रिक्ट जज्जांचे सल्लागार डिस्ट्रिक्ट कोर्टांतील नाझर ह्यांस जबाबदार धरणें गैरवाजवी होणार नाही. नाझर, शिरस्तेदार, हेडक्लार्क हीं माणसें अशिक्षित असल्यामुळे कोत्या मनाचीं असतात.

परंतु त्यांच्या शिक्षणाच्या मानाने त्यांच्याकडे जो अधिकार असतो तो फार मोठा असतो; तेव्हा तो अधिकार त्यांस नीट बजावतां आला नाही तर त्यांत कांही आश्चर्य नाही. गादी, तक्या, जाजम वगैरे सामान स्वच्छ असेल तर कारकुनांच्या हातून काम जास्त होण्याचा संभव आहे हें समजण्याइतकें परिपक्व मन ह्या शिक्षणहीन पण अधिकारसंपन्न माणसांचें नसतें. युनिव्हर्सिटी पदवीधर मिळत असतां जाणून बुजून अशा माणसांस इतक्या महत्त्वाच्या जागीं नेमणें कोणत्याहि दृष्टीने श्रेयस्कर नाही. सारांश सांगावयाचा इतकाच की, न्यायाचें काम फार विचाराचें व गांभीर्यपूर्वक करावयाचें असल्यामुळे अशा मनोवृत्ति जेथे उचंबळतील अशींच कोर्टगृहें बांधणें अत्यंत अवश्यक आहे. निवांत जागीं, जलप्रवाहासंन्निध व प्रच्छायस्थलीं बांधलेल्या देवालयांत जातांच ज्याप्रमाणे नास्तिकाच्या मनांतहि क्षणभर भक्तिप्रसव झाल्याविना रहात नाही त्याप्रमाणे विचारप्रगल्भता व गांभीर्य ह्यांचा जेथे उद्भव होईल अशीं कोर्टगृहें असणें अगत्याचें व फायद्याचें आहे. सर्व साहित्य नीटनेटकें व व्यवस्थित असल्याकारणाने एकाग्रचित्ताने काम करतां येत नाही अशी कुरकुर कोणाची असत नाही; परंतु ह्याच्या उलट स्थिति असतां मात्र ज्यांचें लक्ष कामाकडे असत नाही अशीं पुष्कळ माणसें आढळतात. हा मनुष्यस्वभाव ध्यानांत आणून कोर्टगृहें सुधारणें इष्ट आहे.

२ वर निर्दिष्ट केलेल्या घटकावयवांपैकी न्यायाधीश हा दुसरा घटक होय. ह्या लेखांत सिंध वजा करून मुंबई इलाख्यांतील न्यायपद्धतीचाच, आणि तोहि विशेषतः दिवाणी न्यायपद्धतीचा विचार चालला आहे ही गोष्ट वाचकांनी ध्यानांत ठेवावी. निव्वळ मराठी जाणणारे न्यायाधीश हल्ली कोणीहि राहिले नाहीत. कोर्टांच्या एकंदर तीन पायऱ्या आहेत. कनिष्ठ प्रतीचीं कोर्टें म्हणजे मुन्सफ कोर्टें होत. मुन्सफांचे दोन वर्ग करतां येतील. एक युनिव्हर्सिटी पदवीधरांचा

व दुसरा हायकोर्टाची परीक्षा पास झालेल्यांचा. हल्ली दरवर्षीं एल्‌एल्‌. बी. पुष्कळ होत असतां मुन्सफीची परीक्षा अद्यापि कायम ठेवण्यांत हायकोर्टाचा काय हेतु आहे समजत नाही. न्यायाधिशाचें काम करणाऱ्या इसमास शिक्षणसंस्कार नसला तरी चालतो असें मत हायकोर्टांतील जज्जांचें असल्यास न कळे. एल्‌एल्‌. बी. होण्याच्या पूर्वी चार वर्षे जें युनिव्हर्सिटींत शिक्षण मिळतें तें अगदी निरुपयोगी समजावयाचें की काय ? विविध प्रकारच्या मनुष्यस्वभावाचें पूर्णज्ञान, बालिश मनोवृत्तींपासून सुटका, गांभीर्य इत्यादि अनेक गुण न्याय करणाराच्या अंगीं असणें अवश्य आहे, व हे गुण शिक्षणाने मन संस्कृत झाल्यावांचून सहसा यावयाचे नाहीत. कांही व्यक्ति अशा असूं शकतील हें खरें, पण त्या नियमाला केवळ अपवाद होत.

मुन्सफांना प्रथमतः १५० रुपये पगार देण्यांत येतो. हा पगार त्यांच्या कामाच्या मानाने फारच कमी आहे. ह्या बाबतींत त्यांची पिछेहाट झाली आहे. कारण पूर्वी २०० वर त्यांचा आरंभ होत असे. मुन्सफांत ओरड करणारे कोणी नसल्या कारणाने त्यांचे पगार वाढण्याच्या ऐवजी कमीच झाले. न्यायखात्यांतील लोकांची स्थिति चांगली नसते अशी इंग्रेजी पत्रांनी ओरड करतांच हायकोर्ट-जज्जांचे व डिस्ट्रिक्ट-जज्जांचे पगार वाढविण्यांत आले. पण मुन्सफांकडे मात्र कोणाचेंच लक्ष गेलें नाही. एकंदर न्यायपद्धतीचे मुन्सफ हे घटकावयव नाहीत काय ? मुन्सफांस जितक्या संकटांतून काम करावें लागतें तितकें कोणालाच करावें लागत नसेल. परकी भाषा, सटीक पुस्तकांचा अभाव व निष्णात आणि कार्यदक्ष वकिलांची दुर्मिळता इतक्या अडचणी सोसूनहि त्यांच्या हातून जें काम होतें तें खरोखर वर्णनीय आहे. लॉ रिपोर्ट चाळले असतां असें दिसून येईल की, डिस्ट्रिक्ट-जज्जांपेक्षा मुन्सफांचेच निकाल हायकोर्टास अधिक पसंत पडले आहेत. असें असतां हायकोर्ट-जज्जांचे व

डिस्ट्रिक्ट-जज्जांचे पगार वाढविले तेव्हा मुन्सफांचे पगार कां वाढविले जाऊं नयेत हें समजत नाही. अथवा आहेत हेच पगार फार मोठे आहेत असें तर वाटत नाहीना ? निस्पृहपणाने आणि मान्यतेने वागतां येण्यास अधिक पगार असणें जरूर आहे.

डिस्ट्रिक्ट-जज्जांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे खालील कोर्टांनी केलेल्या निकालांवर झालेल्या अपिलांची चौकशी करणें हें होय. डिस्ट्रिक्ट-जज्जांच्या नेमणुका अत्यंत असमाधानकरक रीतीने केल्या जातात असा लोकापवाद आहे. लोकांच्या रीतिरिवाजांची ज्यांस माहिती नाही, कायद्यांचें अध्ययन ज्यांनी फारसें केलेलें नाही अशांनी कायद्याच्या परिक्षेंत पास झालेल्या एतद्देशीय अशा मुन्सफांनी केलेल्या निकालांची चौकशी करणें हें लोकांच्या मनास पटत नाही. हे लोक प्रथम काम करावयाला लागतात तेव्हा त्यांस अनुभव नसल्यामुळे त्यांच्याकडून समाधानकारक काम होणें अर्थातच शक्य नाही. कुटिल वादीप्रतिवादींस अशा न्यायाधिशांकडून फायदा होण्याचा संभव असतो. सहा महिने काम केलें नाही तोंच असिस्टंट जज्जांना अपिलांचा अधिकार देण्यांत येतो. ह्या पद्धतीचा प्रतिकार अद्यापि कोणाकडून होत नाही ही दुःखाची गोष्ट आहे. अस्सल काम कांही वर्षे केल्यावांचून अपिलाचें काम करतां येणें अशक्य आहे. कागदांवरूनच अपील कोर्ट न्याय्यान्याय्यतेचा विचार करणार. पण खालील कोर्टाचा जो ठराव असतो तो होण्यास कागदांत आलेल्या गोष्टींशिवाय इतर अनेक गोष्टी कारणीभूत होत असतात, ह्याचा अनुभव सहा महिन्यांच्या कामाने येणें संभवनीय नाही. एक उदाहरण दिलें असतां हें म्हणणें जास्त विशद होईल. समजा वकिलाने साक्षीदाराला ह्या बाईचा धंदा ( बाई व्यभिचारिणी आहे असें समजून ) काय ? असा प्रश्न केला. साक्षीदार ताबडतोब उत्तर देतो "ईश्वरास माहीत." हा जबाब लिहून घेतला जात नाही. शिरस्तेदार किंवा वकील पुन्हा साक्षीदारास विचारतो, "अरे, तुला

काय ठाऊक असेल तें सांग." साक्षीदार ( व्यभिचारिणी आहे हें सांगण्यास नाखुष होऊन ) पुन्हा उत्तर देतो "ती काय धंदा करते हें मला माहीत नाही." हेंच उत्तर जबानींत लिहून घेतलें जातें. झालें. सर्व साक्षदारांच्या जबान्या ह्याप्रमाणे होतात. कोणताहि साक्षीदार ती व्यभिचारिणी स्त्री आहे असें म्हणतो असें जबानीवरून दिसून येत नाही. तथापि "ईश्वराला ठाऊक" ह्या साक्षीदाराच्या तोंडांतून निघालेल्या प्रथमोद्गारांनी न्यायाधिशाच्या मनावर ती स्त्री व्यभिचारिणी असली पाहिजे असा ठसा उमटतो व कज्जाचा निकाल विशिष्ट रीतीने होण्यास तो ठसा कारणीभूत होतो. परंतु ह्याचें अपिलांतील जज्जास काय होय ? तो खालच्या कोर्टाचा ठराव चुकीचा व पुराव्याला धरून नाही म्हणून शेरा मारणार.

कांही वेळां तर कोर्टांत पक्षकारांची हालचाल व वायफळ बोलाचाली होते त्यावरूनसुद्धा न्यायाधिशाचा ग्रह बनतो. तसेंच साक्षीदाराच्या अथवा पक्षकाराच्या चेहेऱ्यावरून (वर्तनावरून नव्हे) त्याचें इंगित जाणतां येतें. परंतु तें कागदावर आणण्यास कांही मार्ग नाही. ह्या सर्व कारणांचा विचार करून अनुभवी व पोक्त न्यायाधीश खालच्या कोर्टाने काढलेल्या अनुमानांत ढवळाढवळ सहसा करीत नाहीत.

पुराव्यावर फक्त जो ठराव केला गेला असेल त्यावर दुसरें अपील हायकोर्टांत नाही हें एक कायद्यांत मोठें व्यंग आहे. खालच्या कोर्टाचा व पहिल्या अपील कोर्टाचा पुराव्यासंबंधी एकच अभिप्राय पडला असतां हायकोर्टाने मध्ये पडूं नये हें ठीक आहे, परंतु जेथे दोन्ही कोर्टांचे अभिप्राय भिन्न असतील तेथे हायकोर्टाकडे अपील चालणें अगदी अवश्य आहे. गृहीत गोष्टींवरून अप्रयोजक अनुमानें काढिलीं असतील तर तो कायद्याचाच प्रश्न समजला गेला पाहिजे असें नेहमी मानलें जात नसल्यामुळे पुष्कळांना कधी कधी नुकसान सोसून गुपचुप बसणें भाग पडतें.

न्यायाधिशास विशिष्ट झगा घालून कोर्टांत बसावयास लावणें हें इंग्लिश लोकांच्या पुराणप्रियतेचें चांगलें द्योतक आहे.

पक्षकारांस खरा न्याय मिळणें ह न्यायाधिशाच्या शहाणपणावर फार अवलंबून आहे. तथापि एवढें सांगून भागत नाही. न्यायाधीश कसा असावा हें सांगणें कठीण आह व जसा असावा तसा तो मिळणें हें तर अगदीच अशक्य आहे. तो अतिशय चलाख, धूर्त अगर शहाणा असला तरी त्याच्या हातून खरा न्याय मिळण्याचा संभव नाही. अथवा तो थंड अगर मतिहीन असेल तरीहि तीच स्थिति. कारण धूर्त मनुष्याच्या मनांत वारंवार ज्या कल्पना येतात त्यांस वस्तुतः अस्तित्वच नसतें. उलटपक्षीं न्यायाधिशाच्या ठिकाणीं बुद्धिमांद्य असेल तर लोकांच्या खटपटीचें आकलन त्यास करतां येणार नाही. खरें पाहतां ज्या लोकांचा न्याय करावयाचा असतो त्यांच्या समतोल बुद्धीचा व मनोवृत्तींचा न्यायाधीश असला पाहिजे. परंतु हें घडावें कसें ? आणि पुढे येणाऱ्या सर्व लोकांची बुद्धि एकाच अंशावर असणार कशी ? साधारण बुद्धीच्या माणसास जें वाटेल तें खरें असा सर्वत्र समज आहे व त्यास कायद्यांतहि मान मिळाला आहे. परंतु जगांमध्ये असाधारण बुद्धीचीं आणि न्यून बुद्धीचीं माणसें असतील व असतात तेव्हा ह्या म्हणीची वाट काय? तात्पर्य; खरा न्याय मिळण्यास विघातक गोष्टी फार आहेत.

त्याचप्रमाणे निरनिराळ्या न्यायाधिशांच्या कमजास्त अनुभवामुळे त्यांचे निकाल बरेवाईट होतात हें उघड आहे. न्यायाधिशांच्या ह्या नैसर्गिक व म्हणूनच अपरिहार्य उणीवांचें फळ लोकांस सहन करावें लागतें. उदाहरणांनी हें विवेचन जास्त स्पष्ट करूं. वादीने पैसे मागण्याचा खतावरून दावा आणला. लिहितां वाचतां येत नसल्यामुळे खतावर प्रतिवादीच्या सहीचा दस्तुर दुसऱ्याने केलेला आहे. पुढे कोर्टांत प्रतिवादी येऊन तक्रार करतो की, मी दस्तऐवज लिहून दिला नाही. मला सही करतां येते व तो आपली सही

करूनहि दाखवितो. जगांतील कुटिल व्यवहारांचा फारसा अनुभव नसलेल्या नवीन न्यायाधिशास प्रथमतः प्रतिवादीचें म्हणणें खरें वाटल्याशिवाय राहणार नाही. व वादींने लबाडीने खोटा दस्त केला आहे असाहि पण त्याचा ग्रह होईल. हा ग्रह नाहीसा करण्याकरिता वादीस फार त्रास पडेल व अखेरीस यश येईलच असा नियम नाही.

आता दुसरा अनुभवी न्यायाधीश घ्या. कोर्टांत फिर्याद लागल्यावर खोटी तक्रार करितां यावी म्हणून कांही लोक मुद्दाम सही करावयास शिकतात. ह्या गोष्टीचा ज्यांस अनुभव असेल ते न्यायाधीश प्रतिवादीच्या तक्रारीस फार महत्त्व देत नाहीत. इतर पुराव्यावरून शाबीत झाली तरच ते ती तक्रार खरी मानतील. परंतु ह्या अनुभवाचा फायदा वादीस मिळतो. तेव्हा पक्षकारांचें नफानुकसान न्यायाधिशाच्या अनुभवजन्य ज्ञानावर अवलंबून आहे हें उघड आहे. प्रत्येकाच्या अनुभवामध्ये अंतर असणें अपरिहार्य असल्यामुळे खरा न्याय मिळण्यास व्यत्यय येतो.

परंतु येवढ्यावरच संपत नाही. अशा रीतींने झटपट सही करावयास शिकून खोटी तक्रार करण्याची कर्तबगारी सर्वांतच नसते. म्हणून अशा रीतीने खोट्या तक्रारी लोक करतात ह्या अनुभवाचा उपयोग न्यायाधिशाने सर्वत्र करतां कामा नये. आपल्यासमोर उभा असलेल्या मनुष्यांत अशी धूर्तपणाची तक्रार करण्याइतकी अक्कल आहे काय तें त्याने त्याच्या चेहऱ्यावरून सूक्ष्मपणें निरीक्षण करून ठरविलें पाहिजे. ह्यावरून न्यायाधिशाच्या अंगच्या शहाणपणाचा उपयोग पक्षकारांस किती होतो ह्याची थोडीबहुत कल्पना होईल.

दुसरें एक मासलेवाईक उदाहरण देऊं. मी आपली दागिन्यांची पेटी प्लेगच्या दिवसांत प्रतिवादीजवळ ठेवण्यास दिली; ती माझी मला परत मिळावी म्हणून एका बाईने कोर्टांत फिर्याद लाविली. प्रतिवादीने अशी तक्रार केली की, दागिने माझ्या स्वाधीन केले ही

गोष्ट खरी आहे. पण ते वादीनें केले नसून अने केले. वादी ही अची लग्नाची बायको नसून ठेवलेली आहे. त्यामुळे ती अची वारस नाही. करतां तिला दागिने मागण्याचा हक्क नाही.

मीच दागिने प्रतिवादीजवळ ठेवण्यास दिले, असें शाबीत करण्याकरता बाईने साक्षीदार दिले व आपल्या जबानींत असें सांगितलें की, प्रतिवादी कोणी साक्षीदार असल्यावांचून दागिने ठेवीना; म्हणून मी कांही लोकांस मुद्दाम बोलावून आणून त्यांच्यासमक्ष दागिने प्रतिवादीस दिले.

कोणी ठेव ठेवावयास आणून देत असतां कागद करून दिल्याशिवाय अगर कोणी साक्षीदार असल्याशिवाय मी ती घेणार नाही असें म्हणणारा गृहस्थ उच्च जातींतसुद्धा मिळणें प्रायः अशक्य, मग खालच्या जातीबद्दल गोष्टच बोलावयास नको. जगाची नीतिमत्ता इतक्या प्रमाणावर अद्यापि आली नाही व पुढे कधी येईलसेंहि वाटत नाही अशा समजुतीच्या खालच्या कोर्टाने वादीच्या साक्षीवर गैरभरंसा ठेवला; परंतु अपिलांत असें सांगणारीं माणसें पुष्कळ मिळतील. त्यांत कांही आश्चर्य वाटण्याचें कारण नाही, असें धरून दुसऱ्या अगर वरिष्ठ न्यायाधिशांनी त्याच साक्षीवर पूर्ण विश्वास ठेवून वादीचा दावा देवविला.

ह्यामध्ये कोण चुकला आहे ह्याची वाटाघाट करण्याचें कारण नाही. पण एकाचा अनुभव अयथार्थ आहे एवढें मात्र निःसंशय. ह्यामध्ये आपणांस बोधप्रद गोष्ट इतकीच ध्यावयाची की, सर्व न्यायाधिशांस जगाचा यथार्थ अनुभव मिळणें अशक्य असल्यामुळे कोर्टांतून पक्षकारांस खरा न्याय मिळेलच असें निश्चयपूर्वक सांगणें दुर्घट आहे; आणि एवढ्याचकरिता कज्जा कोर्टांत भांडणें म्हणजे जुगार खेळणें आहे अशी लोकांची समजूत झालेली असते.

वरील विवेचनावरून मुन्सफाचें काम करणाऱ्या इसमाची योग्यता फार मोठी असली पाहिजे ह्याबद्दल कोणाचीहि खात्री होईल.

तथापि कित्येकांस त्यांची कांही किंमत वाटत नाही हें त्यांचें दुर्भाग्य होय. शेवटल्या पायरीच्या मुन्सफापेक्षा ऑनररी तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटची योग्यता सरकारने विशेष मानली आहे. सिव्हिल लिस्टांत निरनिराळ्या अधिकाऱ्यांचा जो मानानुक्रम दिला आहे त्यावरून वरील गोष्ट व्यक्त होते. कोठे दरबारांत वगैरे जाण्याचा प्रसंग आल्यास तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटच्या खालची खुर्ची १५० रुपयांच्या मुन्सफास घ्यावी लागते. ह्यावरून दिवाणी अधिकाऱ्यापेक्षा फौजदारी अधिकाऱ्यांना सरकार अधिक चाहतें असें होतें. ह्याप्रमाणे दिवाणी कोर्टांतील भानगडीचें काम मोठ्या चातुर्याने पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांसंबंधाने झालेला हा अन्याय लोकांनी आजपर्यंत सहन केला हें आश्चर्यजनक आहे. कौन्सिलांतल्या एतद्देशीय गृहस्थांचें इकडे लक्ष जाईल काय ?

डिस्ट्रिक्ट-जज्जाचें काम करण्याकरिता एतद्देशियांच्या अधिक नेमणुका होणें फार महत्त्वाचें आहे. शिक्षण, रीतिभातीचें ज्ञान, स्वभाषा ह्यांच्या योगाने त्यांच्यांत साहजिकच विशेष पात्रता येते. हायकोर्टांतील न्यायाधिशांचें काम फार जोखमीचें आहे. त्या ठिकाणीं चांगलींच कसलेलीं विद्वान् माणसें पाहिजेत. त्यावांचून हायकोर्टाचें वजन खालील कोर्टांवर पडत नाही. हायकोर्टांत जी मंडळी असते ती फार कमी दर्जाची असली म्हणजे त्यांच्याविषयी आदरबुद्धि उत्पन्न होण्याचा संभव नाही. त्यांच्या ठिकाणीं जबरदस्त विद्वत्ता आहे किंवा नाही हें त्यांच्या दर महिन्यास प्रसिद्ध होणाऱ्या निवाड्यांवरून दिसून येणारें आहे. कोणत्याहि प्रश्नांचा विचार निरनिराळ्या बाजूंनी केलेला आहे की नाही हें दृष्टीस पडतें. इकडील लहान मोठ्या कोणत्याहि ठरावांत इंग्रेजी ठरावाचा पाठ म्हणणें हेंच काय तें विद्वत्तेचें चिन्ह होऊन बसलें आहे. इंग्रजांचें प्रत्येक बाबतींत आम्हीं दास्य पत्करलें आहे हें पदोपदीं दृष्टीसमोर आणण्याकरताच की काय प्रत्येक ठरावाला इंग्लिश ठरावाचा पाठिंबा दिला

जातो. एकंदरींत हायकोर्टांतील नेमणुका नेहमी काळजीपूर्वक झाल्या तरच बरें.

खालील न्यायाधिशाच्या बरेवाईटपणाबद्दल परीक्षा हायकोर्टाला होत नाही किंवा ते करीत नाही हा एक दुसरा आरोप आमच्या हायकोर्टावर नेहमी केलेला ऐकण्यांत येतो. कोणीं चांगलें काम केलें तर त्यास उत्तेजन मिळेल ही आशा नको. बरेंवाईट काम एकाच मापाने मोजलें जातें.

३ कोर्ट आहे तेथे वकील नाहीत असें ह्या बाजूला तरी उदाहरण नाही. म्हणून तेहि न्यायपद्धतीचे एक अवश्य घटकावयव होऊन बसले आहेत. मुन्सफांप्रमाणे वकिलांचेहि दोन वर्ग आहेत. एकांत एल्‌एल्‌.बी.ची गणना होते व दुसऱ्यांत हायकोर्टाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेंत पास होणारांचा समावेश होतो. कायद्याच्या ज्ञानाशिवाय उदात्त शिक्षणाचा संस्कार होणें मुन्सफाला जितकें जरूरीचें आहे तितकें वकिलास नाही हें खरें. परंतु वकील दरएक कोर्टांत फार झाल्यामुळे वकिलीची परीक्षा बंद करण्याचें हायकोर्टाने मनांत आणलें आहे. एका दृष्टीने हा विचार चांगला आहे व एका दृष्टीने अनिष्ट आहे. नवीन कायद्याने युनिव्हर्सिटी शिक्षण जास्त खर्चाचें होणार आहे. इकडे लोक अधिकाधिक दरिद्री होत चालले आहेत. अशा प्रसंगीं गरीब होतकरू माणसांस एका प्रतिष्ठित धंद्याचें द्वार बंद व्हावें हें पाहून फार वाईट वाटतें. परंतु उलटपक्षीं वकील फार होणें कोणासच हितावह नाही हेंहि कबूल करणें भाग आहे. निस्पृहपणाने राहण्याइतकी कमाई वकिलांस न झाल्यास स्वतंत्रतेचें पाणी त्यांच्यांत रहात नाही व त्यामुळे ते आपणा स्वतःस व आपल्याबरोबर आपल्या देशासहि खड्डयांत घालण्यास चुकणार नाहीत. आजच असा प्रसंग येऊन ठेपला आहे की, वकिलांचें वजन लोकांवर पडण्याच्या ऐवजी लोकच वकिलांस आपल्या मुठींत ठेवूं लागले आहेत. अशा वकिलांचें वजन

सरकारावर काय पडणार हें दिसतेंच आहे. बाजारांतील पदार्थाप्रमाणे वकिलांच्या धंद्यांत चढाओढीचें तत्त्व अमलांत आणणें वाजवी नाही. प्रतिष्ठित व निस्पृह वकिलांपासूनच देशाचा फायदा आहे, विरुद्ध गुणांच्या वकिलांपासून हानि मात्र होण्याचा संभव फार. तेव्हा वकील कमी करणें जर अवश्यच आहे तर जास्त शिक्षणाचे जे एल्एल्. बी. ते ठेवून निव्वळ कायदे पाठ करणारे वकील बंद करणें ओघासच येतें.

असें जरी आहे तरी हायकोर्ट-वकिलीची अगर मुन्सफीची परीक्षा कायम ठेवून वकिलीची परीक्षा बंद करणें केवळ वेडेपणाचें आहे. मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास होऊन नंतर लगेच ह्या परिक्षेस बसण्याची मोकळीक असल्यामुळे वयाची हरकत ह्या मंडळीस येण्याचा संभव नाही. ह्यामुळे सबजज्ज बिनपदवीधर होऊन वकील मात्र पदवीधर होतील. ह्याचा परिणाम काय होईल हें सांगावयास नको. सबजज्जांचें वजन वकिलांवर पडावें तसें पडणार नाही व विद्वत्तेने श्रेष्ठ असल्यामुळे वकिलांच्या मनांत कोर्टाबद्दल आदरबुद्धि वसणार नाही. हायकोर्ट प्लीडरची परीक्षा कायम बंद करण्याचें प्रथमतः कोणाच्या डोक्यांत आलें असेल कोणास ठाऊक. पण तें फार अनिष्ट आहे.

असो. हल्ली सर्व कोर्टांतून वकिलांची गर्दी आहे. कोणास प्रतिष्ठितपणाने निर्वाह करण्याइतकी किफाईत होण्याची मुष्कील, अशी सर्वत्र ओरड ऐकूं येते. दाटी फार आहे ही गोष्ट कांही खोटी नाही. तथापि ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की, संख्येची दाटी असली तरी गुणांची विरलताच आहे. आपलें काम झटून व योग्य प्रकाराने करणारे वकील खालील कोर्टांत तरी क्वचित् आढळतात. म्हणून काळजीपूर्वक काम करण्याचा निश्चय नवीन माणसाने केल्यास त्यास अद्यापि आकुंचित प्रदेश झालेला नाही. आपआपल्या पक्षकाराची बाजू स्पष्टपणें कोर्टापुढे मांडून न्यायाच्या कामीं मदत करणें

क्रमांक ........ वि: निबंध
...२२२... ता: २६।६।१९६१

हें जें वकिलांचें आदिकर्तव्य तें नीटपणें बजावणारे वकील फार थोडके आहेत.

वकिलीचा धंदा प्रतिष्ठितपणाचा व धूर्ततेचा आहे. खऱ्या बुद्धिमान् पुरुषास आपलें कौशल्य निदर्शनास आणण्यास मुबलक सवलत मिळते. परंतु व्यवस्थित रीतीने काम करण्याची सवय बऱ्याच वकिलांस नसल्यामुळे त्यांच्या बुद्धीचा उपयोग त्यांस, लोकांस किंवा दुसऱ्या कोणासच होत नाही. हायकोर्टांतल्या सालिसिटरांचें अनुकरण जर खालील कोर्टांतील वकील करतील तर त्यापासून स्वतः वकिलांस, पक्षकारांस आणि कोर्टांस फार फायदा होईल. पक्षकार घरीं आल्याबरोबर तो सांगेल त्याप्रमाणे फिर्याद, कैफियत अगर अर्ज लिहून कोर्टांत दाखल करणें, येतील त्या साक्षीदारांस तपासणें व सर्व कज्जा पुरा झाला म्हणजे आपणांस कांही अनुकूल आधार मिळेल काय म्हणून लॉ रिपोर्टांचीं पुस्तकें धुंडाळणें हा क्रम धंद्यांत यश येण्यास अपायकारक आहे ही गोष्ट पुष्कळ वकील विसरतात. फिर्याद तयार करण्याच्या वेळेसच पुढे चालावयाच्या कज्जाची जय्यत तयारी करणें भाग आहे. पक्षकाराजवळ पुरावा काय आहे, कोणत्या स्वरूपाचा दावा आणला म्हणजे त्यास हायकोर्टाच्या ठरावांचें आनुकूल्य मिळेल, विरुद्ध बाजूकडून कोणतें उत्तर येण्याचा संभव आहे, इत्यादि गोष्टींचा पूर्ण विचार करून वलिकाने फिर्याद लिहिण्यास आरंभ करावा. व त्याच वेळेस त्याने पक्षकारापासून कज्जासंबंधी संपूर्ण माहिती घेतल्यावांचून राहूं नये. साक्षीदारांचीं नांवें, वय, जात, धंदा, योग्यता, कोणता साक्षीदार काय मजकूर सांगणार त्याचा सारांश, इत्यादि माहितीचें टिपण जवळ असल्यावांचून वकिलाने साक्षीदार तपासण्यास आरंभ करणें अगदीं मूर्खपणाचें आहे.

वकिलाचें मुख्य कसब उलटतपासणींत आहे. ह्या प्रसंगीं आपलें कौशल्य दाखविणारे वकील फारच विरळा दृष्टीस पडतात. उलट-

तपासणींत पुष्कळ प्रश्न विचारले पाहिजेत हा समज सर्वसाधारण झालेला आढळतो. पण असें करणें अशास्त्रीय आहे हें कुशाग्र-बुद्धीच्या व अनुभवी वकिलांस सांगणें नकोच. साक्षीदार अगदीच खुळा नसेल तर उलट तपासणींत नेमके प्रश्न विचारणेंच श्रेयस्कर आहे. आपल्याला ज्या गोष्टी शाबीत करावयाच्या त्या प्रथम साक्षी-दाराकडून शक्य तर वदवण्याचा प्रयत्न करून साक्षीदार भरंसा ठेव-ण्यास लायक नाही अशा हेतूने कांही प्रश्न विचारले म्हणजे उलट तपासणींतलें बरेंच काम आटोपतें. परंतु कोणत्या गोष्टी उलट बाजून दाखवल्या म्हणजे वादीची बाजू कमकुवत होईल ह्याबद्दल वकिलांची चांगलीच तयारी पाहिजे. ज्या कज्जांतील मुख्य गोष्टी नव्हेत पण ज्या शाबीत केल्या असतां कायद्याचा प्रश्न उद्भवून वादीचा दावा रद्द होण्याचा संभव आहे, असे प्रश्न उलट बाजूच्या साक्षीदारास विचारले असतां त्यांत अनुकूल उत्तरें मिळण्याचा संभव जास्त असतो. कारण बहुतेक साक्षीदारांस कायद्याची माहिती नसते, म्हणून हे प्रश्न कोणत्या धोरणाने विचारले जात आहेत ह्याची त्यांस अटकळ करतां येत नाही. उलटतपासणी करण्याची तयारी फार थोडक्यांची असते. तेव्हा साक्षीदारास बरेचसे वायफळ प्रश्न विचारून त्याच्याकडून परस्परविरोधी उत्तरें काढलीं म्हणजे झालें अशीच पुष्कळांची समजूत असते. उलटतपासणींतील प्रश्नांवरून प्रतिवादीच्या तक्रारीचें धोरण स्पष्ट कळलें पाहिजे. नाहीतर वादीच्या साक्षीदारांस तत्संबंधीं प्रश्न करण्याचें धैर्य नाही, सबब प्रतिवादीची बाजू कुमकुवत आहे असा कोर्टाचा समज होतो व तो तसा होऊं देणें इष्ट नाही.

साक्षीदाराची उलटतपासणी करण्याच्या अगोदर तो कोणत्या दर्जाचा आहे ह्याची परीक्षा चाणाक्ष वकिलाने करणें अगत्याचें आहे. धूर्त साक्षीदारास त्यास जसजसे जास्त प्रश्न विचारावे तसतशी उलटतपासणी आपल्याच गळ्यांत येते. अशा साक्षीदारास ज्या

गोष्टी कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाही असेच प्रश्न विचारावेत आणि त्याची लायकी व विश्वसनीयता कमी करण्यासारखी असल्यास करून सोडून द्यावी. कोणत्याहि दर्जाच्या साक्षीदारास सरसकट सारखेच प्रश्न विचारीत गेल्याने फायदा न होतां उलट नुकसान होतें. आपल्याला अंशतः अनुकूल असें उत्तर चुकून साक्षीदाराच्या तोंडून आल्यास कांही वकील तें सर्वस्वी अनुकूल यावें म्हणून तत्संबंधीं जास्त प्रश्न विचारण्याच्या भरीस पडतात, पण ही त्यांची नेहमी चूक होते. धूर्त साक्षीदार आपण घसरलों आहों हें तेव्हाच ताडतो व पुढच्या प्रश्नांचीं उत्तरें देतांना झालेली चूक उलट सुधारून घेतो. ह्यासाठी कोणताहि प्रश्न विचारण्याच्या पूर्वी फार विचार करावा लागतो. एखादा प्रश्न असा असतो की, त्याचें उत्तर साक्षीदाराने आपणांस अनुकूल दिलें तर उत्तमच. पण जर का उत्तर प्रतिकूल आलें तर तेथपर्यंत मिळालेला फायदाहि नाहीसा होतो. अशावेळीं साक्षीदाराची अक्कल किती आहे ह्याचा विचार करून प्रश्न विचारला पाहिजे. तात्पर्य, साक्षीदार पिंजऱ्यांत आल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरून सूक्ष्म निरीक्षण करणें अगत्याचें आहे. त्याचप्रमाणे बनावट साक्षी कोण व खरा साक्षी कोण हेंहि उलट तपासणी करणाऱ्या वकिलाने ताबडतोब ओळखलें पाहिजे. खरा साक्षी असल्यास त्यास फारसे प्रश्न विचारण्याच्या भानगडींत पडूं नये.

साक्षीदारावर ओरडण्याची खोड कांही वकिलांस असते. पण त्यापासून कांहीएक कार्यभाग होत नाही. साक्षीदाराला गोंजारून सर तपासणींत त्याने सांगितलेला मजकूर खराच आहे असें वारंवार म्हणून आपल्या प्रश्नांचीं उत्तरें त्याच्याकडून काढून घ्यावीं. अडाणी साक्षीदार असेल तर हा प्रयत्न चांगलाच सफल होतो. कित्येक आडमुठ्या साक्षीदारांना तर आपला वकील कोणता व दुसऱ्याचा कोणता हें माहित नसतें. दरडावून प्रश्न विचारणारा विरुद्ध वकील

आहे असें ते नंतर समजतात; म्हणून अशा साक्षीदारांस नेहमी शांतपणेंच प्रश्न विचारावे. तसेंच प्रत्येक माणसांत कांहीना कांही व्यंग असतें त्याप्रमाणे ह्या साक्षीदारांत काय आहे हें जाणण्याचाहि प्रयत्न वकिलाने केला पाहिजे. उलटजबानी देण्यांत मी कुशल आहें अशी कित्येकांना घमेंड असते. मी धार्मिक असून खोटें बोलणारा नाही असा कित्येकांना अभिमान असतो. मी गांवांतील पुढारी आहें असें लोकांनी कबूल करावें अशी कित्येकांस हौस असते. हें स्वभाव-वैचित्र्य ओळखून साक्षीदाराची त्याच्या खोडीबद्दल निर्भर्त्सना न करतां प्रशंसा करून आपणांस इष्ट उत्तरें त्याच्याकडून काढून घ्यावीं.

आपणांस कोणतीं उत्तरें इष्ट आहेत ह्याचा मागमूसहि साक्षीदाराला लागणार नाही अशाविषयी शक्य तितकी खबरदारी घ्यावी. ह्यासाठी संगतवार प्रश्न कधीहि विचारूं नये. कधी कधी उद्दिष्ट हेतु साधण्याकरितां पोकळ प्रश्नहि विचारावे लागतात. त्याचप्रमाणे अमुक एक प्रश्न विचारणारास फार महत्त्वाचा आहे ह्याची कल्पना-सुद्धा विचारणाराच्या स्वरावरून साक्षीदारास होतां कामा नये. एवढ्यासाठी बरेचसे वायफळ प्रश्न विचारून मध्ये हळूच महत्त्वाच्या प्रश्नाचें उत्तर काढून घ्यावें. इतकेंहि करून मुद्यावाहेर वकिलाने कधी जातां कामा नये.

पुष्कळ वेळां वकील आपल्या पक्षकारांशीं आणि साक्षीदारांशीं कोर्टांत अशा रीतीने वागतात की, त्यावरून आपली बाजू लंगडी आहे अशी वकीलाची समजूत आहे असा कोर्टाचा ग्रह होतो. तो तसा होऊं देणें अगदी अनिष्ट आहे. वकिलांनी निदान कोर्टामध्ये आल्यावर तरी आपल्या बाजूकडे सत्य आहे असें निदर्शनास येईल असें वागलें पाहिजे. ही हातोटी कित्येक वकिलांना चांगली साधते. वारंवार तर असें होतें की, असल्या वकिलांकडे खोटे कज्जेच हमेशा येतात. पण त्यांच्या काम चालवण्याच्या पद्धतीवरून व एकंदर वर्तनावरून हे नेहमी खरे कज्जे घेत असावेत असा कोर्टाचा अभिप्राय

होतो व त्याचा त्यांना प्रसंगोपात्त फायदाहि मिळतो. असो. एकंदरींत वकिलाचें काम सोपें नाही. वकिलाच्या कर्तबगारीवर पक्षकारांचें नफानुकसान अवलंबून असतें.

४ पक्षकार हे आमच्या न्यायपद्धतीचे चवथे घटक होत. आमच्या लोकांस कोर्टांत कज्जे आणण्याचें मात्र माहीत आहे. पण त्या कज्जासाठी किती तयारी करावी लागते ह्याची त्यांस बिलकूल कल्पना नाही. वकील लोक म्हणजे बोलून चालून पैसे देऊन भाड्याने काम करण्याकरता विकत घेतलेलीं माणसें. त्यांच्या ठिकाणीं पक्षकाराची आस्था व कळकळ असणें शक्य नाही. तेव्हा विद्यार्थी परीक्षेला जातांना जसा विषयाचा अभ्यास करतात त्याप्रमाणे पक्षकारांनी आपल्या दाव्याचें अध्ययन केलें पाहिजे, व आपला दावा जिंकण्यास कोणत्या अडचणी येतील ह्याचें त्यांनी आगाऊ धोरण बांधलें पाहिजे.

कोर्टांनी जबानी घेतल्यास विचारलेल्या प्रश्नांचीं सरळ व तत्परतेने उत्तरें देण्याने कोर्टाच्या मनावर चांगला ग्रह होतो ही गोष्ट पुष्कळ पक्षकार विसरतात. ज्या गोष्टी नाकबूल करणें शक्य नाही अशा गोष्टीसुद्धा स्पष्टपणें सांगण्यास हरकत घेणें म्हणजे आपल्या पायावर दगड ओढून घेण्यासारखें आहे. कोर्ट काय प्रश्न विचारील व त्यांचीं काय उत्तरें द्यावीं ह्याचा विचार न करितां साक्षीस उभें राहणाऱ्या माणसांचीच बहुधा टाळाटाळीचीं उत्तरें देण्याची चाल असते. कांही पक्षकार असे असतात की, त्यांस दाव्यासंबंधी कांही एक माहिती नसून विचारलेल्या प्रश्नांचीं मूर्खपणाने कांही तरी उत्तरें देतात. अशा पक्षकारांस वकिलाने कधींहि एकदम साक्षीस उभें करूं देऊं नये. तसेंच विरुद्ध बाजूने केलेलीं विधानें अजीबात नाकारणें हें आपणांस हितावह आहे असें प्रत्येक पक्षकारास वाटत असतें; पण हा समज अगदी चुकीचा आहे. सारांश, कोर्टाच्या

मनांत आपल्याविषयी अनुकूल ग्रह उत्पन्न करण्यास पक्षकाराने कधीहि चुकूं नये.

वकील करून देण्यांतहि पक्षकारांनी फार खबरदारी घेणें अगत्याचें आहे. थोड्याशा पैशाच्या लालचीनें अननुभवी वकील करून आपलें कायमचें नुकसान होतें हें त्यांनी विसरतां कामा नये. वकिलाशीं नेहमी पक्षकारांचें वर्तन प्रामाणिकपणाचें व विश्वासयुक्त असलें पाहिजे. होतां होईल तितकें करून एकाच वकिलाला आपलीं सर्व कामें देण्यांत फायदा असतो. प्रत्येक कामाकरता नवीन वकील पाहणें हितावह नाही. कारण एकच वकील असल्यानें त्यास पक्षकाराच्या व्यवहारांची चांगली माहिती झालेली असते. तात्पर्य, पक्षकारांच्या शहाणपणावरहि खरा न्याय होणें कांही अंशीं अवलंबून आहे.

५ पक्षकारांनंतर न्यायाधीश आपल्या ठरावाची सर्व इमारत ज्यांच्यावर उभारतो ते साक्षीदार होत. वास्तविक पाहतां कोणत्याहि पक्षाचा अभिमान न बाळगतां आपणांस माहित असेल तेवढेंच सांगणारे जे त्यांसच साक्षी ही संज्ञा अन्वर्थक लावतां येते. असा साक्षीदार आपल्या हयातींत कोणी न्यायाधिशास एखादा तरी आढळेल किंवा नाही ह्याची शंकाच आहे. लॉर्ड कर्झन ह्यांनी आपल्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं केलेल्या भाषणांत सद्बुद्धि कायम ठेविली असती व आमच्या पूर्वजांना आणि धर्मग्रंथांना आमच्याच मालिकेंत गोंवलें नसतें तर त्यांचें भाषण सद्यःस्थितीचें वास्तविक प्रतिबिंब उठविणारें नाही असें कोणी म्हटलें असतें ? धर्मशिक्षण कोणासच नसल्यामुळे, व व्यावहारिक शिक्षण फार थोडक्यांसच मिळत असल्यामुळे, खोटें बोलण्यांत आपण कांही पाप करीत आहों ही भावनासुद्धा पुष्कळांच्या चित्तास शिवत नाही. कोर्टाच्या कामाची ज्यांना माहिती असेल त्यांसच वरील यथार्थता किती आहे हें कळून येईल. वरून सभ्यपणाचा पोषाख केलेले व

समाजांतील आपली प्रतिष्ठा कोर्टाच्या निदर्शनास आणूं पाहणारे, सत्यवादित्वाची आपण शपथ घेतली आहे ह्याचा विचार न करतां बुद्धिपुरःसर निर्गलपणें असत्यापलाप करतांना पाहिले म्हणजे कोणत्याहि विवेकी मनुष्याचें अंतःकरण देशाच्या भावी स्थितीबद्दल कचर खाल्यावांचून राहणार नाही.

आपल्यास माहिती थोडी असतां सर्व हकीकत सांगितलीच पाहिजे असा साक्षीदारांचा सामान्य समज झालेला असल्याकारणाने खोट्याचें मिश्रण नाही अशी जबानीच कोणाची व्हावयाची नाही. आपणांस भूषणावह उत्तर ज्या प्रश्नाचें आहे त्या प्रश्नाचें तसेंच उत्तर पुष्कळ लोक देत असतात. मग त्यांत सत्य असो अगर नसो. उदाहरणार्थ, एखादा गृहस्थ दुसऱ्याच्या सामान्य माहितीवरून "आपण कांही तरी धर्मविषयक ग्रंथ वाचल्याशिवाय दिवस घालवित नसाल ?" असा त्यास प्रश्न करतो, तेव्हा तसा प्रघात नसतांहि वाचीत नाही म्हणूनच साफ उत्तर देण्याचें धैर्य फारच थोड्यांस होतें. नाही म्हणून उत्तर देणारे फार. निदान अर्धवट गुटमळत तरी उत्तर देतील. मनुष्यस्वभावांतील हें व्यंग जाणणारा चतुर वकील अशा प्रश्नांनी साक्षीदारास तेव्हाच फसवितो. "खतावर स्वतः सही करतांना प्रतिवादीला पाहिल्यावांचून आपण साक्ष घालीत नसालच असा प्रश्न विचारला असतां साक्षीदार एकदम नाही म्हणून उत्तर देऊन चुकतो. आता वास्तविक प्रकार तसा नाही, हें अगोदर प्रतिवादीच्या, इतर साक्षीदारांच्या किंबहुना वादीच्याहि साक्षीवरून निर्विवाद झालेलें असतें. शिवाय प्रतिवादीला सही करतांना साक्षीदाराने पाहिलें पाहिजे ही अट कायद्याने प्रत्येक ठिकाणीं नडते असाहि नेम नाही. "प्रतिवादीने मजसमक्ष सही केली नाही, पण केल्याबद्दल त्याने मजजवळ कबूल केलें" इतकें साक्षीदाराने सांगितलें असतें तरी कांहीएक वादीच्या दाव्यास कमीपणा येत नव्हता. पण आत्मश्लाघेला भुलून साक्षीदार निरर्थक

वकिलाच्या जाळ्यांत सापडतो आणि पक्षकाराचें नुकसान करतो. कारण तेवढ्या उत्तराने तो साक्षीदार अविश्वनीय आहे एवढें मात्र ठरतें.

एवढ्यासाठी साक्षीदारांनी सदैव यथातथ सांगण्याची सवय ठेवावी. वादीकडील निकाल होवो अथवा प्रतिवादीकडील होवो, साक्षीदाराने त्याबद्दल पर्वा करूं नये. विचारल्याच्या बाहेर उत्तर देण्याची साक्षीदारास खोड असते. उलटतपासणींत प्रायः हा प्रकार फार घडतो. त्यांच्या समजुतीप्रमाणे अर्धवट दिलेल्या उत्तराची पुरवणी फेरतपासणींत आपले वकील करून घेतील इतका त्यांस धीर नसतो. अशा अधीरपणाने एकपक्षीयत्व मात्र अनुमित होतें. आता एवढें खरें की, हें अनुमान नेहमी खरें असतें असें नाही. वर सांगितल्याप्रमाणे पुष्कळ प्रसंगीं स्वभाववैचित्र्याचे हे परिणाम असतात. कित्येक वेळां मात्र साक्षीदार आपणांस अभिप्रेत असलेल्या पक्षकाराचा फायदा व्हावा या इच्छेने प्रेरित होऊन सांगत असतात. हें हेतुवैचित्र्य झालें. परंतु पुन्हा कोणत्याहि हेतूने प्रेरित होऊन साक्षीदार फाजील सांगो; तें खोटें आहे किंवा काय ह्याचा विचार न्यायाधिशास करावयाचा असतो. कारण विचारल्याच्या बाहेर सांगणें म्हणजे खोटें बोलणें नव्हे.

बिनभत्त्याने साक्ष देण्याकरता आलेल्या साक्षीवर गैरभरंसा ठेवून त्या अनुरोधाने कज्जाचे निकाल करण्यांत येतात. येथेसुद्धा हे साक्षी पक्षपाती अतएव अविश्वसनीय आहेत असें प्रत्येक प्रसंगीं मानणें अन्यायाचें होईल. कारण खऱ्या पक्षाला मदत करणारे लोक कांही असतात. त्यांस पैशाची पर्वा नसते. कित्येक माणसांचे मनोविकार तर जास्त प्रखर असतात. गरीब माणसाचा कोणीं अन्यायाने छल केला तर तीं आपण होऊन, कदाचित् पैशाची हानि सोसूनहि त्याच्या वतीने सर्व प्रकारची खटपट करण्यास प्रवृत्त होतात. अशा प्रबल मनोवृत्तींच्या माणसांविषयी जगांत नेहमी गैरसमज उत्पन्न होतो. त्यांच्या खऱ्या स्वभावाची परीक्षा करणारे

थोडे. तोच प्रकार साक्षीदारांचा असतो. उच्छृंखल उत्सुकतेने परंतु शुद्ध व उदात्त बुद्धीने साक्षीदाराने एखादी बाजू उचलली असली तर त्यास त्याच्या सद्धेतूंचें बक्षीस मिळण्याच्या ऐवजी प्रतिकूल टीकेला मात्र तो आपणास पात्र करून घेतो. अशा प्रकारच्या साक्षींची निवड न्यायाधिशाने सूक्ष्मावलोकनाने करणें अवश्य आहे.

कांही साक्षीदारांची मुखचर्या स्वभावतःच इतकी थंड असते की, त्यांच्या शांतपणाने दिल्या जाणाऱ्या जबानीवरून त्यांच्याविषयी न्यायाधिशांच्या मनांत फारच अनुकूल ग्रह उत्पन्न होतो. परंतु येथे थोडी खबरदारी घेणें न्यायाधिशांस भाग आहे. असलीं माणसें कधीच खोटें बोलत नाहीत असा समज वस्तुस्थितीस अनुसरून असणार नाही. शांत चित्तवृत्तीच्या माणसांच्या हातून अनन्वित कर्मे होणार नाहीत हें खरें; पण खोटें बोलण्याचें अल्पस्वल्प पाप ते करणार नाहीत, असें मात्र नाही. असलीं माणसें घरींदारीं, खरेंखोटें कसेंहि कोठेहि बोलत असलीं तरी एकाच तऱ्हेने बोलत असतील. त्यांचा वृत्तिभंग फारसा होत नाही. तेव्हा अशा साक्षीवर केव्हा केव्हा फाजील विश्वास बसण्याचा संभव असतो. असो; ह्यावरून इतकें निश्चित आहे की, न्यायाचा कांटा विशिष्ट दिशेने झुकविण्यास साक्षीदार बऱ्याच अंशाने कारणीभूत होतात.

६ ह्याशिवाय कायदे सूत्रप्राय झाल्यामुळे, त्यांच्या शब्दरचनेवर पक्षकारांचें नफानुकसान अवलंबून राहतें. लिहिणाराचा उद्देश एक असून शब्दांचा अर्थ दुसराच होतो असे प्रसंग दुर्मिळ नसतात. कायद्याच्या चौकटींत न्यायरूपी तसबीर बसावयाची असल्यामुळे तिला सर्वस्वी पराधीन असावें लागतें. कायद्यामध्ये लवचिकपणा नसतो. त्यामुळे न्यायाकरता कायद्याची ओढाताण करतां येत नाही, कायद्यास अनुसरून न्यायाधिशास निकाल करावा लागतो. असा निकाल नेहमीच न्यायाचा कसा व्हावा ?

७ बरोबर न्याय न व्हावा म्हणूनच कदाचित् आणीकहि कितीतरी अडथळे आहेत. त्यांत प्रमुखतः इंग्रजी भाषेंत कोर्टाचें काम चालवणें हें होय. हायकोर्टाशिवाय इतर कोर्टांचें काम देशी भाषांतूनच चालवण्यास कायद्याची परवानगी आहे हें खरें; पण ह्या कायद्याची अम्मलबजावणी होणार नाही अशी परिस्थिति मात्र निदर्शनास येते. इंग्रजींत निकाल न लिहिणाऱ्या सबजज्जास बढती दिली नाही म्हणजे अर्थात् तो कसें तरी करून त्या परकी भाषेंत आपले ठराव लिहितो. पण इतरांच्या सोयीकरिता मुन्सफास इंग्रजींत ठराव लिहिण्यास लावणें अगर वकिलांस त्या भाषेंत कज्जाची तक्रार करण्यास परोक्ष अपरोक्ष रीतीने भाग पाडणें हें अन्यायाचें व अनिष्ट आहे. आरोपीस अगर वादी प्रतिवादीस आपला वकील काय बोलत आहे हें जाणण्याची सवलत ज्या कायद्याने अगर कानूने ठेवली नाही तो कायदा वा कानु अन्यायमूलक नाही असें कोण म्हणेल ? ज्या गोष्टींत आपलें हिताहित आहे त्यासंबंधाने आपले विचार अथवा म्हणणें आपल्याच भाषेंत व्यक्त करण्याचा हक्क प्रत्येक माणसाचा नैसर्गिक आहे. परंतु हिंदुस्थानांत सर्वच विलक्षण प्रकार चालतो. साऱ्या दुनियेंत जो प्रकार आढळणार नाही तो येथे आढळेल, व सर्वांमध्ये मोठा चमत्कार हा की, आमचे लोक मुकाट्याने हें सोशीत आहेत.

एतद्देशीयांच्या ठरावासंबंधाने कधी कधी इंग्रेजी न्यायाधीश, खालच्या कोर्टाने काय लिहिलें आहे हें आम्हांस समजत नाही म्हणून उद्गार काढतात. अशा उद्गारांच्या मुळाशीं किती अज्ञान आहे हें उघड दिसण्यासारखें आहे. आपणांस देशी भाषा चांगल्या रीतीने समजणें अवश्य असून त्या समजत नाहीत म्हणून आपल्या खालच्या न्यायाधिशास परकी भाषेंत कायद्याविरुद्ध भानगडीचे विचार व्यक्त करावयास केवळ आपल्या सोयीकरिता भाग पडलें आहे ही गोष्ट त्यांच्या ध्यानांतच राहत नाही. देशी भाषेंत जर कोर्टाचें सर्व काम चालले तर तें लोकांना बोधप्रद होईल हा एक त्यापासून

निराळा फायदा आहे. कोर्टाने आपल्या साक्षीवर कां गैरविश्वास ठेवला, आपण काय चुका केल्या म्हणून आपला दावा बुडाला, इत्यादि गोष्टी जर देशी माणसांस आपल्याच भाषेंत वाचावयास मिळतील तर त्यांस एक प्रकारचें शिक्षण मिळाल्यासारखें होईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी म्हणून सरकारने निराळा कायदा केला आहे; पण त्यांत ठराव देशी भाषेंतच लिहिले पाहिजेत अशी अट कोठेहि ठेवली नाही. वस्तुतः मराठींत बाळबोध लिपींतसुद्धा शेतकऱ्यांच्या समजुतीसाठी कोर्टाने ठराव लिहिणें जरूरीचें आहे. पण खरोखर फायदा कशांत आहे ह्याची मीमांसाच आमच्या इकडे कोणी करीत नाहीत.

सारांश, विचार करण्यासारखी गोष्ट इतकीच की, हल्लीची उत्कृष्ट म्हणून ठरलेली जी न्यायपद्धति ती अपरिहार्य व परिहार्य अशा अनेक दोषसमुच्चयाने अभिभूत आहे. पूर्वी लोकांना न्याय मिळत नसे आणि आता तो मिळतो हा समज अगदी अज्ञानमूलक असला पाहिजे. खरा न्याय होण्यास विघातक गोष्टी प्राचीन पद्धतींत फारच कमी असल्यामुळे त्या पद्धतीनेच लोकांस जास्त संतोष होत असला पाहिजे ह्यांत शंका नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८१५

# वैदिक धर्म

## लेखांक १ ला

"Either one believes in a religion and then everything in it appears natural; or one does not believe in it and then everything in it appears absurd."

(एक तर मनुष्याची धर्माच्या ठिकाणीं अन्धश्रद्धा असते, त्यामुळे त्यास त्यांतील सर्वच गोष्टी अगदी स्वाभाविकशा वाटतात. नाही तर धर्मावर मुळीच विश्वास बसत नाही. आणि मग त्यांतील प्रत्येक गोष्ट वेडगळ भासूं लागते.)

वरील उद्गार एका फ्रेंच सेनेटरचे आहेत. धर्माच्या बाबतींत जगांतील बहुतेक लोक वरील कोणत्या तरी वर्गांत पडत असल्या-मुळे तटस्थ राहून निःपक्षपाताने सत्यान्वेषण करणें कठीण पडतें ह्यांत संदेह नाही. तथापि ह्या लेखांत आर्यधर्माचें स्वरूप विशेषतः सांगावयाचें असल्यामुळे धर्मश्रद्धेच्या फोलपणाबद्दल अगर यथार्थ-तेबद्दल ऊहापोह करण्याचें प्रयोजन नाही. धर्माची आवश्यकता वाचकांना मान्य आहे असें गृहीत धरून पुढील विवेचन करण्याचें योजिलें आहे.

कोणत्याहि धर्माचा उगम मनुष्याच्या ठिकाणीं जी ईश्वरविषयक आस्तिक्यबुद्धि असते तींत असतो. ह्या सृष्टीचा कोणी तरी नियंता आहे असें ज्यांच्या मनाला वाटतें, ते आपला व त्याचा संबंध जड-वितात व ह्यांतच धर्माच्या कल्पनेचें बीज प्रथम प्रादुर्भूत होतें. ज्या समाजाला परमेश्वराचें अस्तित्व कबूल नाही तो समाज नीतिदृष्ट्या कितीहि उच्च दर्जाचा असला तरी, धार्मिक म्हणून गणला जाणार नाही. कोणत्याहि धर्माचे तात्विक व व्यावहारिक असे दोन भाग असतात. व्यावहारिक धर्म आचारप्रधान असतो आणि आचार

म्हणजे विधिनिषेधात्मक असतो. आता राजाने केलेले कायदे ज्याप्रमाणे लोक शिक्षेच्या भीतीने पाळतात, त्याप्रमाणे ईश्वरविषयक पारलौकिक भीति जर नसेल तर कोणतीहि व्यक्ति अगर कोणताहि समाज—कितीहि बुद्धिमान् माणसाने आचारनियम केलेले असोत—ते पाळीलच असा नियम नाही; व कोणत्याहि समाजाने असे नियम निरंतर कां पाळावे ह्यास जरी बाह्यतः सयुक्तिक वाटणारें कारण देतां आलें तरी ती गोष्ट मनुष्यस्वभावाचा विचार करतां शक्य नाही. तात्पर्य, धर्माचा उगम ईश्वराविषयींच्या आस्तिक्यबुद्धींत आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवणें फार अगत्याचें आहे. ती दृष्टीआड केल्याने धर्माच्या स्वरूपाबद्दल आपल्या चुकीच्या कल्पना होत असतात. बौद्धधर्म निरीश्वरवादी अगर ईश्वरवादी आहे ह्याचा खल मोठ्या गांभीर्याने कांही विद्वान् माणसें करीत असतात. जर बौद्धधर्म खरोखर निरीश्वरवादी असेल तर त्यास धर्म म्हणणें अप्रशस्त होय. तें एक फक्त मत किंवा दर्शन म्हणून म्हणतां येईल. आचारहीन माणसास अधार्मिक म्हणण्याचा प्रघात आहे. तथापि मनुष्य कितीहि अनाचारी असो; ईश्वराचें अस्तित्व मान्य असून शिवाय त्याच्याकडे ह्या सृष्टीचें चालकत्व आहे, ही गोष्ट जर त्यास ग्राह्य होईल तर तो "अधार्मिक" असला तरी धर्मबाह्य अगर नास्तिक खास नव्हे. परमेश्वराचें अस्तित्व गृहीत धरलें म्हणजे तो परमेश्वर सर्व शक्तिमान्, सर्वज्ञ, सर्वगुणसंपन्न आहे ह्या तत्त्वाचा स्वीकार करणें ओघास येतें. पण सर्वज्ञ परमेश्वराचें नुसतें अस्तित्व मान्य करून पुरें पडत नाही. ह्या सृष्टीचें रहाटगाडगें सुरू करून तो स्वस्थ शेषशायी होऊन निद्रिस्त झाला, तर पुन्हा आपला व त्याचा कांही संबंधच राहत नाही; आणि मग परमेश्वर मानला काय किंवा न मानला काय दोहोंचें पर्यवसान एकच. ह्या जगांत दुःख व कष्ट आहेत. तेव्हा परमेश्वराच्या सर्वशक्तिमत्तेचा उपयोग आपलें दुःख निवारण्याच्या कामीं करून घ्यावा, अशी साहाजिक भावना मनु-

ष्याच्या ठायीं उद्भवते. म्हणून आपल्या समजुतीप्रमाणे परमेश्वराला जें आचरण प्रिय असेल तें आपण ठेवावें असें मनांत येतें. हाच व्यावहारिक धर्माचा पाया होय. कोणताहि धर्म घ्या, त्यांत परमेश्वराच्या स्वरूपाच्या तात्विक विवेचनाशिवाय तद्धर्मानुयायांनी ह्या जगांत कसें वर्तन ठेवावें एतद्विषयक नियम घालून दिलेले असतात. केवळ परमेश्वराच्या स्वरूपाचा तात्विक विचारच असेल, तर त्यास धर्म न म्हणतां तत्वज्ञान म्हणावें लागेल. म्हणून प्रत्येक धर्मांत उपासनामार्ग सांगून शिवाय थोडेबहुत आचारनियमहि सांगितलेले असतात. उदाहरणार्थ, मुसलमानी धर्मांत उपोषणें करणें, मिळकतीचा चाळीसावा हिस्सा धर्म करणें इत्यादि बंधनें घातलीं आहेत. त्याचप्रमाणे खिस्ती धर्मांत आठवड्याच्या शेवटीं एक दिवस कांही काम न करणें, शपथ न घेणें, व्यभिचार, चोरी अथवा हत्या न करणें वगैरे आज्ञा देवाने केल्या आहेत.

ह्यावरून आचार हा एक धर्माचा अपरिहार्य भाग आहे हें ध्यानांत येईल. आपण जन्मतः मनुष्य आहों, पण कृतीने व गुणाने देव व्हावें ही मनुष्याची महत्त्वाकांक्षा असते; व ही सफल होण्यास त्याचें आचरण मुख्यतः कारणीभूत होतें. सर्व मनुष्यें जन्मतःच सद्गुणी निपजलीं, तरी सुद्धा त्यांच्याकरिता नियम घालून देण्याची अवश्यकता राहणार; कारण निर्बंधहीन आचरणाने ह्या जगांत त्यांच्या सद्गुणांची हानि होण्याचा संभव असतो. मग जेथे जन्मप्राप्य गुणसंपन्नता नाही, विवेकापेक्षा विकारांचें प्राबल्य अधिक, आध्यात्मिक अगर शाश्वत सुखापेक्षा क्षणैक टिकणाऱ्या विषयसुखाकडे प्रवृत्ति बलवत्तर अशा ठिकाणीं निर्बंधाची किती जरूरी आहे, ह्याची सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे. ह्याच उद्देशाने " आचारः प्रथमो धर्मः " असें म्हणून आमच्या स्मृतिकारांनी आचाराचें महत्त्व प्रतिपादिलें आहे. आचारांमध्ये व विचारांमध्ये सामान्यतः अनुरूपता असते. आचारांवरूनच आपण मनुष्याच्या मानसिक स्थितीचें अनु-

मान करतों. आचार हा विचाराचें दृश्यस्वरूप आहे, विचार कारण असून आचार त्याचें कार्य आहे, हा सिद्धान्त प्रायः जरी निर्दोष असला तरी, विचार-आचारांत फारकत होऊं लागली म्हणजे, कार्यकारणभाव विपर्यस्त होतो, म्हणजे कारणस्थानीं आचार जाऊन विचार कार्यरूपी होतो. अर्थात् आचाराला अनुकूल असेच मनोविचार बनूं लागतात. एतदर्थ आचाराविषयी उदासीनता कित्येकांच्या ठिकाणीं दिसते ती अनिष्ट मानली पाहिजे. कोणता आचार श्रेयस्कर हें पुढे पाहूं. धर्माचें आचार हें एक आवश्यक अंग आहे, आचारावांचून कोणताहि धर्म असणें शक्य नाही हेंच येथे विशेषतः सांगावयाचें आहे. बायबलामध्येहि या मताचा पुरस्कार केला आहे हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल. " Even so faith, if it hath not works, is dead, being alone. Yea a man may say. Thou hast faith and I have works, show me thy faith without thy works and I will show thee my faith by my works. Thou believest that there is one God. Thou doest well. The devils also believe and tremble " James Chapter II. धर्माचें पूर्ण स्वरूप बनण्यास आणखी एका गोष्टीची अवश्यकता असते. पुनर्जन्म आपण मानला नाही तर धर्मग्रन्थांत सांगितलेलीं बंधनें आपण कां पत्करावीं हा प्रश्न अनुत्तर राहतो. देहावसानाबरोबर जीवाचाहि अन्त होत असेल, तर विशिष्टाचरणाचें प्रयोजनच राहत नाही. ह्या जन्मांतच परमेश्वराने कृपाळू होऊन आपणांस सुखसंपत्ति द्यावी अशा भावनेने प्रेरित होऊन मनुष्य जर परमेश्वराची आराधना करील, अगर धर्माचरणाने वागेल तर त्यास बहुतेक प्रसंगीं निराश होण्याचीच पाळी येईल व मग धर्मावरची त्याची श्रद्धा क्षीण होऊं लागली तर त्यांत कांही आश्चर्य मानण्याचेंहि कारण राहणार नाही. ह्या जन्मांत तर परमेश्वर आपल्या सहाय्यास येत नाही व पुनः तर जन्म घेणें नाही तर परमेश्वराची करुणा कां

भाकावी ? राजपुरुषांस शासन करतां येणार नाही असें पाप कां करूं नये, विषयसुख सोडून बौद्धिक सुखाची अपेक्षा कां करावी ? शरीरसामर्थ्यवृद्धीपेक्षा आत्मिक उन्नतीकडे विशेष लक्ष कां द्यावें ह्यांची समर्पक उत्तरें देणें कठीण जाईल. मेल्यानंतर परमेश्वर सर्व माणसांस पुनः सजीव करील व तेव्हा प्रत्येक माणसाला आपल्या पापपुण्याचा झाडा द्यावा लागेल व तदनुरूप सुखदुःखहि अनुभवावें लागेल, एथपर्यंतच कित्येक धर्मांची मजल गेली आहे. ह्या कल्पनेंत आत्म्याच्या अविनाशित्वाची कबुली आहेच असें म्हणतां यावयाचें नाही; मृत माणसांस परमेश्वर आपल्या अद्वितीय सामर्थ्याने आपल्या फुरसुतीप्रमाणे पुनः जागृत करतो इतकेंच. ज्यास जीव एकदा निर्माण करतां आला त्यास तो पुनः करतां येणार नाही असें कोण म्हणेल ? परंतु सजीव केल्यावर परत आपणांस परमेश्वर देहधारी बनवीलच असा नियम नाही. मग परमेश्वराने शिक्षा तरी कां द्यावी ? केव्हाहि झालें तरी शिक्षा देण्याचा हेतु माणसाने पुढे सुधारावें असा असतो. पण त्या जीवाचा अवतार पुन्हा व्हावयाचा नसेल तर शिक्षा देण्याचें तरी प्रयोजन काय ? एवढ्यासाठी पुनर्जन्म मानणें हें धर्माचें एक प्रमुख अंग असलें पाहिजे. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, ईश्वराचें अस्तित्व, ईश्वराचा व मनुष्याचा नित्यसंबंध व पुनर्जन्म हीं धर्माचीं सारभूत तत्त्वें असलीं पाहिजेत. धर्म म्हटला की, ह्या तीन कल्पनांचा उद्बोध झाला पाहिजे. ज्या धर्मांत ह्या कल्पनांचा अंतर्भाव होत नसेल तो धर्म त्या मानाने विकल, अपूर्ण व व्यंग समजावा. उपरिनिर्दिष्ट गोष्टी धर्माच्या उत्पादक आहेत व त्यांनी धर्माला पूर्णता येते हें विधान जर निर्दोष असेल तर धर्मसंस्थापक, प्रमाणभूत धर्मग्रन्थ अथवा अमीमांस्य अशीं विशिष्ट मतें Dogmas ह्यांना धर्माच्या व्याख्येंत कोठेच जागा मिळणें शक्य नाही. पाश्चात्य लेखकांनी धर्माची व्याख्या करण्यांत हीच चुकी केली आहे. येशू ख्रिस्त आणि बायबल, महंमद आणि कुराण हीं डोळ्यांपुढे ठेवून

तन्निर्दिष्ट गोष्टीचें अव्यभिचारित्व धर्माशीं त्यांनी प्रतिपादिलें आहे. एखाद्या तीव्र बुद्धीच्या माणसाने मी परमेश्वराचा दूत आहें म्हणावें, अमुक गोष्टीवर तुम्ही विश्वास ठेवा व अमुक तऱ्हेने वागा असें आपल्या अनुयायांस सांगावें व अशा रीतीनें धर्माची संस्थापना करावी व असें होणेंच सर्वथा उचित आहे अशी पाश्चात्यांची दृढमूल कल्पना होऊन बसल्यामुळे धर्माचें विवेचन त्यांच्या हातून व्हावें तसें निर्दोष होत नाही. व्यक्त्युत्पन्न धर्माची स्थिति सांचलेल्या पाण्याप्रमाणे होणार ह्यांत संदेह नाही. असें पाणी वर्षाऋतूंतील सतत वाहणाऱ्या जलौघाची बरोबरी कशी करूं शकणार?

धर्माला मूलभूत असणाऱ्या गोष्टी कोणत्या हें निश्चित केल्यावर तदनुरोधाने आर्यधर्माचें निरीक्षण करणें सोईचें होईल. ईश्वराचें अस्तित्व तर प्रत्येक धर्माला मान्य असलेंच पाहिजे व आहेहि; म्हणून त्याविषयी विशेष लिहिण्याचें कारण नाही. इतर धर्माहून आर्यधर्माचें भिन्नत्व दुसऱ्या दोन गोष्टींत आहे. पुनर्जन्म आर्यधर्मांत प्रतिपादन केला आहे, एवढेच नव्हे, तर पुनर्जन्मावरच आर्यधर्माची इमारत रचली गेली आहे. त्याचप्रमाणे मनुष्य व ईश्वर ह्यांमधील संबंधाचा शोध आर्यधर्माप्रमाणे दुसऱ्या धर्माने केलेला दिसत नाही. परमेश्वर व मनुष्य ह्यांमधील नातें आपण ठरवूं त्यावर धर्माचें उन्नत अगर अवनत स्वरूप अवलंबून राहणार. पुनर्जन्म मानला नाही तर नीतिबद्ध आचरणाला प्रेरक कांही राहत नाही, हें मागे सांगितलेंच आहे. आता परमेश्वराचा व आपला संबंध काय ह्याचा विचार केला तर आर्यधर्माशिवाय इतर सर्व धर्मांत दोहोंमध्ये कायमचा भेदभाव मानला आहे. जीवात्म्याचें परमात्म्याशीं ऐक्य फक्त आर्यधर्मानेच प्रस्थापित केलें आहे. ह्या गोष्टीचा आचारावर अगर व्यावहारिक धर्मावर फार परिणाम होतो. दासवृत्तींत असतांना मनुष्याचें वर्तन असतें, तेंच मी धनी आहें हें त्यास समजतां क्षणींच बदलतें हा आपणांस अनुभव आहे. मी स्वतःच परमात्मस्वरूपी

आहे, फक्त अज्ञानपटल अगर भ्रमनिरसन केलें म्हणजे झालें; असें एकदा मनाला पटलें, म्हणजे मनुष्य त्या दिशेनें जाऊं लागेल. उलट परमेश्वरामध्ये व माझ्यामध्ये महान् अंतर आहे, परमेश्वर सर्व शक्तिमान्, मी अल्पशक्ति; तो सर्वज्ञ, मी अल्पज्ञ; तो धनी, मी दास; तो निर्दोष, मी सदोष अशा तऱ्हेचा भिन्नभाव पतकरला तर तदुचित आचरणहि निराळें होणार हें उघड आहे. अद्वैतवादाचा अंगीकार सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतहि केला जात आहे. ह्यावरून हें मत सर्वमान्य होणारसें दिसतें. तात्पर्य, पुनर्जन्म व जीवपरमात्म्यैक्य ह्या त्रिकालाबाधित सिद्धांतावर आर्यधर्माची उभारणी झाली असल्यामुळे, आर्यधर्मास सनातन धर्म म्हणण्याचा प्रघात आहे. आर्यधर्माचीं हीं तत्त्वें म्हणजे आर्य ऋषींच्या अनेक युगांच्या अनुभवाचीं व विचारांचीं फळें होत. एकाच व्यक्तीच्या म्हणण्यास आर्यधर्मांत कधीच महत्व दिलें जात नाही. ह्याच हेतूनें स्वतः अवतारी कृष्णांनी अर्जुनाला "तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते" असें सांगून माझ्या शब्दापेक्षा शास्त्रावर तूं विश्वास ठेव असें बजाविलें. शास्त्रें म्हणजे अनेकांचें अनुभवजन्य ज्ञान होय. उत्क्रान्तितत्व आर्यधर्मालाच लागू आहे, इतर धर्मांना नाही. तर्काची कसोटी आर्यधर्माला लागू पडेल तशी दुसऱ्या धर्मास लागू पडणार नाही. अन्यधर्म एकतंत्री आहेत तर आर्यधर्म बहुतन्त्री आहे. आर्यधर्माचें स्वरूप प्रजासत्ताक आहे; तदितर धर्मांचें राजसत्ताक आहे. व्यक्तितन्त्रधर्म सनातन असणें शक्य नाही. आर्यधर्माचीं तत्त्वें चिरकालीन आहेत; कारण त्यांचा पाया अखंड आहे.

इतर धर्मांशीं तुलना करून आर्यधर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रधान हेतु प्रस्तुत लेखांत नसल्यामुळे, पुनर्जन्मकल्पनेच्या अभावीं इतर धर्म कसे पांगळे झाले आहेत, ह्याचें सविस्तर विवेचन करण्याचें कारण नाही. परिणत स्थितीस पोंचलेल्या धर्माचीं मूलभूत तत्त्वें जीं अवश्य असावयास पाहिजेत, तीं वर निर्दिष्ट केलीं

आहेत व तीं सर्व आपल्या आर्यधर्मांत सापडतात हेंहि वर सांगितलेंच आहे. परंतु आतापर्यंत जें विवेचन झालें तें धर्माच्या तात्त्विक बाजूचें झालें. धर्माचें जें व्यावहारिक अंग असतें त्याचा आता आपणांस विचार कर्तव्य आहे. अर्थात् आपणांस प्रथम आचाराकडे वळलें पाहिजे. कोणत्याहि धर्मांत आचाराचें प्राबल्य आहेच. परंतु अमुक आचार इष्ट कां व अमुक अनिष्ट कां ह्याचें सयुक्तिक व सप्रमाण उत्तर मात्र सर्व धर्मांत मिळत नाही. परमेश्वर न्यायी आहे, दयाळू आहे त्याप्रमाणेच मनुष्यांनीहि होण्याचा प्रयत्न करावा असा प्रत्येक धर्माचा कटाक्ष आहे. पण परमेश्वर व मनुष्य ह्यांमध्ये जर कायमचा भेदभाव आहे, परमेश्वराचें सामर्थ्य अमर्यादित, मनुष्याचें संकुचित; परमेश्वराचें बुद्धिसामर्थ्य अफाट, मनुष्याचें तुटपुंजीचें अशी स्थिति जर आहे, तर ईश्वरी निर्दोषत्व आपणांमध्ये आणि तेंहि सर्वथा प्रतिकूल परिस्थिति असतां आणण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद नसलें तरी असाध्य होय हें कोणत्याहि विकारहीन मनुष्यास पटण्यासारखें आहे. मनुष्य व ईश्वर ह्यांमध्ये अभिन्नत्व आणि तादात्म्य मानलें तरच वरील प्रयत्नाची सफलता संभवनीय कोटीपैकी वाटतें. गुलामाने आपली कितीहि उन्नति करण्याचा प्रयत्न केला तरी त्याच्या उन्नतीला सीमा आहेच. तो गुलामाच्या स्थितींत आहे तोंपर्यंत सीमा ओलांडून जाणें त्यास शक्य नाही. आणि तसें न झालें तर त्यास दोष देण्यास कोणास कसा अधिकार पोचतो हें समजत नाही. पण हा विचार सोडून दिला तरी एकदा पुनर्जन्म कबूल केल्यावर ज्या कृत्याने ह्या जन्मीं आपल्या आत्म्याची उन्नति होईल निदान अवनति होणार नाही, त्या कृत्यास धर्माची मंजुरी मिळाली पाहिजे असें मानणें भाग पडतें. आता प्रत्येकाचा आत्मिक अगर मानसिक विकास सम प्रमाणांत असणें शक्य नसल्यामुळे, एकाचा धर्म तोच दुसऱ्याचा धर्म असणें संभवत नाही. माणसें उत्क्रान्तीच्या जिन्याच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असल्याकारणाने

अगदी खालच्या पायरीवर उभा राहणारा व अगदी वरच्या पायरीवर चढून गेलेला ह्या दोहोंना एकच धर्मबन्धन लागू करणें अन्यायमूलक तर आहेच, पण निकृष्ट दर्जाच्या माणसाने परिणत बुद्धीच्या माणसाचा धर्म आचरणांत आणण्याचा प्रयत्न करण्याने केव्हा केव्हा त्याचा अपकर्षच होण्याचा अधिक संभव असतो. ही गोष्ट आमच्या ऋषींच्या ध्यानीं येऊन चुकल्यामुळे त्यांनी सर्व लोकांना एकच धर्म सांगितला नाही; एवढेंच नव्हे, तर प्रत्येक माणसाचा बौद्धिक विकास जन्मादारभ्य सारखा नसल्यामुळे वयपरत्वें प्रत्येक माणसाला निरनिराळे धर्म त्यांनी घालून दिले आहेत. आर्यधर्माचें हें विशिष्टत्व लक्षांत ठेवणें अवश्य आहे. इतर कोणत्याहि धर्मामध्ये हें तत्त्व आढळून येत नाही. सर्वांना समान लेखणें म्हणजे मुक्त व पशु ह्यांत फरक न करण्यासारखें मूर्खपणाचें आहे. चातुर्वर्ण्य व आश्रम ह्यांच्या मुळाशीं वरील तत्त्व आहे हें निराळें सांगावयास नकोच. ह्या जगावर प्रेम ठेवणें म्हणजे परमेश्वराचें शत्रुत्व संपादन करणें होय, हा बायबलांतील सर्वांना सारखाच केलेला उपदेश शेंकडा नव्याण्णव माणसांच्या संबंधाने अनाठायीं होय ह्यांत शंका नाही. ह्याचा अर्थ असा होतो कीं, सर्व धर्मांत उच्चतम तत्त्वेंच गोंवलेलीं असल्यामुळे ते ते धर्म फारच थोड्या लोकांसंबंधाने कार्यक्षम होतात. बहुजनसमूहास वास्तविक कांहीच धर्म राहत नाही व मग ते धर्महीन बनतात. ख्रिस्ती धर्मासंबंधाने ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवास येत आहे अशाबद्दल तद्धर्मोपासकांचाच पुरावा देतां येईल. " That Christianity as an intellectual or as a spiritual force holds great dominion over commercial or even over social life, the growth of intemperance, the laxity of morals and the daily revelations of our law courts afford no proofs; while a superficial knowledge of the life of the majority of successful

businessmen offers little support to the altruism of the Christian ideal "

Dynamics of the Fiscal Problem, page 80.

राजशासन आणि धर्मशासन ह्यांत मोठा फरक आहे. शारीरिक अपराधांबद्दल राजास शिक्षा करतां येते. मानसिक अपराधांबद्दल राजाचें दौर्बल्य सर्वांस कबूलच आहे. पण धर्माचा अम्मल मनावर विशेषत: असतो. मनाला वळण लावून तें पूर्णावस्थेस आणण्याचें काम धर्माचें असतें. तें मनास पायरीपायरीनें शिक्षण देऊनच करावें लागतें. सर्वांवर एकच बोजा लादल्याने कांही त्याखाली चिरडून मात्र जातील. व्यक्तिव्यक्तींमधील ही स्वभावसिद्ध भिन्नता ज्या धर्मानें ओळखली नाही तो धर्म शाश्वत टिकणें शक्य नाही. आर्यधर्माला " सनातन " हें विशेषण कसें शोभतें व ते किती अन्वर्थक आहे हें ह्यावरून कोणासहि समजण्यासारखें आहे. " श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः " हीं जीं धर्मप्रमाणें मनूने सांगितलीं आहेत त्यांतील " स्वस्य च प्रियमात्मनः " ह्याचा वास्तविक अर्थ काय असला पाहिजे व त्यांतील रहस्य काय आहे हें आता वाचकांच्या सहज लक्षांत येईल. आपल्या आत्म्याला प्रिय म्हणजे इष्ट, पथ्यकर असेल तदनुसार आचरण्याने धर्महानि होत नाही असें प्रतिपादण्याचा मनूचा आशय आहे. आपल्या आत्म्याची उन्नति कोठपर्यंत झाली आहे, कोणत्या कृत्यानें ह्या उन्नतीचा ऱ्हास होणार नाही हें ज्याचें त्यानेच ठरविलें पाहिजे. ह्याच तत्त्वावर स्त्रीने पुनर्विवाह करणें धर्मबाह्य म्हणतां येणार नाही. पतिनिधनानंतर स्त्रीनें अविवाहित राहवें हा उत्कृष्ट धर्म होय. असें उच्च ध्येय आमच्या पुढे ठेवल्याबद्दल आपण आमच्या ऋषींचे उपकार कधीहि विसरतां कामा नये. त्यावरून आम्ही संस्कृतींत इतर समाजांचा पुढे किती आहों हें व्यक्त होतें. परंतु, परिस्थितीमुळे शिक्षणाभावानें अगर नैसर्गिक मानसिक दौर्बल्यामुळे ज्या स्त्रीला विधवावस्थेंत शुद्धाचरण

राखणें शक्य नसेल तिने आपलें आत्मपरीक्षण करून पुनर्विवाह करण्याचें ठरविल्यास तें सदोष असलें तरी अधार्मिक म्हणतां येणार नाही. कारण वैधव्यांत तिच्या आत्म्याची अवनति होण्याचा संभव असेल तर ती न होऊं देणे हें तिचें आद्यकर्तव्य आहे. आमच्या धर्मांत हातून घडलेल्या दोषांबद्दल प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत त्यांचा अलीकडील लोक उपहास करीत असतात. परंतु नितान्त धार्मिक आचरण व गौण अथवा दोषयुक्त आचरण ह्यांतील फरक समाजाच्या मनावर बिंबविण्यास प्रायश्चित्तांची अवश्यकता आहे हें विचारी माणसांस सम्मत होण्याजोगें आहे. नाहीतर धार्मिक तत्त्वांचा विपर्यास झाल्याशिवाय राहणार नाही. सध्या हीच स्थिति अनुभवास येत आहे. पुनर्विवाह करणें, अस्पृश्य जातीच्या माणसाने केलेलें अन्न सेवन करणें इत्यादि गौण आचार निर्दोष व प्रशस्त आचारांची जागा पटकावूं पाहत आहेत. उत्कृष्ट संस्कृतीचा जे उघड उघड अनादर करतात व भ्रष्टाचारांचें जे महत्त्व प्रस्थापित करूं पाहतात ते समाजाची नांव खडकावरच आदळणार असें वाटतें. अनिर्वाह पक्ष म्हणून गौण आचरण अनेक प्रसंगीं करावें लागतें ही गोष्ट कांही खोटी नाही. तथापि कोणता आचार शंभरनंबरी आहे व कोणता हीणकस आहे ह्याची समाजाला केव्हाहि विस्मृति पडतां कामा नये. व ही स्मृति सतत जागृत ठेवण्यास प्रायश्चित्तांचा उपयोग फार होतो. केवळ पैसे उकळण्याकरिता धूर्त ब्राह्मणांनी ही युक्ति काढलेली नाही. आर्यधर्माचें शास्त्रीयरीत्या अध्ययन केलें म्हणजे प्रायश्चित्तांचा भाग अगदी अवश्यक आहे अशी खात्री पटते. तत्त्वतःच आर्यधर्माचें साम्य अन्य धर्माशीं नसल्यामुळे त्यांतील सर्वच गोष्टी इतर कोणत्याहि धर्मांत आढळणार नाहीत अशा आहेत. अन्यधर्मीयांना आर्यधर्मांत सर्वत्र बेबंदशाही आहे असें वाटतें पण तो भ्रम आहे. आर्यधर्माची उभारणी शास्त्रीय पायावर केलेली आहे.

आतापर्यंत धर्माचा तात्विकदृष्ट्या विचार केला, म्हणजे कोण-

त्याहि खऱ्या सनातन धर्मांचीं मूलभूत तत्त्वें कोणतीं असलीं पाहिजेत तें सांगितलें. आर्यधर्मांत तीं सर्व आहेत हें निर्दिष्ट केलें. आर्य धर्म ह्या एका व्यक्तीच्या नांवाशीं अगर त्यानें प्रतिपादलेल्या विचारांशीं निगडित नसल्यामुळे तो सर्व जगाचा धर्म होण्यास पात्र आहे. निरंकुश हटवादाला आर्यधर्मांत जागा नाही. ह्या धर्माची सर्व भिस्त विचारावर आहे. अमुक एक मनुष्य असें सांगतो म्हणून तो धर्म समजावयाचा ही कल्पना आर्यधर्माला अपरिचित आहे. अखिल विश्वाचा धर्म होण्यास आमचा धर्म पात्र आहे असें म्हटलें म्हणजे इतर धर्मीयांना आमच्या धर्मांत येण्यास प्रतिबंध नाही असें कबूल करावें लागतें व आमचे पूर्वज आर्य असून त्यांनी अनार्य जे शूद्र त्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश केला ह्या गोष्टीवरून वरील अनुमानास आधार मिळतो. ह्याप्रमाणे आर्यधर्माच्या अंतरंगाचें परीक्षण केल्यावर त्याच्या बहिरंगाचें विवेचन करणें अधिक सोयीचें होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत
अनुक्रम........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों. दि. ..................

## लेखांक २ रा.

आर्षं धर्मोपदेशं च वेदशास्त्राविरोधिना ।
यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतरः ॥

—मनु.

प्रथमतः ज्याला सांप्रत हिंदुधर्म म्हणतात त्या धर्माच्या नांवाचा आपण विचार करूं. हिंदुधर्म हें नांव आमच्या धर्मास व हिंदु हें नांव आम्हांस परकीयांनी दिलें आहे हें सर्वविश्रुतच आहे. शास्त्र-

कारांनी तर आमच्या धर्मास कोणतेच नांव दिलेलें नाही. आता हिंदुधर्म हा शब्द सर्वांच्या तोंडीं बसला आहे ही गोष्ट खरी पण तो शब्द परकीयांनी प्रथम लावलेला म्हणून त्याज्य, इतकेंच नव्हे, तर शिवाय आमच्या धर्माचें रहस्य व श्रेष्ठत्व मनावर एकदम बिंबण्यास निरुपयोगी आहे. आर्यसंस्कृतींत अनार्यांना आणणें ही क्रिया ज्या धर्मांत चालते त्या धर्माला तसेंच अन्वर्थक नांव पाहिजे हें उघड आहे. हिंदु शब्दांत अनार्यांचा समावेश होतो तेव्हा सर्व हिंदूंचा समान दर्जाचा एकच धर्म आहे असा भ्रामक समज "हिंदुधर्म" ह्या शब्दाने होण्याजोगा आहे. शूद्र हे अनार्य असून ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे आर्य होत. "आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यम्" ह्या गौतमसूत्रावरील टीकाकाराने ही गोष्ट मान्य केली आहे. तो म्हणतो, "आर्यः त्रैवर्णिकः अनार्यः शूद्रः" तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य होत. "त्रयो वर्णाः द्विजातयः ब्राह्मणक्षत्रियवैश्याः" ( वसिष्ठ ). ह्यावरून आर्य आणि अनार्य ह्या दोहोंचा "हिंदू" त समावेश होतो हें उघड आहे. जगांतील सर्व मानवजातीचें वर्गीकरण केलें तरी तें आर्य आणि अनार्य ह्याहून निराळें असूं शकणार नाही. अर्थात् हिंदुधर्म, आर्य आणि अनार्य ह्या दोहोंचा म्हणजे सर्व मानवजातीचा असला पाहिजे. परंतु आर्य आणि अनार्य ह्यांच्या संस्कृतींत महदन्तर असल्यामुळे अनार्यांचा धर्म तोच आर्यांचा। असें ज्याच्या योगाने ध्वनित होतें, तो शब्द आम्हांस आदरणीय वाटणार नाही; आणि एवढ्याचकरिता "हिंदुधर्म" हा शब्दप्रयोग आमच्या धर्माच्यासंबंधाने करणें विवेकी माणसास सम्मत होत नाही. हिंदुधर्मांत अनार्य जरी समाविष्ट झाले असले तरी तसें होण्यांत आर्यसंस्कृतीचा परिणाम अनार्यांवर व्हावा हाच हेतु असला पाहिजे. आर्यांचा अनार्यांत लोप व्हावा, त्यांची संस्कृति नष्ट व्हावी हा आर्यानार्यसंयोगजन्य परिणाम कोणालाच इष्ट नाही. ह्या दृष्टीने विचार केला असतां "हिंदुधर्म" हा शब्द अप्रयोजक

ठरतो. हिंदुधर्माशिवाय आर्यधर्म, ब्राह्मणधर्म आणि वैदिकधर्म ही नांवेंहि आमच्या धर्मास दिलीं जातात. माझ्या मतें कोणत्या तरी नांवानें तो धर्म ओळखला जावा असा आग्रह असेल--आणि तो असणें यथार्थ आहे--तर आमच्या धर्मास वैदिकधर्म हें नांव देणें सयुक्तिक दिसतें. ब्राह्मणधर्म म्हटल्यानें ब्राह्मणांचा गौरव जरी होत असला तरी ह्या शब्दद्वयानें आमचा धर्म संबोधणें ऐतिहासिक दृष्ट्या चुकीचें होईल. कारण ब्राह्मण हेच मुळीं वैदिकधर्मानें निर्माण केले आहेत. आर्यधर्म हे शब्द वापरल्यानें धर्मास विशिष्टत्व येण्यास व इतर धर्मांहून आपल्या धर्माचें भिन्नत्व लक्षांत येण्यास कांहीच मार्ग नाहीं. इंग्लिश लोकांचा धर्म, जपानी लोकांचा धर्म असें म्हणण्यानें कांहीच अर्थबोध होत नाहीं. शिवाय हल्लीं युरोपियन लोकहि आपणांस आर्य म्हणवितात म्हणून सर्व गोष्टींचा विचार करतां आपल्या धर्मास वैदिकधर्म म्हणजे वेदविहितधर्म ह्या नांवानें उल्लेखणें चांगलें. आमच्या धर्मांतील प्रमुख तत्त्वें वेदाशिवाय इतरत्र कोठेंहि आढळावयाचीं नाहींत. तीं समजून घेण्यास प्रो. मॅक्स मुल्लरप्रमाणें वेदाध्ययनच केलें पाहिजे. सारांश, हिंदुधर्म हा शब्दप्रयोग सोडून आपल्या धर्मास वैदिकधर्म म्हणण्याचा परिपाठ लोकांनीं पाडावा हें बरें दिसतें.

धर्माची व व्यवहाराची फारकत पाडली पाहिजे असें कांहीं लोक प्रतिपादन करीत असतात. पण अशा लोकांस धर्माचीं मूलतत्त्वेंच समजलीं नाहींत असें म्हणणें भाग पडतें. हा आपला संसार म्हणजे एक मोठें विश्वविद्यालयच आहे. त्यांत आपल्या आत्म्याची एकसारखी परीक्षा घेतली जाते व ह्या परीक्षेच्या निकालावर पुनर्जन्मीं पुढच्या अगर खालच्या वर्गांत जाणें अवलंबून असतें. आपण विचार करतों, बोलतों अथवा अन्य कर्म करतों त्या प्रत्येकाची नोंद असते. किंवा असें म्हणावयाचें नसेल तर त्या त्या विचाराचे अगर कर्माचे संस्कार मनावर होऊन ते पुढच्या जन्मांतील

फळें तयार करीत असतात. तेव्हा धर्माचा आणि व्यवहाराचा वियोग होणें अशक्य आहे, एवढेंच नव्हे, तर नीतिशास्त्रहि धर्मापासून अलग करूं पाहणें निरर्थक होय. धर्म म्हणजे परमेश्वराच्या मर्जीखातर कांही निरर्थक गोष्टी करणें असा ज्यांचा समज असेल त्यांनाच हें म्हणणें शोभेल. नीतिशास्त्र म्हणून आमच्यांत निराळें मानलें नाही ह्यांतील बीज हेंच होय. परद्रव्यापहरण अनिष्ट कां ? तर त्यायोगाने आपल्या आत्म्याची अवनति होते म्हणून; आत्मिक अवनति करून घेऊन आपण विषयसुख मिळवतों. अर्थात् ही गोष्ट धर्माला संमत नाही. कारण ज्या कृत्याने आत्मापकर्ष होईल तें कृत्य अधार्मिक होय हें मागे सांगितलेंच आहे. म्हणून धर्माचा अंमल व्यवहारांतहि अनियन्त्रित असला पाहिजे. आठवड्यांतून एकदा चर्चमध्ये गेल्याने किंवा देवावर दररोज पाणी सोडल्याने तुमचें धार्मिक कर्तव्य आटोपलें, मग तुम्ही पाहिजे तसे वागा, असें सांगण्याइतका परमेश्वर अथवा कोणताहि धर्मसंस्थापक खास खुळा नाही. धर्म म्हणजे एक स्वतंत्र अलग असें खातें नाही, सर्व व्यवहाराला पुरून धर्म उरला आहे. धर्माच्या करड्या नजरेंतून अंतःकरणांत उद्भूत होणारा सूक्ष्म विचारांकुरहि सुटणें अशक्य आहे. प्रत्येक व्यावहारिक कृत्यांत धर्म अनुस्यूत झाला आहे. हें तत्त्व आमच्या ऋषींना पूर्णपणें अवगत होतें म्हणूनच त्यांनी धर्माचरणापासून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष प्राप्त होतो असें निर्धास्त विधान केलें आहे. ऐहिक सुख प्राप्त होण्यासहि धर्माचरण अवश्य आहे असें आमच्या ऋषींचें आग्रहपूर्वक सांगणें आहे. उदाहरणार्थ, दक्षस्मृतींतील खालील श्लोकांचा विचार करा:– " न क्लेशेन विना द्रव्यं द्रव्यहीने कुतः क्रिया ॥ क्रियाहीने न धर्मः स्याद्धर्महीने कुतः सुखम् ॥ " तेव्हा आता आम्हांला आमच्या वैदिक ऋषींनी धर्म तरी काय सांगितला आहे तें पाहूं.

सर्व व्यवहार धर्ममय असला पाहिजे असें एकदा मान्य केलें

म्हणजे धर्माचा अर्थ मनुष्याचें कर्तव्य असा होतो. ह्या जगांत निरनिराळ्या माणसांचीं निरनिराळीं कर्तव्यें असतात, त्यामुळे सर्वांना एकच धर्म पाळणें शक्य नसतें, हें जाणून आमच्या स्मृतिकारांनी वर्णाश्रमधर्म सांगितले आहेत. वर्णाश्रमधर्मव्यतिरिक्त हिंदु म्हणविणाऱ्या प्रत्येक माणसास सामान्य असें धर्माचरण सांगण्याचा प्रयत्न एकाहि स्मृतिकाराने केला नाही. ह्याची साक्ष खालील उताऱ्यांवरून पटण्यासारखी आहे.

( १ ) आश्रमेषु च सर्वेषु वर्णानामनुसर्वशः । प्रायश्चित्तविधिं कृत्स्नं वक्ष्यमाणं निबोधत ॥ अङ्गिर.

( २ ) चतुर्णामपि वर्णानामत्रिः शास्त्रमकल्पयत् । अत्रि.

( ३ ) आपस्तम्बं प्रवक्ष्यामि प्रायश्चित्तविनिर्णयम् । दूषितानां हितार्थाय वर्णानामनुपूर्वशः ॥ आपस्तम्ब.

( ४ ) अतःपरं प्रवक्ष्यामि जातिवृत्तिविधानकम् । औशन.

( ५ ) ब्रह्मचारी गृहस्थश्च वानप्रस्थो यतिस्तथा । एतेषां तु हितार्थाय धर्मशास्त्रमकल्पयत् ॥ दक्ष.

( ६ ) भगवन्म्लेंच्छनीताहि कथं शुद्धिमवाप्नुयुः । ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्चैवानुपूर्वशः । कथं स्नानं कथं शौचं प्रायश्चित्तं कथं भवेत् । किमाचारा भवेयुस्ते तदाचक्ष्व सविस्तरम् ॥ देवल

( ७ ) श्रुतिस्मृत्युदितं धर्मं वर्णानामनुपूर्वशः । प्राब्रवीदृषिभिः पृष्टो मुनीनामग्रणीर्यमः ॥ यम.

( ८ ) ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चैव तथापरः । एतेषां धर्मसारं यद्वक्ष्यमाणे निबोधत ॥ लघुविष्णु.

( ९ ) पप्रच्छुर्मुनयोऽपेत्य धर्मान्वर्णव्यवस्थितान् ॥ वेदव्यास.

( १० ) चातुर्वर्ण्यहितार्थाय शङ्खःशास्त्रमकल्पयत् । शङ्ख.

( ११ ) चातुर्वर्ण्यसमाचारं शृणुध्वं मुनिपुङ्गवाः । पराशर.

( १२ ) वर्णानामाश्रमाणां च धर्मान्नो ब्रूहि सत्तम । हरित.

( १३ ) वर्णानामाश्रमाणां च धर्मान्वद सनातन । विष्णु.

( १४ ) भगवन्सर्ववर्णानां यथावदनुपूर्वशः....धर्मान्नो वक्तुमर्हसि।
मनुस्मृति.

कांही स्मृतिकार आम्ही फक्त प्रायश्चित्तें सांगतों म्हणून म्हणतात, कांहींनी प्रस्तावना न करतां एकदम विषयाला आरंभ केला आहे. तथापि सर्वांनी वर्णाश्रमांकडे दुर्लक्ष करून धर्म सांगितला असें कोठेहि झालें नाही. ह्यावरून हें उघड होतें की, स्मृतिकारांच्या वेळीं चातुर्वर्ण्यव्यवस्था दृढमूल झाली होती. आता ह्या चार वर्णांकरिता कोणता धर्म सांगितला आहे तें पाहूं. धर्माप्रमाणे वागणें ह्या दिवसांत शक्य नाही; आमच्या धर्मामुळे आमच्या ऐहिक प्रगतीस अडथळा येतो; धर्म सोडल्यावांचून आमच्या राष्ट्राचा उद्धार होणार नाही अशा प्रकारच्या कल्पनांनी अलीकडील लोकांचीं मनें पीडित झालीं आहेत. पण त्यांत तथ्य किती आहे ह्याचाहि पुढील विवेचनाने उलगडा होईल. आमचे ऋषि हे मोठे सुधारक होते. हल्लीच्या सुधारकांतहि त्यांची बरोबरी कोणी करूं शकेल असें मला वाटत नाही. चित्तशुद्धीकरिता व आत्मोन्नतीकरिता करावयाचें कर्म आणि उपजीविकेसाठी करावयाचें कर्म ह्यांमधील भेद ऋषींनी स्पष्ट करून दाखविला आहे. पहिलें कर्म अवश्यक असून दुसरें ऐच्छिक आहे. गौतमसूत्रांतील उतारा खाली देतों त्यावरून वरील विधानाची सत्यता दिसून येईल.

द्विजातीनामध्ययनमिज्यादानम्। ब्राह्मणस्याधिकाः प्रवचनयाजनप्रतिग्रहाः। पूर्वेषु नियमस्तु॥ यावर हरदत्ताची टीका येणेंप्रमाणे आहे. "नियमः अवश्यकर्तव्यता। पूर्वाणि अध्ययनादीनि अवश्यकर्तव्यानि। अकुर्वन् प्रत्यवैति। कुर्वन् च अभ्युदैति। प्रवचनादीनि तु वृत्त्यर्थानीति। अतः अकरणे न प्रत्यवायः करणे न अभ्युदयः॥" द्विज म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य. ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चेति वर्णाश्चत्वारः। तेषामाद्या द्विजातयः" विष्णुस्मृति. ह्यावरून ब्राह्मणक्षत्रियवैश्यांचीं अवश्यक कर्तव्यें म्हणजे अध्ययन, यज्ञ आणि दान

हीं तीन होत. ( आपस्तम्बीय व वसिष्ठसूत्र पहा ). आता परमेश्वर व मनुष्य ह्यांविषयीच्या यथार्थ कल्पना जर आमच्या वेदांत असतील आणि त्या आहेत असें सर्व जग हळूहळू मान्य करूं लागलें आहे— तर वेदांचें अध्ययन—हल्लीच्या कालाला अनुसरून—केल्याने देशाचें अनहित कसें होईल हें समजणें कठीण आहे; दानाविषयी तर कोणालाच तक्रार करण्याचें कारण नाही. बाकी राहिला यज्ञ, त्यांतहि त्यागाची कल्पना गर्भित आहे; शिवाय यज्ञाचीहि संक्षिप्त आवृत्ति निघाल्यामुळे वैदिकधर्म पाळण्याची ज्याला इच्छा असेल त्यास तेंहि करणें अशक्य, खर्चाचें अगर कालक्षेपाचें वाटणार नाही. शूद्रांच्यासंबंधाने पुढे निराळें विवेचन करूं. सध्या सांगण्याचें तात्पर्य इतकेंच की, न केल्याने प्रत्यवाय येतो म्हणजे हिंदुत्वाची हानि होते, अशीं सर्व द्विजांचीं तीनच कर्में होत. स्मृतीप्रमाणे पुराणांत द्विजांचीं हींच प्रमुख कृत्यें म्हणून सांगितलेलें आहे. उ. " दानं दद्याद्यजेद्देवान्यज्ञैः स्वाध्यायतत्परः । नित्योदकी भवेद्विप्रः कुर्याच्चाग्निपरिग्रहम् । दानानि दद्यादिच्छातो द्विजेभ्यः क्षत्रियोऽपि हि । यजेच्च विविधैर्यज्ञैरधीयीत च पार्थिव । तस्याप्य (वैश्यस्य) ध्ययनं यज्ञो दानं धर्मश्च शस्यते ॥ " विष्णुपुराण. तेव्हा हिंदुधर्माचा अवश्यक भाग कोणता हें वरील स्मृतिपुराणवाक्यांवरून चांगलें व्यक्त होतें. हीं वचनें फार महत्त्वाचीं आहेत. कारण ह्या अवश्यक धार्मिक कर्तव्यांत आचाराचा बिलकुल समावेश केलेला नाही ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे.

निर्वाहाकरिता करावें लागणारें कर्म व धार्मिक म्हणून अवश्य गणले जाणारें कर्म ह्यांतील भेद आमच्या ऋषींनी स्पष्ट करून दाखविला आहे, हें मागे सांगितलेंच आहे. अध्ययन, यजन व दान हीं सर्व द्विजांची अवश्यक कर्में होत. उपजीविकेचीं साधनें म्हणून मात्र निरनिराळ्या वर्णांत निरनिराळीं कर्में सांगितलीं आहेत. " द्विजानां वृत्तयः ब्राह्मणस्य याजनप्रतिग्रहैः क्षत्रियस्य क्षितित्राणं,

कृषिगोरक्षणं वाणिज्यकुसीदयोनिपोषणानि वैश्यस्य ।" विष्णुपुराण. सर्व ऋषींची ह्या बाबतींत एकवाक्यताच आहे. वसिष्ठधर्मसूत्रांतून खालील उतारा घेतला आहे. "षट्कर्माणि ब्राह्मणस्य स्वाध्यायाध्ययनमध्यापनं यजनं दानं प्रतिग्रहश्चेति । त्रीणि राजन्यस्य अध्ययनं यजनं दानं च शस्त्रेण च प्रजापालनम् । एतान्येव त्रीणि वैश्यस्य कृषिर्वाणिज्यं पशुपाल्यं कुसीदं च ॥" थोड्याशा निराळ्या भाषेंत पण आपस्तम्बसूत्रांतहि ह्याच वृत्ति निर्दिष्ट केल्या आहेत. "स्वकर्म ब्राह्मणस्याध्ययनमध्यापनं यज्ञो याजनं दानं प्रतिग्रहणं दायाद्यं शिलोञ्छः । एतान्येव क्षत्रियस्याध्यापनयाजनप्रतिग्रहणानीति परिहाप्यदण्डयुद्धाधिकानि । क्षत्रियवैश्यस्य दण्डयुद्धवर्जं कृषिगोरक्ष्यवाणिज्याधिकम् ॥" ह्यामध्ये ब्राह्मणाच्या निर्वाहाच्या साधनांत वारसहक्काने प्राप्त झालेलें द्रव्य व शेतांत पडलेलीं धान्याचीं कणसें ह्या दोहोंची भर टाकलेली आहे. त्याचप्रमाणे वैश्यांना कुसीद म्हणजे सावकारीचा धंदा सांगितलेला नाही. पण सध्या याच्याशीं आपणांस कांही कर्तव्य नाही.

ह्याप्रमाणे धार्मिक अवश्यक कर्में निराळी काढल्यावर जगण्याकरिता करावीं लागणारीं कर्में अर्थातच गौण ठरतात. ही गोष्ट आमच्या स्मृतिकारांनी मान्य केली आहे. कारण परिस्थितीप्रमाणे हीं कर्में बदलण्यास हरकत नाही असा अभिप्राय त्यांनी स्पष्ट नमूद केला आहे. सर्व जनतेकडून वर्णाश्रमधर्म पाळले जावे हें बघण्याचें काम राजाचें आहे. वर्णाश्रमधर्म न पाळणाराला राजास शासन करतां येतें. परंतु ज्या भूमीवर क्षत्रियांचें राजवैभव नष्ट झालें तेथे वर्णाश्रमधर्म बुडालेच पाहिजेत. आपण सर्व कालशरण आहों. कालापुढे कोणाचा कांही उपाय चालत नाही. क्षात्रधर्म लुप्त झाला म्हणजे, बाकीचे धर्म आपोआपच नाहीसे होतात. अशा प्रसंगीं कोणत्याहि उपायाने निर्वाह करणें भाग पडतें. तथापि आपण ज्या वृत्तीचा अंगिकार करूं तिचे संस्कार मनावर होत असल्यामुळे तिच्यासंबंधाने घेववेल तितकी खबरदारी घेणें जरूर आहे. ह्याच

उद्देशाने गौतमांनी ब्राह्मणांस कृषिवाणिज्यांवर निर्वाह करण्याची परवानगी दिली आहे. पण शक्य तर प्रत्यक्ष काम दुसऱ्यांकडून करवावे असें त्यांचें म्हणणें आहे. "कृषिवाणिज्येवाऽस्वयंकृते कुसीदं च" आता कृषिकर्म हें वेदविद्यापोषक होणें संभवनीय नाही. विद्वान् माणसांच्या हातून इतर व्यवसाय चांगल्या रीतीने होत नाहीत हा आपला नेहमीचा अनुभव आहे. म्हणून बौद्धायन ऋषींनी वेळींच योग्य इशारा देऊन ठेवला आहे. ते म्हणतात—"वेदः कृषिविनाशाय कृषिर्वेदविनाशिनी। शक्तिमानुभयं कुर्यादशक्तस्तु कृषिं त्यजेत् ॥" म्हणजे शेतकीच्या नादीं लागलां तर ज्ञानार्जन व्हावें तसें होणार नाही; आणि विद्येच्या ठिकाणींच केवळ रममाण व्हाल तर कृषिकर्म नीट साधणार नाही. दोनहि गोष्टी चांगल्या रीतीने करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत असेल त्याने त्या बेलाशक कराव्या. पण हें महत्कृत्य सर्वांसच कांही साधत नाही. अशा माणसांनी शेती सोडून वेदाध्ययनच तेवढें संभाळावें. वरील अवतरण देण्याचा दुसरा एक उद्देश असा आहे की, ब्राह्मणाने कृषिकर्म आपत्काल नसतांहि करण्यास प्रत्यवाय नाही असें बौधायन मुनींचें मत दिसतें. येथे शारीरिक सामर्थ्याचा प्रश्न आहे. उपजीविकेचें साधन लुप्त झाल्यामुळे ब्राह्मणाने अन्यवृत्तीचा अंगीकार करावा की काय हा प्रश्न नाही. कारण तसें असतें तर कृषि सोडून वेदाध्ययन कर म्हणून सांगण्यांत कांही अर्थच नाही. ह्यावरून असें दिसतें की, कर्माचा म्हणजे वेदाध्ययनाचा म्हणजे ज्ञानार्जनाचा लोप न होऊं देतां जर कृषिवाणिज्य अगर सावकारी करतां येईल तर त्याचा निषेध शास्त्र करीत नाही. आपत्कालांत म्हणजे आपआपल्या धर्माचरणाने पोट भरत नसेल तर कोणताहि धंदा करण्यास आडकाठी ठेवलेली नाही. "आपदि अनन्तरा वृत्तिः" (विष्णु) असें सूत्र आहे. वसिष्ठांनी हीच गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे. "अजीवन्तः स्वधर्मेण अनन्तरां पापीयसीं वृत्तिमातिष्ठेरन् । न

तु कदाचित् ज्यायसी ॥" क्षत्रियाला क्षात्रधर्माने राहणें कठीण पडेल तर त्याने वैश्यवृत्ति स्वीकारावी. एकदम सेवावृत्ति पतकरूं नये. ह्याचप्रमाणे इतर वर्णांविषयी समजावें. परंतु वरच्या वर्णाची वृत्ति अवलंबिणें व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीने इष्ट नव्हे असा आमच्या ऋषींचा अभिप्राय होता. आणि तो अगदींच मूर्खपणाचा होता असें कोण म्हणेल ? धर्मग्रंथांच्या विरुद्ध ब्राह्मण आताच सेवाधर्माने वागूं लागले असा जो कित्येकांचा समज आहे तो चुकीचा आहे. गौतमसूत्रावरील वृत्तिकार म्हणतो, "याजनादि अलाभे ब्राह्मणः सेवादिना जीवेत् क्षात्रवृत्त्या वा वैश्यवृत्त्या वा जीवेत्" तात्पर्य, पोट भरण्याकरिता वाटेल तो धंदा करावा. "सर्वथा वृत्तिरशक्तौ" कुटुम्बधारणस्य असंभवः अशक्तिः तस्यां सत्यां सर्वथा वृत्तिः" (गौतमसूत्र व वृत्ति). त्याचप्रमाणे याज्ञवल्क्य पहा, "क्षात्रेण कर्मणा जीवेद्विशां वाप्यापदि द्विजः। आपद्गतः संप्रगृण्हन्भुञ्जानो वा यतस्ततः ॥" भागवतकारांनीहि विप्राला चतुर्विध वृत्ति मोकळी ठेवली आहे. "विप्रवृत्तिश्चतुर्धेयं श्रेयसी चोत्तरोत्तरा । जघन्यो नोत्तमां वृत्तिमनापदि भजेन्नरः । ऋते राजन्यमापत्सु सर्वेषामपि सर्वशः ॥" स्कंध ७ अ. ११. वरील सर्व अवतरणांवरून असा सिद्धान्त निघतो की, प्रसंग नसेल तेव्हा चातुर्वर्ण्यान्तर्गत लोकांनी आपआपलीं विहित कर्में करावीं; शक्य नसेल तेव्हा वरील वर्णाने आपल्याहून खालच्या वर्णाचीं कर्में उपजीविकेकरिता करण्यास हरकत नाही. परंतु खालच्या वर्णांनी वरच्या वर्णाचीं कर्में करूं नये. वरवर नुसते शब्द वाचणाराला हा नियम अन्यायमूलक वाटेल. पण थोडा विचार केला असतां त्यांत कोणत्याहि प्रकारचा अन्याय नाही अशी मनाची खात्री होईल. क्षत्रियाची वृत्ति म्हणजे "शस्त्रेण प्रजापालनम्" पण क्षत्रियांचा ऱ्हास झाला म्हणजेच आपत्काल प्राप्त होतो आणि वृत्त्यन्तर करणें भाग पडतें; तेव्हा वरील वर्णाच्या वृत्तीचा स्वीकार करावयाचा म्हणजे याचना करावयाची. ती कोणी

करूं नये. ह्या सांगण्यांत कांहीच गैर नाही. शूद्रांबद्दल सध्या येथे विचार करीत नाही. तथापि वर्णसंकर होत असतां अगर आत्मसंरक्षणार्थ वैश्यांनी शस्त्र हातांत धरण्यास प्रतिबंध नाही अशी वसिष्ठांची स्पष्ट अनुज्ञा आहे. "आत्मत्राणे वर्णसंकरे वा ब्राह्मणवैश्यौ शस्त्रमाददीयाताम्" । सारांश, आमच्या ऋषींनी आमच्यापुढे चातुर्वर्ण्याचें ध्येय ठेवलें आहे. वर्णधर्म पाळल्याने समाजाचें हित होतें व आश्रमधर्मानुसार वर्तल्याने स्वतःच्या आत्म्याची उन्नति होते असा त्यांनी विचारान्तीं निश्चय केलेला दिसतो. परंतु आपत्कालीं म्हणजे आपल्या वर्णधर्मावर निर्वाह होत नाहीसा झाला म्हणजे ज्याला जें साधन उपलब्ध होईल त्याचें त्याने बिनदिक्कत अवलम्बन करावें. शेतांत अगर अन्य धंद्यांत राबावें लागलें तर अध्ययनसातत्य अबाधित राहत नाही ह्याचा अनुभव सर्वांना असतोच. कारण नसतांना मात्र ब्राह्मणाने कोणत्याहि धंद्यांत पडूं नये असें मन्वादि ऋषींचें म्हणणें आहे. "योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् । स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥" मनु. आपत्काल मनुष्याला येतो तद्वत् समाजालाहि येतो. सध्या सर्व हिंदुसमाज आपत्काल अनुभवीत आहे. कारण आपला समाज सांप्रत परधर्मीयांच्या अमलाखाली गेला आहे. त्यामुळे आमच्यांतील एक वर्ण म्हणजे क्षत्रियवर्ण नष्टप्राय झाला आहे. त्या कारणाने त्यावर अवलंबून असलेले इतर वर्णहि नामशेष होणें स्वाभाविक आहे. अशी स्थिति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत आपण आपत्कालांतच गुरफटलेले आहों असें म्हणणें भाग आहे. ही स्थिति ब्रिटिश अमलापूर्वीच सुरू झाली होती. क्षात्रधर्माचा लोप झाला म्हणजे व्यापारहि नष्ट होतो व मग प्रत्येकाला शेतीवरच उपजीविका करावी लागते. वरच्या तीन वर्णांचा ऱ्हास झाल्यानंतर शूद्र तरी सेवा कोणाची करणार ? अशा प्रसंगीं उपजीविकेचीं दोनच साधनें प्रायः उपलब्ध असतात. एक राज्यकर्त्यांची सेवा व दुसरी शेती.

अशाहि प्रसंगीं आमचे ऋषि डगमगले नाहीत हें त्यांच्या बुद्धिसत्तेस व मुत्सद्दीपणास भूषणावह आहे. “ कृषिस्तु सर्ववर्णानां सामान्यो धर्म उच्यते । कृषिर्भृतिः पाशुपाल्यं सर्वेषां न निषिध्यते ॥ ” वृद्ध हारीत. राज्यक्रान्तीमुळे वर्णाश्रमधर्मांचा लोप झाला म्हणजे जगावें कसें हाच प्रश्न समाजापुढे असतो. धर्माची बाब कमी महत्त्वाची होते. कसेंतरी करून जिवन्त राहणें हाच धर्म बनतो. ही गोष्ट निर्भीडपणें प्रतिपादण्यास आमचे ऋषि कचरले नाहीत. “ देशभंगे प्रवासे वा व्याधिषु व्यसनेष्वपि । रक्षेदेव स्वदेहादि पश्चात् धर्मं समाचरेत् ॥ ” पाराशर. पहिल्या लेखांत सांगितल्याप्रमाणे कोणत्याहि परिस्थितींत आपल्यास आपल्या आत्म्याच्या उन्नत्यर्थ जें कांही करतां येईल तें केलें म्हणजे आपल्या धर्माची हानि होत नाही. पराशर ऋषींचाहि असाच अभिप्राय आहे. “ येन केन च धर्मेण मृदुना दारुणेन च । उद्धरेद्दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् ॥ ” धर्मशास्त्राचें अध्ययन न केलेल्या माणसांत आमच्या ऋषींचीं विचारपूर्ण वचनें विसंगत दिसतात. परंतु धर्माचें रहस्य अवगत असणाऱ्यास कोठेच विसंगतता आढळणार नाही; व कोणत्या प्रसंगीं कोणता आचार ठेवावा, ह्याविषयी त्यास शंकाहि येणार नाही. सारांश, ह्या लेखांत मी मुख्यतः दोन गोष्टी वाचकांच्या निदर्शनास आणतों. त्या या की, शूद्रेतर सर्व वर्णांचा धर्म– अवश्यक कर्तव्यें– म्हणजे स्वाध्याय यजन आणि दान होय. हीं आचरण्यास अडचण नाही. परंतु तेंहि शक्य नसेल तेथे त्यांचा त्याग झाला असतांहि पाप नाही. ह्या ठिकाणीं विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे की, ब्राह्मणांनी आपल्या हातांत विद्या ठेवली असा जो कित्येक लोक आरोप करीत असतात तो अगदी निराधार आहे. अध्ययन म्हणजे विद्यार्जन हें तीनहि वर्णांस– ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांस– सारखेंच विहित आहे. शूद्रांची गोष्ट अर्थात् निराळी आहे व त्यांच्यासंबंधाने मी स्वतंत्रच विवेचन करणार आहें त्यावरूनहि ह्या बाबतींत

ब्राह्मणांकडे कोणताहि दोष नाही असेंच प्राञ्जलपणानें कबूल करावें लागेल. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे ती ही की, प्रसंग पडला असतां वाटेल त्या वृत्तीने निर्वाह करण्यास आमच्या शास्त्रकारांची आडकाठी नाही. जुन्यानव्या समजुती ह्या बाबतींत चुकीच्या आहेत व त्याचें कारण केवळ धर्माविषयी अज्ञान होय. जुन्या लोकांस धर्म बुडाला असें वाटतें; व नवीनांस धर्म झुगारून देऊन आम्ही अलौकिक पराक्रम करीत आहों असें वाटतें. परिस्थितीप्रमाणे कराव्या लागणाऱ्या आचरणाने धर्म बुडतहि नाही अथवा त्याची कोणत्याहि तऱ्हेने हानि होत नाही, किंवा कोणास त्याचें उपबृंहणहि करतां येत नाही. वैदिकधर्म इतका व्यापक आहे की, त्यांत सर्वांचा समावेश होऊं शकेल. त्यास जुनाट वटवृक्षाची उपमा शोभेल.

---

## लेखांक ३ रा.

“ आचारः परमो धर्मः सर्वेषामिति निश्चयः ”

—वसिष्ठ.

परमेश्वराविषयी विचार करण्यास बहुजनसमूहास फुरसतहि नसते आणि जरूर तें बुद्धिसामर्थ्यहि नसतें. मानसिक उन्नति, अवनति, स्वकर्तव्य, नीतिमत्ता इत्यादिकांचें आकलन करण्यास त्यांच्या मनाची पात्रता नसते. परंतु अशांनीहि घसरत खाली जाऊं नये म्हणून त्यांना कोणी तरी मार्गदर्शक लागत असतो.

स्मृतिकार हे असे मार्गदर्शक होत. विचार तसा आचार व आचार तसा विचार असा सामान्य नियम आहे. दुष्ट विचारांच्या माणसांचा आचार चांगला असला तरी त्याची कोणी प्रतिष्ठा समजत नाही. ह्याच हेतूने वामनपुराणांत मन जोंपर्यंत भ्रष्ट आहे तोंपर्यंत नुसत्या बाह्य तपश्चर्येने शुद्धि होत नाही, असें सांगितलें आहे. " न शरीरस्य संक्लेशैरपि निर्दहनात्मकः । शुद्धिमाप्नोति पुरुषः संशुद्धं यस्य नो मनः ॥ " परंतु ज्यांचें मन कोरें आहे, म्हणजे वर सांगितल्याप्रमाणे ज्यांना स्वतः विचार करवत नाही, त्यांच्यासंबंधाने वसिष्ठऋषींनी म्हटल्याप्रमाणे आचार हाच परमधर्म हें विधान सत्यमूलक आहे. सदाचाराने वाईट मनहि सुसंस्कृत होतें; दुराचाराने चांगलें मनहि वाईट बनतें. अशा दृष्टीने श्रुतीचें म्हणणें की, " यथाकारी यथाचारी तथा भवति " हें अगदी यथार्थ आहे असेंच मानलें पाहिजे. म्हणून आचाराची कोठे प्रशंसा केली आहे तर अन्यत्र निन्दाहि केली आहे. तथापि ह्यांत विसंगति अथवा असंबद्धता आहे असें मात्र समजण्याचें कारण नाही.

आता आचार म्हणजे काय ह्याचा आपण विचार करूं. त्रैवर्णिकांना श्रुतीने यजन सांगितलें आहे. परंतु यज्ञ कसे, केव्हा, कोणत्या तऱ्हेने करावयाचे असे एतद्विषयक जे नियम त्यांस श्रौताचार म्हणतात. " श्रौतो धर्मोऽग्निहोत्रादिराचारस्तदनुष्ठितिः । " (माधव). ह्यावरून हें स्पष्ट दिसून येईल की, यज्ञ करणें हें मुख्य असून तो कोणत्या विधीने केला जातो हें गौण आहे. श्रौतानुष्ठानाशीं आपणांस येथे कांही कर्तव्य नाही. व्यावहारिक आचाराचीच छाननी आपणांस येथे करावयाची आहे. तीनहि वर्णांची सामान्य अशीं धार्मिक कर्तव्यें श्रुतीने सांगितलीं, परंतु निरनिराळ्या वर्णांच्या निरनिराळ्या आश्रमांतील जनांनी कशा रीतीने दैनिक आचरण ठेवावें ह्याविषयी श्रुतीची मुग्धता युक्तच आहे. आणि ह्या एका गोष्टीवरूनच आचाराचें गौणत्व आपोआप सिद्ध होतें. श्रौतस्मार्तधर्म

म्हणजे कोणता हें मत्स्यपुराणांत व्यक्त केलें आहे. "दाराग्निहोत्र-सम्बधमिज्या श्रौतस्य लक्षणम्" "स्मार्तो वर्णाश्रमाचारो यमैश्च नियमैर्युतः।" आणखी "इज्यावेदात्मकः श्रौतः स्मार्तो वर्णाश्रमात्मकः।". तात्पर्य, श्रुतीमध्ये सामान्य धर्माचें विधान असून स्मृतींमध्ये विशिष्ट धर्म निर्दिष्ट केले आहेत. आता वर्णभेदांमुळे व आश्रमभेदांमुळे आचारभिन्नता असणें स्वाभाविक आहे. आणि त्याप्रमाणे वर्णाश्रमानुरूप प्रत्येकास निरनिराळे धर्महि स्मृतिकारांनी घालून दिले आहेत. म्हणून वर्णाश्रमधर्मांना प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे स्मृति होत. "सर्वेषामुपनयनप्रभृति समान आचार्यकुले वासः। सर्वेषामनुत्सर्गो विद्यायाः॥" (आपस्तम्बसूत्र) इत्यादि प्रकारचे हे धर्म होत. वर्णाश्रमांशीं ज्या व्यावहारिक कृत्यांचा निकट संबंध नाही, तीं सर्व कृत्यें आचारांत मोडतात. "साधूनां च यथावृत्तमेतदाचारलक्षणम्।" असें आचाराचें लक्षण केलें आहे. जो आचार धर्माला हेतुभूत होतो त्या यजनयाजनात्मक आचाराला कर्म म्हणतात. "आचारो यस्य धर्मस्य कारणत्वेन वर्तते। सोऽयं यजनयाजनादिकर्मलक्षणो धर्मः समाचारः। श्रुत्यन्तरे च कर्मवृत्तयोर्भेद आम्नायते अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यादिति". ह्या अवतरणावरून कर्म आणि आचार ह्यांतील फरक वाचकांच्या लक्षांत येईल. शिक्षोपनिषदांतील "वृत्तविचिकित्सेचा" उल्लेख वरील उताऱ्यांत आलाच आहे. त्यावरील टीकेंत टीकाकार वृत्त ह्याचा अर्थ काय करतात तें आता आपण पाहूं. "वृत्तमाचारः कुलपरम्परागतः तस्मिन् विचिकित्सा संशयः यथा केषांचित् मातुलसुताविवाहमांसभक्षणादिकः किंचित् अपरेषां न इत्यादिदर्शनेन...." (शंकरानन्दकृत टीका). शंकरानन्द स्वामींनी आचाराचीं उदाहरणें दिलीं आहेत, तीं फार महत्त्वाचीं आहेत; त्यावरून व्यावहारिक सर्व गोष्टी— ज्यांना कर्म म्हणतां येत नाही अशा—आचारांत मोडतात हें उघड होतें. एखाद्या आचाराविषयी शंका आली तर शिष्ट वागत असतील त्याप्रमाणे आपण

वागावें असें शिक्षोपनिषदांतच सांगितलें आहे. त्यावर शिष्यानें ज्या शंका घेतल्या त्यांवरूनहि वरील विधानाला पुष्टिच मिळते. म्हणून तो संबंध उताराच येथे देतों. "ननु यद्यत् पूर्वैः कृतं तत्करणीयम्। तथा च जामदग्न्यः स्वजननीं जघान, शुनःशेपः स्वजनकं तत्याज, याज्ञवल्क्यस्त्वाचार्यं, गौतम इन्द्रमतिथिं, ब्रह्मा स्वसुतां जगाम, इन्द्र-स्त्रिशीर्षं ब्राह्मणं जघान, क्षत्रियो बलदेवः सुरां पपौ, सोमो गुरोर्भार्यां जहार, इत्यादि महतामाचारानुसारादहमप्यनुष्ठास्यामि इति अतः आह" वगैरे. अन्यत्रहि अशीच शंका घेतली आहे. "यदि शीलम् (अनुष्ठानं) प्रमाणं तर्हि अतिप्रसंगः स्यात् यथा वसिष्ठश्चाण्डालीमक्षमालां जगाम; कतकभरद्वाजौ व्यत्यस्य भार्ये जग्मतुः" गौतमसूत्र पहा. तात्पर्य, ह्या सर्व व्यवहारांचा अंतर्भाव "कर्मांत" न होतां "आचारांत" होतो हें विसरतां कामा नये.

ज्याप्रमाणे अग्निहोत्रादि कर्मांना श्रुति प्रमाण, वर्णाश्रमकृत्यांना स्मृति प्रमाण, त्याप्रमाणे आचारांना शिष्ट माणसें प्रमाण होत. शिष्ट कोणास म्हणावयाचें ह्याविषयींहि खुलासा ऋषींनी केला आहे. "शिष्टाः खलु विगतमत्सराः निरहंकाराः कुम्भीधान्याः, अलोलुपाः दम्भदर्प-लोभमोहक्रोधविवर्जिताः ॥" (बौधायन). "धर्मेणाधिगतो यैस्तु वेदः संपरिबृंहणः । ते शिष्टा ब्राह्मणाः ज्ञेयाः श्रुतिप्रत्यक्षहेतवः ॥" (गौतम-सूत्र). म्हणून श्रुति, स्मृति आणि सदाचार हे धर्माचे स्वतंत्र उगम होत. आचाराला स्मृति प्रमाण नाहीत. शिष्टांचें, धर्मनिष्ठांचें वर्तन हेंच त्या कामीं प्रमाणभूत होय. आता स्मृतींमध्ये आचार सांगितला आहे ही गोष्ट खरी आहे. पण तेवढ्यावरून आचारप्रामाण्य स्मृतींना येत नाही. स्मृतींमध्ये आचार सांगितला आहे त्याप्रमाणे व्यवहार म्हणजे कायदाहि आहे. इतकेंच नव्हे तर श्रुत्युक्त कर्महि स्मृतींत उल्लेखिलें आहे. उदाहरणार्थ—

कर्म स्मार्तं विवाहाग्नौ कुर्वीत प्रत्यहं गृही । दायकालाहृते वापि श्रौतं वैतानिकाग्निषु ॥—याज्ञवल्क्य.

श्रुतिप्रदेशांत स्मृति प्रवेश कसा करतात हें खालील वाक्यावरून समजेल. जैमिनीन्यायमालेंतून हें अवतरण घेतलें आहे. "यथा स्मर्यते औदुम्बरी सर्वा वेष्टयितव्या". परंतु हें विधान श्रुतिविरुद्ध आहे. श्रुति "औदुम्बरीं स्पृष्ट्वा उद्गायेत् सर्ववेष्टने स्पर्शः न संभवति अतः स्मृतिर्न प्रमाणम्। ह्यावरून ज्याप्रमाणे श्रौतकर्मासंबंधाने स्मृति प्रमाण मानतां येत नाहीत त्याचप्रमाणे स्मृतींमध्ये केवळ आचार कथन केला आहे म्हणूनच त्या प्रमाण मानणें सयुक्तिक दिसत नाही. स्मृतींचा उदय प्रायः वर्णाश्रमधर्मनिवेदन करण्याकरिता झाला आहे हें मागील लेखांत दिलेल्या उताऱ्यांवरून सिद्ध होतें. वर्णाश्रमधर्म आम्हांस सांगा, असा स्मृतिकारांस सर्व लोकांचा प्रश्न असतो. व त्यास मी तुम्हांस वर्णाश्रमधर्म सांगतों असें ऋषींचें उत्तर असतें. वर्णधर्म आणि आश्रमधर्म. (उदाहरण, "पालाशो दण्डो ब्राह्मणस्येति")–खेरीज करून इतर म्हणजे गुणधर्म, साधारण धर्म व निमित्तधर्महि स्मृतिकारांनी सांगितले आहेत ही गोष्ट विज्ञानेश्वरासहि मान्य आहे.

आता कोणास असें वाटेल की, वर्णाश्रमधर्मांतच आचाराचा समावेश होतो म्हणून आचाराला स्मृतिप्रामाण्यच धरलें पाहिजे. एवढ्या एका शंकेचें निवारण झालें म्हणजे आचाररूप धर्माला शिष्टवर्तनच प्रमाणभूत आहे असें सहज सिद्ध होईल. प्रथमतः हें ध्यानांत ठेवणें अगत्याचें आहे की, सांप्रत उपलब्ध असलेल्या स्मृति भर घालून वाढविलेल्या आहेत. रावसाहेब मण्डलिकांनी म्हटल्याप्रमाणे आचारानंतर व्यवहार, प्रायश्चितादि प्रकरणें स्मृतींत आलीं असलीं पाहिजेत. त्याचप्रमाणे माझ्या मतें आचारसुद्धा मूळच्या स्मृतींत नसावेत. प्राचीन स्मृति थोडक्या श्लोकांच्या असाव्यात असें हल्ली अनुमान करतात. ह्याला प्रत्यन्तर पाहणें असेल तर मत्स्यपुराणाचा चाळिसावा अध्याय पाहावा. ह्या अध्यायांत सहा श्लोकांत ययातीने वर्णाश्रमधर्म सांगितले आहेत. वर्णाश्रमधर्मांहून आचाराची

भिन्नता दाखविण्याकरिता ते सहाहि श्लोक येथे देणें अवश्य आहे.

(१) आहुताध्यायी गुरुकर्मसु चोद्यतः पूर्वोत्थायी चरमं चोपशायी ।
मृदुर्दान्तो धृतिमानप्रमत्तः स्वाध्यायशीलः सिध्यति ब्रह्मचारी ॥

(२) धर्मागतं प्राप्य धनं यजेत दद्यात्सदैवातिथीन्भोजयेच्च ।
अनाददानश्च परैरदत्तं सैषा गृहस्थोपनिषत्पुराणी ॥

(३) स्ववीर्यजीवी वृजिनान्निवृत्तो दाता परेभ्यो न परोपतापी ।
तादृङ्मुनिः सिद्धिमुपैति मुख्यां वसन्नरण्ये नियताहारचेष्टः ॥

(४) अशिल्पजीवी विगृहश्च नित्यं जितेन्द्रियः सर्वतो विप्रमुक्तः ।
अनोकशायी लघु लिप्समानश्चरन्देशानेकचरः स भिक्षुः ॥

(५) रात्र्या यथा चाभिरताश्च लोका भवन्ति कामाभिजिताः सुखेन च।
तामेव रात्रिं प्रयतेत विद्वानरण्यसंस्थो भवितुं यतात्मा ॥

(६) दशैव पूर्वान्दश चापरांस्तु ज्ञातींस्तथाऽऽत्मानमथैकविंशम् ।
अरण्यवासी सुकृतं दधाति मुक्त्वा त्वरण्ये स्वशरीरधातून् ॥

ह्या उताऱ्यांवरून वर्णाश्रमधर्मांत आचार आलेच पाहिजेत असें मानण्याचें कारण नाहीं. वर्णाश्रमांतील व्यवस्था स्मृतिकारांनी लाविली म्हणून एतद्विषयक प्रामाण्य त्यांच्या ठिकाणीं संभवतें. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणे "साधूनां च यथावृत्तम्" हेंच जर आचाराचें स्वरूप तर त्याला स्मृतींतील समय म्हणजे स्मृतिकारांनी सुचविलेले नियम प्रमाणभूत कसे होणार ? म्हणून स्मृतिशास्त्र आणि आचार यांतील भेद फार महत्त्वाचा आहे; व तो पूर्वीच्या विद्वानांनी निर्दिष्टहि केला आहे. उदाहरण, "समयः स्मृतिशास्त्रं त्वाचारःशिष्टानुवर्तनम्" (श्रौतसूत्रावरील महादेवकृत वैजयन्ती टीका). समय म्हणजे मनुष्यकृत व्यवस्था. "पौरुषेयी व्यवस्था समयः (आपस्तम्ब सूत्रावरील हरदत्ताची टीका). वर्णाश्रमांची व्यवस्था स्मृतिकारांनी केली आहे. ब्रह्मचाऱ्याने गुरुगृहीं बारा वर्षे कां रहावें? तर स्मृतिकार सांगतात म्हणून. स्मृतिकारांच्या वेळेस निरनिराळे लोक निरनिराळे व्यव-

साय करीत असत; तदनुसार सर्व जनतेचें वर्गीकरण स्मृतिकारांनीच केलें आणि आश्रमांची व्यवस्था स्मृतिकारांनीच लावली. वर्णाश्रम-व्यवस्थेंत कृत्रिमपणा दिसतो. वनांत जाऊन रहा असें सांगितल्या-शिवाय कोणीहि गृहस्थ आपण होऊन घर सोडून वनांत वास्तव्य करणार नाही. परंतु आचाराची गोष्ट अशी नसते. जसे आचार स्मृतिकारांना आढळले तसे त्यांनी लिहून ठेवले: "देशधर्मजातिधर्म-कुलधर्मांश्च श्रुत्यभावादब्रवीन्मनुः (वसिष्ठ). तेव्हा आचारांबद्दल शिष्ट-वर्तन प्रमाण होय असें ठरलें. स्मृतींशीं त्यांचा कांही संबंध नाही. शिष्टांचें लक्षण मागे दिलेंच आहे. युगमानाने शिष्टत्वांतहि फरक पडणें स्वाभाविक आहे. प्रत्येक युगाचें ध्येय निराळें असतें. करिता त्या त्या वेळेला जे जे शिष्ट असतील त्यांच्यामागूनच इतर जनांनी गेलें पाहिजे. शिष्टांना किंवा त्यांच्या वर्तनाला नांवें टेवण्यांत अर्थ नाही. पाराशर ऋषींनी ही गोष्ट बेधडक सांगितली आहे. "युगे युगे च ये धर्मास्तत्र तत्र च ये द्विजाः। तेषां निन्दा न कर्तव्या युगरूपा हि ते द्विजाः॥"

एका युगाच्या कसोटीला दुसऱ्या युगांतील शिष्ट जरी उतरले नाहीत तरी त्या युगांत केव्हाहि झालें तरी शिष्ट हे इतर लोकांपेक्षा श्रेष्ठ असणारच. त्यांचें वर्तन नुसतें निष्कलंक असतें एवढेंच नाही तर अत्युच्च दर्जाचें असतें. उच्च ध्येय सर्वांनाच साध्य होणें शक्य नाही, म्हणून प्रत्यक्ष व्यवहारांत शिष्टांच्या वर्तनाचें अनुकरण बहुजनसमाजाकडून होईलच असा नियम नसतो. तेव्हा ज्यांनी त्यांनी आपला मगदूर पाहून कमी दूषणीय असा मार्ग आक्रमण करावा हेंच इष्ट होय. ह्या उद्देशाने मनूने "स्वस्य च प्रियमात्मनः" हें धर्मप्रमाणांत एक सदर घातलें आहे. ह्याप्रमाणे "श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः" ह्याचा खरा अर्थ आहे. टीकाकारांनी केलेला अर्थ भिन्न आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे श्रुती-च्या विरुद्ध नसेल तेथे स्मृति प्रमाण; श्रुतिस्मृतींशीं विरुद्ध नसेल

असें एक सूत्र आहे. ह्यावरील टीका येणेंप्रमाणे—श्रुतं मन्त्रब्राह्मणविभागेन वेदार्थपरिज्ञानम् । श्रुतमूलमनुष्ठानम् । अनुष्ठानमूलो धर्मः । श्रुतेश्चाप्यनुच्छिन्नसंप्रदायो मूलम् । तस्मात् श्रुतस्य गरीयस्त्वम् ( गौतमसूत्र ). अगदी अशाच अर्थाचें वाक्य महाभारतांत आहे. आचारसंभवो धर्मो धर्मे वेदाः प्रतिष्ठिताः । वेदैर्यज्ञाः समुत्पन्ना यज्ञैर्देवाः प्रतिष्ठिताः ॥ ( वनपर्व ). तात्पर्य, रावसाहेब मण्डलिकांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे आमच्या सर्व शास्त्रांचा पायाच रूढीवर रचलेला आहे.

"श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्यस्य च प्रियमात्मनः ।" ह्यांतील आचार शब्दाचा अर्थ कांही टीकाकारांनी फारच संकुचित केला आहे. राघवानन्द म्हणतो, "विवाहादौ कंकणबन्धादिः". कुल्लूक म्हणतो, "कम्बलवल्कलाद्याचरणरूपः". ह्या आचारांचा आणि पापपुण्याचा कांही संबंध नाही. हे आचार धर्माला कारणीभूत नाहीत. शिवाय ह्या आचारासंबंधाने कुलाचार किंवा देशाचार असेल त्याप्रमाणे वागावें असें मनूने अन्यत्र स्वतंत्र विधान केलें असल्यामुळे उपरिनिर्दिष्ट श्लोकांतील आचार शब्दाचा अर्थ निराळा असला पाहिजे. कंकणबन्धादि आचारांकरिता शिष्टांकडे धांव मारण्यास कोण विचारी मनुष्य सांगेल ? कित्येक शिष्ट तर कंकणबन्धनापासून मुक्तच असतील. टीकाकारांनी केलेला अर्थ चुकीचा आहे. आचारांकरिता श्रुति प्रमाण मानावयास सांगणें म्हणजे श्रुतींची योग्यता कमी करणें होय. आचार म्हणजे लौकिक वृत्त ह्याविषयी श्रुतींत कांहीच सांगितलेलें नाही.* तेव्हा सर्व आचारांना नष्ट अगर विद्यमान श्रुतींचा आधार मानणें योग्य नव्हे. "उपदिष्टो धर्मः प्रतिवेदम्" असें बौधायन

* वरील मतास जैनधर्मग्रंथांतूनहि आधार मिळतो. उदा० "द्वौ हि धर्मौ गृहस्थानां लौकिकः पारलौकिकः । लोकाश्रयो भवेदाद्यः परः स्यादागमाश्रयः ॥"—( जैनसिद्धांत मासिक )

सूत्र आहे. ह्यांत उपदिष्ट याचा अर्थ "उपदेशः वेदः तेन कर्तव्यतया विहितः वैतानिक इति यावत्" (श्रौतसूत्रावरील वैजयन्ती व्याख्या) असा केला आहे. तेव्हा श्रुतीमध्ये उपदिष्ट असलेला धर्म म्हणजे वैतानिक–अग्निहोत्रविषयक–होय असेंच पूर्वीचे लोक मानीत आले. त्याप्रमाणे निरनिराळ्या युगांत निरनिराळे स्मृतिकार प्रमाण मानावयाचे आहेत. "कृते तु मानवो धर्मस्त्रेतायां गौतमः स्मृतः। द्वापरे शंखलिखितः कलौ पाराशरः स्मृतः॥" ह्यावरूनहि तेंच सिद्ध होतें. सर्व स्मृतिकार एकच आचार सांगतात हें म्हणणें ह्या श्लोकापुढे टिकत नाही. तसेंच प्रयोजन पडल्यामुळे निरनिराळ्या युगांत निरनिराळ्या स्मृतिकारांना अवतार घ्यावा लागला. सत्याषाढाचार्यांनी "ज्याप्रमाणे ईश्वराला निरनिराळे अवतार घ्यावे लागले त्याप्रमाणे स्मृतिकारांनाहि घ्यावे लागतात" असें म्हटलें आहे, तें अगदी यथार्थ आहे. "यतः एकः सर्वज्ञः सर्वशक्तिरपि ईश्वरः अपि न प्रभवति एकेन अवतारेण सकलं प्रयोजनं साधुयितुं इति नाना अवतरन्ति तथा स्मृतिकाराः"

आचारांबद्दल जर स्मृतिच प्रमाण असल्या तर श्रुतींविरुद्ध स्मृतींनी ह्या बाबतींत केलेलें बंड कोणींहि चालू दिलें नसतें व स्मृतिकारांनीहि इतकी धिटाई केली नसती. श्रुतिकालीं प्रचलित असलेले कांही आचार–मांसाशन व सुराग्रह–हे स्मृतिकारांनीच बंद पाडले. "न मांऽसमश्नाति" असें एक हिरण्यकेशीय श्रौतसूत्र आहे. यज्ञ करणाऱ्या इसमास जे नियम पाळावे लागतात त्यांपैकी त्याने मांसाशन करूं नये असा एक नियम आहे. अर्थात् ह्या प्रसंगाव्यतिरिक्त मांसभक्षणास प्रत्यवाय नव्हता, असें असून मांसभक्षणाचा निषेध स्मृतिकारांनीच केला आहे. वरील सूत्रावरील टीकाकार म्हणतात, "अयं वैधव्यातिरिक्तमांसाशनप्रतिषेधो युगान्तर उपयुज्यते कलौ तु मांसाशनस्य सर्वथैव निषेधेन तदप्राप्तिरेव". त्याचप्रमाणे दुसरें एक सूत्र "सौत्रामण्यां सुराग्रहः" असें आहे. त्यासंबंधाने व्याख्याकार

गोपीनाथ म्हणतात, " अक्षतागोपशुश्चैव श्राद्धे मांसं तथा मधु इत्यादिभिः कलिवर्ज्यविषयकवचनैर्विशेषनिषेधेनाग्निष्टोमादीनां गोव्यतिरिक्तच्छागादिपशूनां च निषेधाभावस्यार्थादेव प्रदर्शनात्. " सारांश, श्रुतिकालीन आचार ह्या युगांत चालू ठेवणें इष्ट न वाटल्यामुळे स्मृतिकारांनी बंद केले हें कोणत्या आधारावर ? आचाराला प्रमाण जर श्रुतीचें असतें तर स्मृतिकारांनी असें साहस कधींहि केलें नसतें व त्यांचें कोणीं ऐकलेंहि नसतें. परंतु मांसभक्षण अगर सुरापान न करणें हें सर्वशिष्टसंमत झालें तेव्हा तो अनुभव पुढील पिढ्यांकरिता स्मृतिकारांनी नियमरूपाने लिहून ठेविला.

श्रुतीच्या विरुद्ध स्मृति असतां कामा नये हा नियम बरोबर आहे. पण तो आचारासंबंधाने नाही. श्रुतीच्या आत्मप्रदेशांत स्मृतीने ढवळाढवळ करतां कामा नये व केली तर ती कोणी चालूहि देणार नाही. " श्रुतिविरोधे स्मृतिर्न प्रमाणम् " ह्या वचनाचा अंमल फक्त श्रौत कर्मांत चालतो. पूर्वमीमांसेंतील उदाहरण " औदुम्बरी सर्वा वेष्टयितव्या " हें पूर्वी दिलेंच आहे. सारांश, श्रुतिस्मृतींचे प्रान्त भिन्न आहेत व आपापल्या प्रान्तांत त्यांचा अधिकार अबाधित आहे ह्यांतहि शंका नाही. " स्मार्तं वैवाहिके वह्नौ श्रौतं वैतानिकाग्निषु । कर्म कुर्यात्प्रतिदिनं विधिवत्प्रातिपर्व च " ( वेदव्यासस्मृति). वर्णाश्रमधर्मांपैकी विवाहाग्नीवर हवन करणें हा एक धर्म आहे म्हणून तद्विषयक प्रामाण्य स्मृतींच्या ठिकाणींच संभवतें.

वरील विवेचनावरून श्रुति, स्मृति व सदाचार हीं धर्माचीं स्वतंत्र प्रमाणें आहेत हें सिद्ध होण्यास अडचण पडणार नाही. "स्वस्य च प्रियमात्मनः" हें चौथें प्रमाण आहे. ह्याचाहि अर्थ करण्यांत टीकाकारांची भूल झाली आहे असें मानावें लागतें. हें करावें अगर तें करावें असें असेल तेथे आपणांस इष्ट तें करावें असा अर्थ टीकाकार लावतात. परंतु ह्यावर कोणी असें विचारील की, दोनहि गोष्टी करण्यास श्रुतिस्मृतींची परवानगी असली तर कोणतीहि गोष्ट केली

तरी त्यास श्रुतिस्मृतींचा आधार आहेच. मग हें मनूने चौथें प्रमाण निराळें म्हणून कां सांगावें? बरें, विकल्प असतां इष्ट तें करावें हा अर्थ सगळ्याच टीकाकारांनी मान्य केला नाही. रामचंद्राने केलेला अर्थ अधिक खोल व समंजसपणाचा आहे. तो म्हणतो "स्वस्य-स्वकीयस्य बन्धोः आत्मनश्च यत्प्रियं स सदाचारः। आत्मनः प्रियं परदाराभिमर्शनं प्रियं भवेत् चेत् तन्न। बन्धूनां तत्प्रियं न." ज्या कृत्यापासून इतरांना त्रास होणार नाही तें कृत्य अनिंद्य मानण्याचें जें एक पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचें माप आहे तेंच माप त्यांच्यापूर्वी आमच्याकडल्या विद्वानांनीहि वापरलेलें दिसतें. पण ह्यांत एक दोष आहे. तो हा की, शिष्टांचें नेहमी असेंच वर्तन असतें. सदाचार म्हणून धर्मप्रमाण पूर्वी सांगितलेंच आहे. त्याचेंच "स्वस्य च प्रियमात्मनः" हें एक व्याख्यान झालें; परंतु मनूने तर हीं चार स्वतंत्र प्रमाणें सांगितलीं आहेत. म्हणून हा अर्थहि योग्य आहेसें दिसत नाही. प्रत्येकाला स्वतंत्र प्रमाण मानतां येईल असाच अर्थ केला पाहिजे. आणि तो मागे निर्दिष्ट केल्याप्रमाणे आहे. शिष्टांचें वर्तन सदाच अत्युच्च दर्जाचें असणार. सामान्य माणसांनी अक्षरशः अनुकरण करणें शक्य नाही. करता आपल्या आत्म्याला जें प्रिय म्हणजे हितावह असेल तें त्याने करावें. मला इतरांप्रमाणे मोठी उडी घेतां आली नाही तर जितकी घेतां येईल तेवढीच घ्यावी. पतिमरणोत्तर अन्य पति न करणें हा उत्तम मार्ग. पण ज्या स्त्रीचा आत्मा इतक्या उच्च स्थितीप्रत पोंचला नसेल तिने अवनति टाळण्याकरिता पुनश्च विवाह करण्यास हरकत नाही. एकीकडे तर स्मृतिकार उच्च ध्येय पुढे ठेवून अन्य पति करू नये म्हणतात. शिष्टवर्तनहि पाहिलें तर तेंच असणार. आणि दुसरीकडे आपल्या मनाची दुर्बलता आपणांस पतिविरहित राहिलें असतां भलतीकडेच नेण्याचा संभव, अशा प्रसंगीं कोणता आचार आपल्या आत्मोन्नतीच्या दृष्टीने हितकर आहे तें निश्चित करून तदनुसार वागावें व सज्जनां-

नीहि त्या कृत्यास अधर्म म्हणूं नये. साधूंच्या मनाला हें कृत्य रुचलेंच पाहिजे. आणि तोच धर्म होय. "संशयितेषु अर्थेषु यः अर्थः धर्मत्वेन साधूनां मनसे रोचते स धर्मः" (नंदन). अथवा "यत्त्वार्याः क्रियमाणं प्रशंसन्ति स धर्मः । यद्गर्हन्ते स अधर्मः" (आपस्तम्बीय सूत्र). ह्याच कारणाकरिता "बहुद्वारस्य धर्मस्य सूक्ष्मा दुरनुगा गतिः" म्हणून म्हटलें आहे. स्मृतींतील नुसतें वाक्य घेऊन त्याचा अर्थ करावयाचा असेल तर त्यांत कांहीच गहन नाही. परंतु परिस्थितीमुळे आचार बदलणें भाग पडतें तेव्हा कोणता बदल इष्ट आहे हें ठरविण्यास वामनपुराणांत म्हटल्याप्रमाणे "कामविवर्जित, क्रोधनिर्मुक्त आणि अमूढबुद्धि" अशींच माणसें लागतात.

आचाराचा आणि श्रुतीचा संबंध नाही असें म्हणण्यास आणखी एक बलवत्तर कारण असें आहे की, श्रुति अपौरुषेय आहेत परंतु स्मृतींत सांगितलेले धर्म पौरुषेय आहेत. "अथातः सामयाचारिकान्धर्मान्व्याख्यास्यामः" अशा रीतीने सूत्रकार आरंभ करितात. समय म्हणजे पौरुषेय व्यवस्था. "समयमूला आचाराः समयाचाराः । तेषु भवाः सामयाचारिकाः एवंभूतान्धर्मानिति". तात्पर्य, कोणत्याहि दृष्टीने विचार केला तरी आचाराला श्रुति प्रमाण ठरत नाही. श्रुति जाणणाऱ्यांनाच सदाचार कोणता हें निश्चयाने सांगतां येईल हें खरें आहे. पण श्रुतिज्ञ म्हणजे श्रुति नव्हे. तसेंच सामयाचारिक धर्म हे देशजातिकुलोद्भव आहेत. "सामयाचारिको धर्मो देशजातिकुलोद्भवः" (आचारेन्दूमधील उतारा).

आता धर्मलक्षण अथवा धर्मप्रमाणे निर्दिष्ट करणारे श्लोक खाली देतों.

"श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
सम्यक्संकल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतम् ॥" याज्ञवल्क्य.
"वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
एतच्चतुर्विधं प्राह साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥" मनु.

" वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् ।
आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च ।। " मनु.

सदाचाराची व्याख्या मनूनेच दिली आहे ती अशी:–

" तस्मिन्देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः । वर्णानां सान्तरालानां स सदाचार उच्यते ।। " ह्यावरूनहि सदाचार हा श्रुतिस्मृतीला धरून असला पाहिजे हें म्हणणें निर्मूळ दिसतें. अखेरीस इतकेंच सांगणें की, श्रौतस्मार्त कर्माला अनुक्रमें श्रुति व स्मृति प्रमाण होत; परंतु धर्ममूल आचाराला शिष्टवर्तनच प्रमाण. हाच अर्थ मनूलाहि अभिप्रेत असला पाहिजे. ह्याच कारणाकरिता योग्य व अवश्यक सुधारणांना आमचा धर्म आडवा येतो हें म्हणणें असमंजसपणाचें दिसतें. आमच्या धर्माइतकीं उदात्त तत्त्वें दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत आढळणार नाहींत.

---

## लेखांक ४ था.

## शूद्रांविषयी विवेचन.

भक्ष्याभक्ष्येषु नास्यास्ति पेयापेयेषु वै यतः ।
नियमो मुनिशार्दूलास्तेनासौ साध्वितीरितम् ॥

—विष्णुपुराण.

भक्ष्याभक्ष्य, पेयापेय वगैरे कोणत्याहि प्रकारच्या बन्धनांपासून मुक्त असणारांना शूद्रवर्ण फार चांगला असे उद्गार विष्णुपुराणकारांनी काढले आहेत ते हल्लीच्या दिवसांत कोणालाहि अगदीच अस्थानीं भासणार नाहीत. असो. शूद्राला ब्राह्मणांनी पायाखाली तुडविलें,

त्याला अज्ञानांत ठेवलें, त्याला पतितासारखें वागविलें असे आरोप सांप्रत आमच्या प्राचीन ऋषींवर आणि धर्मावर वारंवार करण्यांत येतात; ह्यांत सत्याचा अंश किती आहे, ह्याचा आता विचार करूं. प्रथमतः हें विसरतां कामा नये की, शूद्र हे आर्य नसून अनार्य होत. दोन भिन्न वंशाचे. एकाची संस्कृति पूर्ण विकास पावलेली तर दुसऱ्याच्या ठिकाणीं संस्कृतीचा मुळीच गंध नाही. प्रस्तुतकालींहि सुधारलेले गौरवर्ण लोक रानटी कृष्णवर्ण लोकांना कशा रीतीने वागवितात हें पाहिलें असतां आर्यांनी अनार्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश केला हीच त्यांची पहिली मोठी कामगिरी समजली पाहिजे. शूद्रांच्या प्रगतीची ही पहिली पायरी होय. कारण वर्णत्व प्राप्त झाल्याबरोबर त्यांच्यावर धर्माचें थोडेंबहुत वेष्टन पडलें. "शूद्रो वर्णश्चतुर्थोऽपि वर्णत्वाद्धर्ममर्हति" (व्यास--शूद्रकमलाकर). मागे सांगितलेंच आहे की, प्रत्येक वर्णाचीं अवश्यक अशीं धार्मिक कर्तव्यें निराळीं आणि उपजीविकेकरिता करावीं लागणारीं कर्तव्यें निराळीं. ह्या दोन्ही बाबतींत शूद्रांची प्रगति होण्यास आमचे ऋषि कधीहि आड आले नाहीत. व प्रगतीबरोबर समाजांत जो त्यांचा दर्जा असावयाचा तोहि मान्य करण्यास त्यांनी मागे घेतलें नाही.

शूद्राने आपली उपजीविका द्विजसेवा करून करावी व हाच त्याचा धर्म असा प्रथमतः नियम होता.

"शुश्रूषा शूद्रस्येतरेषां वर्णानाम्" (आपस्तंबसूत्र). परंतु पुढे कारागिरीवर आपला निर्वाह करण्यास शूद्रांना सवड मिळाली. "शूद्रस्य सर्वशिल्पानि" (विष्णुस्मृति).

"शूद्रस्य द्विजशुश्रूषा सर्वशिल्पानि चाप्यथ"

—शंखस्मृति.

शिल्पकर्म कोणत्याच वर्णाकडे (द्विजातीपैकी) नसल्यामुळे ओघानेच तें शूद्रांकडे गेलें ह्यांत विशेष नाही असें कोणी म्हणतील; तर त्यांना स्मृतिकारांनीच शूद्रांना वैश्यवृत्तीचींहि साधनें उपलब्ध करून

दिलीं हें सांगणें अवश्य आहे. " शूद्रस्य द्विजशुश्रूषा तयाऽजीवन् वणिग्भवेत्। शिल्पैर्वा विविधैर्जीवेद्द्विजातिहितमाचरन्॥" (याज्ञवल्क्य)

" वैश्यः शूद्रः सदा कुर्यात्कृषिवाणिज्यशिल्पकान् "

—पाराशरस्मृति.

विज्ञानेश्वरांनी देवलवचन दिलें आहे त्यावरून शूद्र त्या वेळीं सर्व धंदे करीत असत असें सिद्ध होतें. "शूद्रधर्मो द्विजातिशुश्रूषा पापवर्जनं कलत्रादिपोषणं कर्षणपशुपालनभारोद्वहनपण्यव्यवहारचित्र-कर्मनृत्यगीतवेणुवीणामुरजमृदङ्गवादनादीनि". ह्यावरून शूद्रांमध्ये पुष्कळ सुधारणा झाली होती हें व्यक्त होतें.

ह्याप्रमाणे उपजीविकेचीं सर्व साधनें शूद्रांना अंगीकृत करण्यास प्रत्यवाय नव्हता. ह्याबरोबरच त्यांचीं धार्मिक बंधनेंहि वाढलीं. शूद्राच्या ठिकाणींहि नीतिमत्ता व सात्विक वृत्ति पाहिजे असें ठरलें. "क्षमा सत्यं दमः शौचं सर्वेषामविशेषतः" ( शंखस्मृति ). इष्टापूर्त हे द्विजांचे सामान्य धर्म; त्यांपैकी पूर्तधर्माचा अधिकार शूद्रांना मिळाला होता. "इष्टापूर्ते द्विजातीनां सामान्ये धर्मसाधने। अधिकारी भवेच्छूद्रः पूर्तधर्मे न वैदिके॥" (पाराशरस्मृति). इष्टापूर्त म्हणजे काय हें पुढील श्लोकांवरून दिसून येईल.

"अग्निहोत्रं तपः सत्यं वेदानां चैव धारणम्। आतिथ्यं वैश्वदेवं चेष्टमित्यभिधीयते॥ वापीकूपतडागानि देवतायतनानि च। पतितान्युद्धरेद्यस्तु स पूर्तफलमश्नुते॥" ह्यापुढे कांही स्मार्तकर्माचाहि अधिकार शूद्रांनी मिळविला. "दानं च दद्याच्छूद्रोऽपि पाकयज्ञैर्यजेत वा। पित्रादिकं च वै सर्वं शूद्रः कुर्वीत तेन वै॥" आणखी पुढे पहा. "ऋतुकालाभिगमनं स्वदारेषु महीपते। दया समस्तभूतेषु तितिक्षा नातिमानिता। सत्यं शौचमनायासो मङ्गलं प्रियवादिता। मैत्र्यस्पृहा तथा तद्वदकार्पण्यं नरेश्वर। अनसूया च सामान्या वर्णानां कथिता गुणाः" (विष्णुपुराण). जितकी अधिक सुधारणा तितकीं बंधनें अधिक, म्हणून शूद्रांची जसजशी नैतिक व धार्मिक सुधारणा होत गेली

तसतसें धर्माचें जाळेंहि त्यांच्याभोंवती अधिकच पसरत चाललें. वेदाध्ययनावांचून द्विजांचीं बहुतेक कर्में शूद्रांच्या ठिकाणींसुद्धा अपरिहार्य झालीं. कांहीं कालानंतर अध्ययनाची नसली तरी श्रवणाची मोकळीक त्यांना मिळाली.

अहिंसा सत्यवचनं दया भूतेष्वनुग्रहः ।
तीर्थानुसरणं दानं ब्रह्मचर्यममत्सरः ॥
देवद्विजातिशुश्रूषा गुरूणां च भृगूत्तम ।
श्रवणं सर्वधर्माणां पितृणां पूजनं तथा ॥
भक्तिश्च नृपतौ नित्यं तथा सच्छास्त्रनेत्रता ।
आनृशंस्यं तितिक्षा च तथा चास्तिक्यमेव च ॥

—आग्नेय महापुराण.

श्रवणाचा प्रतिबंध दूर झाल्याबरोबर ब्राह्मणाच्यामार्फत शूद्राने वैदिक कर्में करण्यासहि अडचण नाही, येथपर्यंत मजल येऊन पोंचली. (पाराशरस्मृति). परकीयांच्या अमलामुळे धर्माच्या प्रगतीस जर व्यत्यय आला नसता तर वेदपठणाचाहि अधिकार शूद्रांना मिळाला असता. तथापि वेदपठणाचा त्रास न ठेवतां त्यांतील ज्ञानभांडार आमच्या संतांनी शूद्रांना खुलें करून दिलें. स्वतः संस्कृत पंडित असूनहि स्त्रीशूद्रांच्या कल्याणार्थ प्राकृतांत संस्कृतांतील विद्या त्यांनी आणली. शूद्रांच्या उद्धारार्थ आज ब्राह्मणच खटपट करीत आहेत. प्रगतिपर व उदार धोरण आजच्या ब्राह्मणांनी पुढे चालू ठेवलें तर तें त्यांस भूषणावह आहे.

ह्याप्रमाणे पूर्वीचा सेवाधर्म सुटून शूद्र स्वतंत्रपणें उद्योगधंदे करूं लागले, त्यांची धर्मतःहि उन्नति झाली, त्या मानाने त्यांची प्रतिष्ठाहि समाजांत वाढली व ती लोकांनी म्हणजे उच्चवर्णीयांनी कबूल केली. "आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यम्" (गौतमसूत्र). ह्या सूत्रावरील टीका बोधप्रद आहे. "आर्यः त्रैवर्णिकः अनार्यः शूद्रः तयोः कर्मणः आचारस्य व्यतिक्षेपे व्यत्यासे सति तयोः साम्यमेव भवति ।

न परिचार्यपरिचारकभावः । ब्राह्मणादिरपि अनार्यकर्मा चेत् न शूद्रेण परिचरणीयः । शूद्रोऽपि आर्यकर्मा चेत् अनार्यकर्मभिः इतरैः जात्यपकर्षेण न अवमन्तव्यः ॥". प्राचीन ग्रंथांचें अवलोकन नसल्याकारणाने सांप्रत किती निर्मूल कल्पना रूढ झाल्या आहेत हें ह्यावरून कोणासहि स्पष्ट कळण्यासारखें आहे. शूद्रांची अप्रतिष्ठा केवळ ते शूद्र म्हणून आम्ही करतों हें म्हणणें निराधार आहे. शूद्र आचारसंपन्न झाले की वरील वर्णांच्या आदरास ते पात्र होतात. वरील टीकाकारांनी शूद्रांचा अपमान करूं नये असें म्हटलें आहे; पण सन्मान करावा, तो आता ब्राह्मणधर्मी झाला तेव्हा ब्राह्मणाप्रमाणे तो सेव्यहि कां होऊं नये अशी कोणास शंका येईल तर त्याचेंहि समाधान आमच्या पुराणकारांनी स्पष्ट व असंदिग्ध भाषेंत केलें आहेः—

"कर्मभिः शुचिभिर्देवि शुद्धात्मा विजितेन्द्रियः ।
शूद्रोऽपि द्विजवत्सेव्य इति ब्रह्माऽब्रवीत्स्वयम् ॥
स्वभावकर्मणा चैव यश्च शूद्रोऽधितिष्ठति ।
विशुद्धः स द्विजातिभ्यो विज्ञेय इति मे मतिः ॥

—मत्स्यपुराण.

पुराणकार अर्वाचीन अशी समजूत आहे. म्हणून याज्ञवल्क्यस्मृतींतील उतारा देतों.

"विद्याकर्मवयोबन्धुवित्तैर्मान्या यथाक्रमम् ।
एतैः प्रभूतैः शूद्रोऽपि वार्धके मानमर्हति ॥"

आणखी पुष्कळ उतारे देतां येतील; परंतु त्या सर्वांचा आशय एकच असल्यामुळे अधिक जागा अडविण्याचें विशेष प्रयोजन नाही. शूद्रांच्या स्थितींत कसा फरक होत गेला हें समजण्यास वरील उतारे पुरे आहेत. सर्व धंदे करण्याची त्यांना मोकळीक मिळाली, त्यांची प्रतिष्ठा वाढली, धर्माच्या बाबतींतहि ते उच्चवर्णीयांच्या बरोबरीला आले. कारण वेदांतील ज्ञान त्यांस प्राप्त करून देण्याकरिता प्रत्यक्ष व्यासांनी इतिहास—पुराणें रचलीं. "स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां बालानां श्रेयसे

परम् । येषां कोमलबुद्धीनां त्रयी न श्रुतिगोचरा ॥ भारतव्यपदेशेन वेदार्थमुपदिष्टवान् । चकार संहिताश्चान्या व्यासः कृपणवत्सलः ॥ प्रवृत्तः सर्वभूतानां हिताय भगवान् सदा ॥".

इंग्रजी शिक्षणामुळे अलीकडे मात्र शूद्रांविषयी आमची सदसद्विवेकबुद्धि जागृत झाली आहे असा जो कित्येकांनी आपला ग्रह करून घेतला आहे तो सर्वथैव निराधार दिसतो. कलियुगांत तर सर्व वर्णांचा धर्म एकच असल्यामुळे कांहीच भेद शिल्लक राहत नाही. "ध्यानं परं कृतयुगे त्रेतायां यज्ञ उच्यते । भजनं द्वापरे शुद्धं दानमेव कलौ युगे ॥" ( लिंगमहापुराण ). कलियुगांत दान हाच मुख्य धर्म आहे. श्रौतकर्माचा सांप्रत लोपच झाला आहे. हा युगस्वभाव आहे. तेथे कोणाचाच इलाज नाही. "कलिस्वभाव एवैष परिहार्यो न केनचित् । कालः कर्तास्ति धर्मस्य ह्यधर्मस्य च वै पुनः" (देवीभागवत). ह्याच पुराणांत हा परिणाम कशा रीतीने घडून येतो हें फार सुरेख रीतीने सांगितलेलें आहे. क्षत्रियांचा नाश होऊन परकीयांच्या ताब्यांत देश गेला म्हणजे प्रथम आचारसंकर होतो. मागल्या लेखांत सांगितल्याप्रमाणे सर्वच कृषिकार व नोकर बनतात, त्यामुळे धर्मसंकर होतो. आणि धर्मसंकर झाला की, वर्णसंकर ठेवलेलाच. "वृत्त-( आचार- ) संकरदोषेण जायते धर्मसंकरः । धर्मस्य संकरे जाते नूनं स्याद्वर्णसंकरः ॥ एवं कलियुगे भूप सर्वधर्मविवर्जिते । स्ववर्णधर्मवार्तैषा न कुत्राप्युपलभ्यते ॥". ब्राह्मणत्वापासून च्युत होणें हाच कलिस्वभाव आहे. "भविष्यन्ति कलौ विप्रा आचारश्रुतिवर्जिताः ॥" ( जैमिनि अश्वमेध ). आताची वस्तुस्थिति पाहून पुराणांत मागून असलीं वाक्यें कोणी तरी घुसडून दिलीं असेंच केवळ म्हणतां येत नाही. एकंदर युगांची कल्पना अगर योजनाच मुळी धर्माच्या उत्तरोत्तर होणाऱ्या अपकर्षावर बसविलेली आहे. कृतयुगांतला धर्महि त्रेतेंत अविकृत राहणार नाही. "त्रेतायां विकृतिं यान्ति वर्णास्त्वेते न संशयः । चातुर्वर्ण्यस्य वैकृत्याद्यान्ति दौर्बल्यमाश्रमाः ॥ विप्राः शूद्रसमाचाराः

सन्ति सर्वे कलौ युगे ॥" (मत्स्यपुराण). विप्र शूद्र बनले म्हणजे कोणते परिणाम अनुभवास येतील हेंहि पुराणकारांनी ताडलें होतें. "शूद्राणामन्त्ययोनेस्तु सम्बन्धा ब्राह्मणैः सह। भवन्तीह कलौ तस्मिञ्छयनासनभोजनैः ॥" (ब्रह्माण्डपुराण). अशा ह्या कलियुगांत श्रौताचार बाळगणें शक्य नसेल तर निदान सद्वर्तन तरी ठेवावें म्हणजे कोणतेंहि पातक लागण्याचें कारण नाही. आचारेन्दूमध्ये व्यासांचें म्हणून खालील वचन दिलें आहे: "श्रौतं कर्म न चेच्छक्तः कर्तुं स्मार्तं समाचरेत्। तत्राप्यशक्तः करणे सदाचारं लभेद्बुधः ॥". हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच की, कलियुगांत म्हणजे विशिष्ट परिस्थितींत द्विज व शूद्र ह्यांतील अंतर फार कमी झालें आहे, ह्या गोष्टीची जाणीव असल्यानेच ऋषींच्या मुखांतून पुढील उद्गार येणें शक्य झालें "न योनिर्नापि संस्कारो न श्रुतिर्न च संततिः। कारणानि द्विजत्वस्य वृत्तमेव तु कारणम् ॥ सर्वोऽयं ब्राह्मणो लोके वृत्तेन तु विधीयते। वृत्ते स्थितश्च शूद्रोऽपि ब्राह्मणत्वं च गच्छति ॥" (महाभारत). सारांश, आचाराने व ज्ञानाने शूद्रांची संस्कृति जसजशी होत जाईल तसतशीं जातिभेदाचीं बंधनेंहि शिथिल झाल्याशिवाय राहणार नाहीत. आचारभेद आहे तोंपर्यंत जातिभेद कायम राहणार हें जें विधान कै. तेलंगांनी शास्त्र आणि रूढि ह्या विषयावरील व्याख्यानांत केलें आहे, त्यांतील रहस्य प्रस्तुत कालच्या सुधारकांना चांगलें समजलें नाही असें वाटतें. असो. शूद्रांच्यासंबंधाने द्विजांनी आपलें कर्तव्य किती उत्कृष्टपणें बजाविलें आहे हेंच मुख्यत्वेंकरून दाखविण्याचा हेतु आहे. ह्यावरून आमच्या पूर्वजांना ह्या बाबतींत दोष देणें अगदी गैरवाजवी होईल.

ह्यानंतर कांही किरकोळ बाबींचा निर्देश करणें जरूर आहे. वैदिकधर्माचा विचार करतां चातुर्वर्ण्याची बाब प्रथम पुढे येते. चार वर्ण म्हणजे चार जातीच. पूर्वी एका वर्णाचा मनुष्य दुसऱ्या वर्णांत जात असे असें कित्येकांचें मत आहे. ह्याच्या समर्थ-

नार्थ जीं उदाहरणें प्रायः दिलीं जातात तीं भ्रामक आहेत असें वे. शा. भाऊशास्त्री लेल्यांनी सप्रमाण सिद्ध केलें आहे असें प्रथमतः एक वर्ण असून मागून चार वर्ण झाले ही गोष्ट नाकबूल करणें शक्य दिसत नाही. नारदीय पुराणांत ब्रह्मदेवाने सृष्टि निर्माण केल्यानंतर कर्मानुरूप चार वर्ण झाले असें स्पष्ट सांगितलें आहे. "न विशेषोस्ति वर्णानां सर्वं ब्रह्ममयं जगत् । ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मणा वर्णतां गतम् ॥". तसेंच मत्स्यपुराण पहा :-" यथा कृतयुगे पूर्वमेक-वर्णमभूत् किल." हें जरी खरें असलें तरी एकदा का लोकसमूहाला कर्मानुरूप विशिष्टाभिधान प्राप्त झालें म्हणजे हारीतस्मृतींत म्हटल्या-प्रमाणे जन्मावरच वर्णत्व मानलें जातें. "ब्राह्मण्यां ब्राह्मणेनैवमुत्पन्नो ब्राह्मणः स्मृतः ॥". आरंभीं गुणकर्माप्रमाणे वर्गीकरण केलें खरें पण पुढे वर्णविशिष्टत्वाला जन्मच कारण असणार. उदाहरणार्थ, ब्राह्मणाचा मुलगा घ्या. तो सज्ञान होईपर्यंत लोक त्याला ब्राह्मणच म्हणणार; तोहि आपणांस ब्राह्मण म्हणून समजणार. त्याचा पिता त्याला लहानपणीं ब्राह्मणधर्माचीच दीक्षा देणार. पुढे निर्बुद्ध असल्यामुळे कदाचित् निर्वा-हाकरता त्याने वाण्याचें दुकान घातलें तर त्याबरोबर तोहि आपणास वैश्य समजूं लागेल, लोकांहि त्याला वैश्य म्हणूं लागतील हें असंभाव्य दिसतें. शिवाय विवाहादिसंबंधाने आणखी अडचणी उत्पन्न होतील त्या निराळ्या. म्हणून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हीं चांर नांवें प्रचारांत आल्यावर एका वर्णांतील मनुष्य दुसऱ्या वर्णांत सहज जात असे हें म्हणणें सयुक्तिक व मनास पटण्यासारखें दिसत नाही. कोंकणामध्ये राहणारा तो कोंकणस्थ व देशावर राहणारा देशस्थ ही जरी मूळची उपपत्ति बरोबर असली तरी कोंकणस्थ देशावर येऊन राहिला असतां त्यास कोणी देशस्थ समजत नाहीत. नाम-करणाचा हा स्वाभाविक परिणाम होतो. नामामुळे विशिष्टत्व अथवा भेद हा दृढ होतो व ऐक्यमूल गोष्टींचा विसर पडतो. वर्ण हा जन्मावर अगर गुणांवर अवलंबून आहे, ह्या प्रश्नाच्या वादविवादांत

वरील नैसर्गिक तत्त्वाला जितकें प्राधान्य दिलें पाहिजे तितकें दिलें जात नाही. वर्णभेद प्रथम गुणकर्मांमुळेच निर्माण झाले असले तथापि पुढे लवकर कर्माची जागा जन्मानेच पटकावली. वर्णभेद अगर जातिभेद कोणी निर्माण केला नाही; त्यामुळे इष्ट असो वा अनिष्ट असो तो एकदम मोडणें शक्य नाही. परिस्थितीमुळे मोडेल. परंतु तेवढ्याने धर्माची हानि होईलच असा नियम नाही. कारण तो आचार आहे. आणि मागील लेखांत दाखविल्याप्रमाणे महाजन वागतील तोच ह्या बाबतींत धर्म समजला पाहिजे. तात्पर्य, वैदिक धर्माचें रहस्य ज्याला अवगत झालें तो आचार बदलल्यामुळे धर्म-हानि झाली म्हणून कधी म्हणणार नाही. वैदिकधर्म व्यापक आहे. धर्माचें उच्च ध्येय सदा सारखें कृतींत उतरणार नाही; ह्या गोष्टीचें विस्मरण आमच्या ऋषींना झालें नव्हतें. धर्माचें तत्त्व समजून घेऊन ज्या स्थितींत जितकें करतां येईल तितकें करावें. आत्म्याची अवनति होऊं देऊं नये इतकेंच शास्त्रकारांचें सांगणें आहे. पुनर्विवाह करा, प्रौढविवाह करा, महारांच्या पंक्तीस बसून जेवा, आत्म्याची अवनति करून घेऊं नका म्हणजे झालें. परमार्थानुकूल उत्तम आचार कोणता तो शास्त्रकारांनी दाखविला आहे. कारण नसतां तो आचार बदलूं नये. पण प्रसंग आल्यास तो बदलण्यास शास्त्राची आडकाठी नाही. उदाहरण, एखाद्या देशांत स्त्रिया व पुरुष ह्यांची संख्या समसमान असली तर एका पुरुषाने एकाच स्त्रीशीं विवाह करावा हाच निर्दोष आचार होय. परंतु युद्धासारख्या कारणांनी पुरुष मृत्युमुखीं पडल्यामुळे स्त्रियांची संख्या पुरुषांहून फारच अधिक असली तर एका पुरुषाने एकाच वेळीं एकाहून अधिक स्त्रिया करणें युक्तच आहे. नाही तर स्त्रियांना व्यभिचार करण्याची मोकळीक दिली पाहिजे. म्हणून धर्मा-धर्माच्या गोष्टी फार कठीण आहेत. ज्ञानी माणसांनीच त्यांचा निर्णय केला पाहिजे. एवढ्याकरतांच बौधायन ऋषींनी प्रायश्चित्त सांगणें तें परिस्थितीचा विचार करून सांगावें असा इशारा दिला आहे.

"शरीरबलमायुश्च वयः कालं च कर्म च ।
समीक्ष्य धर्मविद्बुद्ध्या प्रायश्चित्तानि निर्दिशेत् ॥"

हिंदु कोणाला म्हणावें ह्याविषयी एकवाक्यता दिसत नाही. श्रुतिप्रामाण्य ज्यास मान्य आहे त्यास हिंदु म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. अनार्यांचा चातुर्वर्ण्यांत अन्तर्भाव केलेला आहेच. इतर-धर्मीयांना धर्मान्तर करून हिंदु होण्यास प्रतिबंध नसावा असें वाटतें. त्याचप्रमाणे हिंदुस्थानांतील हिंदु युरोपखंडांत जाऊन राहिला व त्याचे आचार बदलले तरी श्रुत्युक्त धर्मावर जोंपर्यंत त्याची पूर्ण श्रद्धा आहे तोंपर्यंत त्याचें हिंदुत्व नष्ट होण्याची भीति नाही. श्रुति-स्मृत्युक्त धर्मावरील दृष्टि ढळूं देतां कामा नये. हिंदुधर्म जगद्व्यापी असल्यामुळे अर्थात्च सर्व हिंदूंची संस्कृति समान असणें शक्य नाही. ह्याकारणानेच आमच्यामध्ये वर्णभेद अगर जातिभेद उत्पन्न झाले. समान संस्कृतीच्या लोकांत असा भेद होण्याचें कारणच राहत नाही. जातिभेद एका क्षणांत निर्मूल करूं पाहणाऱ्या सद्गृहस्थांनी ह्या गोष्टीचा कितपत विचार केला आहे तें समजत नाही. खिस्त, महंमद, अगर बुद्ध कोणी घ्या, त्यांच्यांत आणि त्यांच्या अनुयायांत आचारसंपन्नतेच्या बाबतींत कांही फरक होता असें मानण्यास कारण नाही. परंतु द्विज आणि शूद्र ह्यांची एकत्र गांठ पडली तेव्हा दोहोंच्या आचारांत जमीनअस्मानाचें अंतर होतें. अशा वेळीं शूद्रां-पासून द्विज अलग राहिले ह्यांत त्यांचा मूर्खपणा नसून शहाणपणाच होता. असो. ह्याप्रमाणे वैदिकधर्माचें स्वरूप संक्षेपतः उद्घाटित केलें आहे. त्यामुळे ह्या धर्माची श्रद्धा कमी न होतां उलट वृद्धिंगत होईल अशी आशा आहे.

---

## लेखांक ५ वा

## हिंदूंच्या धर्माचें स्वरूप

सांप्रतचा हिंदु समाज अनेक जातींचा मिळून बनलेला आहे. त्यामुळे निरनिराळ्या जातींच्या विसंगत आचारांचा संग्रह ह्या समाजानें केलेला आढळतो. तथापि वैदिक धर्माची छाप हिंदु समाजावर पडली असल्याचें स्पष्ट दिसून येतें. वैदिकधर्म हा संप्रदाय अथवा पंथ नव्हे. तो रिलिजन ( Religion ) नाही. हिंदु धर्म हा शब्दप्रयोग चुकीचा आहे. ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, पारशी धर्म ह्यांच्याच जातीचा हिंदूंचा धर्म नाही. हिंदूंचा धर्म म्हणतां आला तरी हिंदु धर्म म्हणतां येणार नाही. आमचे ऋषि एखाद्या विशिष्ट लोकांकरता धर्माचे नियम सांगत नाहीत, सर्व मानव जातीकरता सांगतात. आमचें मानव धर्मशास्त्र आहे. हिंदु धर्मशास्त्र नाही. आमची धर्माची कल्पना वसुंधरेप्रमाणे अफाट आहे. ही पृथ्वी ज्याप्रमाणे अनेक प्राणी, अनेक वनस्पति, नानाविध वस्तु धारण करते तद्वत् आमच्या धर्मांत सर्व मानव जातीचा समावेश होतो. आमच्या धर्माची व्याप्ति मनुष्यजातीपुरतीच आहे असें नाही तर पशुपक्षी व वनस्पति आणि कीटक हेहि धर्माचे विषय आहेत अशी आम्हा हिंदूंची समजूत आहे.

संप्रदाय किंवा पंथ म्हटला म्हणजे त्याचा कोणी तरी संस्थापक असतो, एक सांप्रदायिक ग्रंथ असतो आणि शिवाय संप्रदायांत शिरणाऱ्या प्रत्येक माणसाने मान्य केलेंच पाहिजे असें कांही तरी अनुशासन असतें. हिंदूंच्या धर्मांत ह्या तीनहि गोष्टींचा अभाव आहे. हिंदूंच्या धर्माला कोणी संस्थापक नाही. कर्ताच नाही मग कार्याचा प्रादुर्भाव कोठून होणार? झोरॅस्टर, येशू ख्रिस्त, महमद पैगंबर हे

आपापल्या धर्माचे प्रवर्तक आहेत. हिंदूंचा धर्मपंथ नसल्यामुळे पंथ स्थापणारा कोणी नसणें स्वाभाविक आहे.

धर्मस्थापकांप्रमाणे हिंदूंचा धर्मग्रंथहि नाही ही दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे. ह्या सारख्या पालटत जाणाऱ्या संसारांत कोणत्या तरी युगांत लिहिलेला धर्मग्रंथ त्रिकालीं उपयोगीं पडेल अशी वेडगळ समजूत हिंदूंची नाही. आमच्या श्रुतिस्मृतींचें कार्य, व्याप्ति व अधिकार किती आहे ह्याचा ऊहापोह मागे केलाच आहे. इतर धर्मांहून आमच्या धर्माचें स्वरूप भिन्न आहे हें सिद्ध करण्याकरता येथे ह्या गोष्टींचा उल्लेख करणें भाग पडलें. धर्मग्रंथाप्रमाणे आमच्या धर्मांत येण्यास अमुक एक गोष्ट अपरिहार्य आहे असेंहि नाही. कातकरी, ठाकूर, महार आणि वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण ह्यांत कांही तरी साम्य आहे काय? तथापि सर्व हिंदुच. उपासनामार्ग भिन्न, उपास्य देवता भिन्न, श्रद्धेचें अधिष्ठानहि भिन्न असें असून कोणाच्याहि हिंदुत्वाला किमपि बाध येत नाही. चार्वाकासारख्या नास्तिकाचाहि अव्हेर हिंदु समाज करीत नाही. हिंदु म्हणवून घेण्यास अमुक एक मत मान्य केलेंच पाहिजे असें नाही. वैष्णव, शैव, गाणपत्य, शाक्त असे अनेक पंथ आमच्यांत आहेत. द्वैती, अद्वैती हेहि आपापल्या मताला चिकटून हिंदु म्हणूनच नांदत आहेत. भूतपिशाच्यांपलीकडे ज्यांची देवविषयक कल्पना गेली नाही अशा किती तरी जाती हिंदुसमाजांत आहेत. अवैदिक असे बौद्ध, जैन व लिंगायत हे आजपर्यंत हिंदु म्हणूनच गणले जात असत. जैनांचीं धार्मिक कृत्यें आमच्या भटांच्याकडून करण्यांत येत. हिमालयापासून लंकेपर्यंत असंख्य बौद्ध होते. सर्व देश बौद्धांनी गजबजून गेलेला होता. आज नमुना म्हणून कोणाला दाखविण्यासहि बौद्ध शिल्लक राहिला नाही. हे सर्व बौद्ध हिंदुस्थानाच्या बाहेर गेले नाहीत. त्यांचें हिंदुसमाजांत बिनबोभाट पुनर्मिलन झालें. त्याकरता शुद्धिसमारंभ करावे लागले नाहीत. धर्मांतराची कल्पना हिंदुसमाजाला अपरिचित आहे. समुच्च-

दा. म.

यार्थी धर्म शब्द वापरण्यांत येत नाही. राजधर्म, प्रजाधर्म, पुत्रधर्म, स्त्रीधर्म असे स्थितिपरत्वें निरनिराळे धर्म असतात. धर्म म्हणजे कर्तव्य. सर्वांचें कर्तव्य एकच असूं शकत नाही. कर्तव्यें वेगवेगळीं म्हणून धर्म वेगवेगळे. खिस्ती शब्द उच्चारल्याबरोबर त्यांच्या बिरुदांसह विशिष्ट लोक मनापुढे उभे राहतात. तसें हिंदूंचें नाही. आपापल्या पंथाचा आग्रह सोडला की प्रत्येक मनुष्य हिंदुच झाला. प्रत्येक मनुष्य जन्माने हिंदुच आहे. त्याला हिंदु करावयाचा नसतो. आमच्या कल्पनेप्रमाणे मनुष्य कधीच धर्मभ्रष्ट होत नाही. तो पतित होतो. पतिताला प्रायश्चित्त आहे. हेंच त्याचें शुद्धीकरण.

रिलिजन ( Riligion ) ह्याला प्रतिशब्द उभ्या संस्कृतांत किंवा मराठींत मिळणार नाही. उघडच आहे की वस्तुच नाही तर शब्द प्रचारांत कसा येणार ? खिस्ती, महमदी, पारशी हे सर्व संप्रदाय आहेत. त्यांस धर्म शब्द लावणें अनुचित होय. रिलिजन अस्तित्वांत येण्यास वस्तुतः जागाच नाही. असें असून निरनिराळे धर्म ( Religion ) आजवर जगांत स्थापन झाले व कोट्यवधि लोक ह्या धर्मसंस्थापकांच्या जाळ्यांत सापडले हें पाहून आश्चर्य वाटतें. या सर्व लोकांना भावनाप्रधान वेडेपीर अथवा छांदिष्ट असें म्हणण्यास कोणीहि विचारी मनुष्य कचरणार नाही. धर्मसंस्थापकांना जें आश्चर्यकारक यश लाभलें त्याचें कारण त्यांच्या बुद्धिमत्तेंत सापडणार नाही. तें त्यांच्या प्रबल भावनेंतच सापडेल. ह्या सर्व पंथांची विशेष गोष्ट म्हणजे त्यांचा अग्राहीपणा ही होय. ते अग्राही आहेत म्हणूनच आग्रही आहेत. आपण नामकरण केलेल्या देवाची उपासना जो एकनिष्ठेने करणार नाही त्याला सद्गति नाही असा त्यांचा आग्रह असतो. बायबलांत म्हटलें आहे, He that believeth on him is not condemned : but he that believeth not is condemned already, because he hath not believed in the name of the only begotten son of God. (St. John 4). ह्याचा अर्थ इत-

काच की, येशु खिस्तावर ज्याचा विश्वास नाही तो नरकांत कुजत पडणार. संप्रदाय म्हटला म्हणजे अशा प्रकारची लालूच ठेवावी लागते. माझ्या कळपांत आल्याशिवाय तुम्हांला सद्गति नाही असें सांगून अज्ञ जनांना धर्मसंस्थापक आपल्याकडे ओढून घेतात. ह्याचें प्रत्यंतर आपणांस हल्ली पहावयास मिळतच आहे. गांधी फार भला मनुष्य आहे, सज्जन आहे, निष्पाप आहे, सात्त्विक आहे ही गोष्ट मुसलमान मौलानांना मान्य आहे. पण त्यांना असें दुःख होत आहे की, हा भला माणूस मुसलमान होत नाही एवढ्याचकरता अल्ला त्याला नरकाची वाट दाखवील. खिस्ती धर्मोपदेशकहि असेच नक्राश्रु ढाळीत आहेत. गांधींना बायबल आवडतें; गांधींची येशु खिस्तावर निष्ठा आहे; गांधी बाप्तिस्मा घेत नाहीत म्हणून अखेरीस त्यांना दुर्गतिच प्राप्त होणार याबद्दल खिस्ती पाद्र्यांना रडूं कोसळत आहे. आता सज्जनांना नरकांत पाठविणारा देव वेडा अगर हे धर्मसंस्थापक वेडे हें कोणालाहि ठरवतां येईल. "हिंदु धर्म" कोणत्याहि ईश्वरभक्ताला नरकांत पाठविणार नाही. 'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति' असें आश्वासन हिंदुधर्माशिवाय दुसरा कोणताहि धर्म देऊं शकत नाही. ईश्वरोपासक —मग तो कोणत्याहि पंथाचा असो व कोणत्याहि मार्गाने उपासना करो— त्याचा देव त्याला दगा देणार नाही असें एक 'हिंदु धर्म'च सांगूं शकतो. एकच देव आहे असा आक्रोश करणाऱ्यांना आपलाच धर्म काय तो मनुष्याला तारण्यास समर्थ आहे असें म्हणणें शोभत नाही. देव जर एकच आहे तर त्याला कोणत्याहि नांवाने आळविलें अथवा उपासकाला प्रिय अशा कोणत्याहि पत्रपुष्पांनी तोषविलें तरी ती उपासना झिटकारण्यासारखा देव मूर्ख आहे अशी कल्पना करणें योग्य होईल काय? गीतेंत कृष्णांनी स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे की, कोणी कशीहि पण श्रद्धापूर्वक केलेली उपासना अखेरीस मलाच पोचते. उदाहरणार्थ, येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः । तेऽपि मामेव कौन्तेय यज-

न्त्यविधिपूर्वकम् ॥ एकच परमेश्वर आहे म्हणून निरनिराळे लोक त्या " एकमेवाद्वितीयम् " परमेश्वराला वेगवेगळ्या मार्गांनी भजतात. पण त्यामुळे निराळे धर्म स्थापन करण्याचें कांही प्रयोजन आहे काय? देवावर विश्वास व निष्ठा हाच कोणत्याहि धर्माचा आधारस्तंभ. उपासनेचीं उपकरणें आणि देवविषयक व सृष्टिविषयक मतें ह्यांच्याच आधारावर निरनिराळ्या धार्मिक जाति पाडणें मूर्खपणाचें होय.

आता धर्मस्थापना ही वेडेपणाची आहे इतकेंच नव्हे तर प्रत्येक धर्माचें जनन मनोविकारांतच होत असल्यामुळे प्रत्येक धर्माची उत्पत्ति पापांतच आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. अशा रीतीने पापांत उद्भवलेला धर्म मनुष्याला पुण्यशील कसा बनवील हें एक कोडेंच आहे. नवीन धर्म स्थापन करणारा मनुष्य प्रचलित धर्मानुयायांना शत्रूप्रमाणेच लेखीत असतो. तसेंच आपणांकडे मोठेपणा घेऊन दुसऱ्यांवर मूर्खपणा व कमीपणा लादणें हें त्याचें ब्रीदच असतें. मी ख्रिस्ताची किंवा पैगंबराची उपासना करतों एवढेंच म्हणून जर तो स्तब्ध बसेल तर त्यास कोणीच अनुयायी मिळणार नाही. प्रचलित मार्गाने तूं गेलास तर खड्डयांत पडशील असें इतरांस त्यास बजावावें लागतें. पारशी धर्मांत जी शपथ घ्यावी लागते तींत मी अहुरमझ्दाला भजतों आणि देवांचा द्वेष करतों असें म्हणावें लागतें. ह्यावरून कोणत्याहि धर्माची प्रतिष्ठा अहंपणांत असून त्याचा प्रसार द्वेषभावांत असतो हें उघड आहे. राजकीय पक्षांप्रमाणे धर्मपक्ष बनले की, आपल्या पक्षाचा उत्कर्ष वेड्यावाकड्या मार्गानेसुद्धा करण्याची प्रवृत्ति होते. धर्माच्या बाबतींत तर स्वर्गाची आशा व पुण्याची प्राप्ति यांची लालूच असल्यामुळे अनुचित साधनांचा अवलंब करण्यास कोणी भीत नाही. म्हणून ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांत लोकांना आपआपल्या धर्मांत ओढण्याकरता त्यांचे अनन्वित छळ केल्याचीं उदाहरणें इतिहासांत नमूद आहेत. परधर्मीयांना आपल्या धर्मांत ओढण्याचें हिंदुधर्मीयांना मात्र कारणच पडत नाही. कारण कोणत्याहि मनुष्याला,

मग तो ख्रिस्ती पंथाचा असो, अगर मुसलमानी पंथाचा असो, त्याचा हेकटपणा जमेस धरूनहि त्याला सद्गति मिळाल्यावांचून राहणार नाही असेंच आम्ही मानतों. ह्यास्तव "धर्मा"च्या खुळाचा नायनाट होणें अवश्य आहे. सर्व धर्म सारखे आहेत अशी हिंदूंनी बडबड करणें म्हणजे आपल्या धर्मविषयक अज्ञानाचें प्रदर्शन करणें होय. कोणताहि संप्रदाय म्हटला म्हणजे तो डबक्यांतल्या साचलेल्या पाण्यासारखा अमंगल असतो. हिंदूंच्या धर्मासारख्या वाहत्या पाण्याची बरोबरी तो कसा करूं शकेल? जगांतील प्रत्येक मनुष्य आमच्या दृष्टीने हिंदुच आहे. धार्मिकदृष्ट्या आम्ही भेदभाव मानीत नाही. आमच्यांत अनेक पंथ आहेतच. त्यांत आणखी ख्रिस्ती, मुसलमान वगैरेंचा समावेश करण्यास हरकत नाही. तात्पर्य, जगांतील धार्मिक भेद नष्ट झाले असतां लोक अधिक सुखी होतील. आम्हांला धार्मिकता पाहिजे पण रिलिजन नको. मनुष्य जातींत संस्कृतिजन्य भेद असावे. हिंदु लोकांच्या संस्कृतीलाच सध्या हिंदुधर्म म्हणतात.

आकाशांतील बापाचा येशु हा मुलगा आहे; महमद हा देवाचा दूत आहे ह्या गोष्टी अनुक्रमें ख्रिस्ती व मुसलमान होणारांना व असणारांना मान्य झाल्याच पाहिजेत. हिंदूंवर अशा प्रकारचें कोणतेंहि बंधन नाही.

प्रत्येक हिंदूला वेद प्रमाण असतात किंवा असले पाहिजेत असा कित्येक लोकांचा समज आहे. पण तोहि निराधार दिसतो. अवैदिक समाज आमच्यांत नाहीत असें नाही. शिवाय मरेपर्यंत वेदप्रामाण्य हिंदु मान्य करतो असें नाही. ख्रिस्ती माणसाची बायबलावर, तसेंच मुसलमानाची कुराणावर, मरेपर्यंत पूर्ण श्रद्धा असलीच पाहिजे. ह्याच्या उलट आमचें शास्त्र आम्हांस वेद मागे टाकून पुढे जाण्यास सांगतें: "त्रैगुण्यविषया वेदाः। निस्त्रैगुण्यो भवार्जुन". ह्याचा अर्थ मनुष्याने वेदातीत व्हावें असा आहे. वेद हे संसारी पुरुषाकरता आहेत. आणि संसाराबद्दल विरक्ति उत्पन्न होण्यांतच मोक्षाचें बीज आहे असें

हिंदूंचें तत्त्वज्ञान आहे. वेद प्रमाण न मानणारा तो नास्तिक अशी आमची समजूत आहे हें कांही खोटें नाही. उदाहरणार्थ, "योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयात् द्विजः । स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः" (मनु). ह्याचा अर्थ इतकाच की, कांही मर्यादेपर्यंत वेदप्रामाण्याची अवश्यकता आहे. पण नास्तिक का ध्याना. बुद्धासारख्या नास्तिकाची गणना दशावतारांत हिंदूंनी केली हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. चार्वाकाला तर बृहस्पतीचा अवतार म्हणत.

ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांनी समता व बंधुत्व प्रस्थापित केलें असें कित्येकांस वाटतें. पण तें खरें नाही. हा त्या धर्मस्थापकांवर नुसता आळ आहे. स्त्री-पुरुष, शिक्षित-अशिक्षित, बाल-वृद्ध, सर्व सारख्याच योग्यतेचे आहेत असें न म्हटल्यास एकहि नवीन संघटना अस्तित्वांत येणार नाही. अनुयायांची संख्या वाढविण्याची ही एक युक्ति आहे. मनाच्या मोठेपणाने ही सवलत मिळालेली नाही. हाच प्रकार बंधुत्वाचा. पैगंबरावर विश्वास ठेवतील तेच काय ते बंधु म्हणून समजावे असें कुराण म्हणतें. हें बंधुत्वाचें प्रेम मुसलमानेतरांकडे वाहवणार नाही. कोणताहि नवीन समाज सुसंघटित होण्यास ह्या बंधुत्वाच्या तत्त्वज्ञानाची योजना करावीच लागते. सारांश, प्रत्येक संप्रदायाची स्थापना म्हणजे इतरांविषयी शत्रुत्वाचें बीजारोपण करणें होय. ह्यासाठी जगांतील सर्व संप्रदायांचें उच्चाटन होणें अवश्य आहे.

पहिला संप्रदाय अहुर्मझ्दाने स्थापिला. पारशी आणि बौद्ध हे एका वर्गांत असून ज्यू, ख्रिस्ती आणि मुसलमान हे दुसऱ्या वर्गांत मोडतात असें एकाचें म्हणणें आहे. हें वर्गीकरण निर्दोष आहे असें नाही. सर्व संप्रदाय एकाच माळेचे मणी आहेत. एकांतून दुसऱ्याची, दुसऱ्यांतून तिसऱ्याची, अशी ह्या धर्मांची उत्पत्ति झाली आहे. तथापि ज्यू, ख्रिस्ती व मुसलमान ह्या पिढ्या सर्वांस एकदम पटण्यासारख्या आहेत. मानवजातीपैकी शेकडा ४५ ह्या धर्मांचे लोक आहेत. हिंदु, पारशी व बौद्ध मिळून शेकडा ४४ भरतील. सर्वांत

पारशांचा समाज फारच लहान. त्यांची संख्या दीड लाखाहून अधिक भरणार नाही. ज्यू ४० लक्ष आहेत. ख्रिस्ती १२ कोटी असून मुसलमान त्यांच्या दुप्पट आहेत. सर्वांत बौद्ध संख्येने अधिक. ते साडेएकतीस कोटी भरतील. हिंदु आणि बौद्ध एक होतील तर सर्व जगाला भारी होतील.

"हिंदुधर्म" हा हिंदूंपुरताच आहे ही प्रचलित समजूत चुकीची आहे. तो सर्व मानव जातीकरता आहे. आणि म्हणूनच तो "धर्म" होऊं शकत नाही. इतर लोकांनी "धर्म" काढले त्यामुळे त्याच्या बरोबर बाटवण्याची क्रियाहि ते करूं लागले. देवासाठी केलेलें कोणतें कृत्य पापांत मोडूं शकेल? ह्याचा परिणाम असा झाला की, अन्यधर्मीयांना बाटवण्याकरता वाटेल तो जुलूम केला, चाहेल तशी फसवेगिरी केली तरी देवाला ती गोष्ट प्रियच होईल अशा विश्वासाने अंगाला शहारे येतील अशीं अघोर कृत्यें धर्मवेड्यांनी केलीं आहेत. असलीं पापें हिंदूंच्या हातून झालीं नाहीत. सारांश, हें आपल्या "धर्मा"चें स्वरूप प्रत्येक हिंदूने ओळखलें पाहिजे.

---

# संतांची कामगिरी

महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वरादि संतांनी भक्तिमार्गाचें पुनरुत्थापन करून विठ्ठलभक्तीचा उत्कर्ष केला, पंढरीच्या वाऱ्या करण्याचा प्रघात पाडला व सर्व समाजाच्या भक्तीचा ओघ एकवटून तिचा प्रवाह एकाच मार्गानें लावून दिला. समाजांतील प्राकृत जनांसहि संस्कृतांतील भक्तितत्त्वाचें द्वार खुलें व्हावें एतदर्थ त्यांच्याच भाषेंत संतांनी ग्रंथरचनाहि केली. हें जें संतांनी कार्य केलें त्याबद्दल कोणाचाच मतभेद नाही. हें कार्य दृश्य असल्यामुळे शिक्षितांना तसेंच अशिक्षितांनाहि तें सहज समजलें. परंतु ह्या कार्याच्या महत्त्वाची यथार्थ कल्पना येण्याकरिता ह्या कार्याच्या बुडाशीं संतांचा कोणता हेतु होता, त्यांत संतांचा मुत्सद्दीपणा व दूरदर्शित्व कसें दिसून येतें, हें समजणें अवश्य आहे. संत म्हणजे केवळ टाळकुटे असें म्हणून कोणी त्यांचा उपरोध करतात, तर कोणी सब्गोलंकाराचें पातक त्यांच्या माथीं मारतात. ह्याशिवाय आणखी कित्येक ब्राह्मण्याला त्रासून ब्राह्मण्याचा नायनाट करण्याच्या हेतूनें संतांनी हें भक्तिरूप शास्त्र मुद्दाम निर्माण केलें असें म्हणून संतांची थोरवी गातात. हें तिसरें मत न्या. रानडे यांनी आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत प्रद-

---

१ रा. वि. का. राजवाडे यांचें हें मत असून, तें त्यांनी "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें" ह्यांपैकी एका खंडांत प्रदर्शित केलें आहे. रामदास व इतर संत ह्यांच्यांत जमीनअस्मानाचा फरक होता, ही गोष्ट निर्विवाद आहे. रामदासांची कामगिरी उच्च दर्जाची आहे. त्यांची मठस्थापनेची कल्पनाहि अपूर्व आहे. तसेंच इतर संत व रामदासी ह्यांच्यांत मतभेद आणि आचारभेदहि आहे. किंबहुना रामदासी पंथाचा संतपंथांत अन्तर्भाव करणेंहि गैर आहे. तथापि तेवढ्यावरून ज्ञानेश्वरादि संत केवळ टाळकुटे होते हें म्हणणें चुकीचें दिसतें.

शित केलें आहे. प्रस्तुत लेखांत ह्या मताच्या युक्तायुक्ततेची छाननी करण्याचा विचार आहे. प्रथमतः ब्राह्मण्याला संतांनी शह लाविला म्हणजे काय ह्याचा विचार केला पाहिजे. ब्राह्मण्य या शब्दाने ब्राह्मणांचें सोंवळेंओवळें, ब्राह्मणांचा जातिभेद, ब्राह्मणांचें आन्हिक कर्म, ब्राह्मणांच्या धर्म-समजुती, ब्राह्मणांचे यज्ञयाग इत्यादिकांचा बोध होतो. आता कोणत्या संताने आपली मुलगी आपल्या जातीच्या बाहेर दिली, अगर अन्य जातीची मुलगी आपल्या घरांत आणली, अथवा जातिभेद झुगारून देऊन पंक्तिप्रपंच न करतां वाटेल त्यांच्याकडे संत अन्नसेवन करीत असत; तसेंच ब्राह्मणसंत स्नान-संध्यादि कर्माचा त्याग करून ओवळ्याने अन्नग्रहण करीत; असें जोंपर्यंत उदाहरणाने दाखवितां येत नाही तोंपर्यंत ब्राह्मण्यहानि सिद्ध होणें शक्य नाही. संतांचा ब्राह्मणपणा आणि भक्तिमार्ग यांचें साहचर्यच जर दृष्टोत्पत्तीस येत आहे तर एकाला मूठमाती देण्या-करता दुसऱ्यास जन्मास घातलें ही कल्पना संतांच्या संबंधाने कशी करतां येईल याचें आम्हांस मोठें गूढ वाटतें. वरील मताचें वैयर्थ्य सिद्ध होण्यास फारशी अडचण पडणार नाही असें वाटतें. युरोप-खंडांत रोमन कॅथोलिक पंथावर प्रॉटेस्टंटांनी विजय मिळविला तसाच प्रकार संतांचे संबंधानेहि घडला आहे असेंहि प्रतिपादण्यांत येतें. परंतु या दोहोंमध्ये कोणत्याहि प्रकारचें साम्य दिसत नाही. युरो-पांतील धर्मक्रांतीचा प्रकार म्हणजे एका मताचें समूळ उच्चाटन करून त्याऐवजी नवीन पंथाची अगर मताची स्थापना करणें हा होय. पण महाराष्ट्रांतील संतांना कशाचाहि उच्छेद करावयाचा

---

१ "प्राचीन अधिकार व प्राचीन संप्रदाय हिंदुस्थानांत......ब्राह्मण जातीमध्ये दृढतर खिळून गेले होते. व या ब्राह्मणजातीच्या प्रभुत्वाविरुद्ध साधुसंत मोठ्या धैर्याने झगडत होते."

**मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष.**
(ग्रंथमाला—भाषांतर)

नव्हता. त्यांचें कार्य संघटनात्मक स्वरूपाचें होतें. सर्व समाज एक-जीव करण्याकरता, सर्व समाजांत बंधुप्रेम उत्पन्न करण्याकरता व विस्कळित झालेल्या समाजाला संकलित करण्याकरता, संतांनी भक्तिमार्ग उपदेशिला.[1] ज्ञानेश्वराच्या वेळीं समाजाची जी स्थिति होती त्या स्थितीचा विचार केला म्हणजे संतांनी योजिलेला उपाय किती रामबाण होता हें कळून येईल. यास्तव हिंदुसमाजाचीं स्थित्यंतरें आरंभापासून बाराव्या शतकापर्यंत कसकशीं झालीं ह्याचा थोडक्यांत निर्देश करणें अवश्य आहे.

वेदांतील प्रमाणांवरून हिंदुस्थानांतील आर्यांचें मूळ वसतिस्थान उत्तर ध्रुवावर होतें हा टिळकांचा सिद्धांत आता बहुतेक विद्वन्मान्य झाल्यामुळे तो निर्विवाद म्हणून घेऊन चालण्यास हरकत नाही. ऋग्वेदावरून असें दिसतें की, उत्तरध्रुवावर आर्यांच्या बरोबरच दस्यू, अहि, दानु, यातुधान, नराशंस इत्यादि अनार्यांचाहि दुसरा एक समाज होता. दुसरी एक विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे, या दोन समाजांतील लोकांचीं नेहमी भांडणें होत असत. या दासांचा व आर्यांचा मिलाफ कधीहि झालेला दिसत नाही. पुढे बर्फाच्या योगाने उत्तरध्रुवावरून जेव्हा या दोन समाजांतील लोकांना खाली यावें लागलें तेव्हा वेदानुयायी आर्य हिंदुस्थानांत येऊन येथेच त्यांनी आपलें वास्तव्य केलें. परंतु वेदबाह्य जे उपरिनिर्दिष्ट दास ते आपल्या शत्रूंबरोबर हिंदुस्थानांत आले, अशाबद्दल कांही पुरावा नाही. हे लोक युरोपखंडांतच राहिले असावे. हिंदुस्थानांत आल्यावर आर्यांचा शूद्रांशीं संबंध झाला. दासांबरोबर सतत लढाया करून त्रस्त झालेल्या आर्यांनी शूद्रांच्या संबंधाने एक मोठा अपूर्व प्रयोग करून पाहण्याचा निश्चय केला. शत्रूंबरोबर

---

१ उलट ज्ञानेश्वर काय म्हणतात पहा:—" सांधें शूद्रगृहीं आघवीं । जन्हि पक्वान्नें आथि बरवीं । तीयें द्विजें केंवि सेवावीं । दुबला जन्हैं ॥"

कलह करून व युद्धांत मारून त्यांचा बीमोड करण्याच्या नादीं न लागतां त्यांना आपल्यामध्ये घेऊन त्यांच्याशीं सलोखा करून, त्यांची उन्नति करून, त्यांना आपणासारखे करून सोडावें ही इच्छा त्यांनी मनांत बाळगिली. या इच्छेचेंच पहिलें स्वरूप चातुर्वर्ण्य-स्थापनेंत दिसून येतें. चातुर्वर्ण्यांत शूद्रांना सामील करून घेण्याचा उद्देशच असा की, शूद्रांची तद्द्वारा धार्मिक उन्नति व्हावी. 'शूद्रो वर्णश्चतुर्थोऽपि वर्णत्वाद्धर्ममर्हति ।' ह्या वचनावरून वरील अनुमान खरें ठरतें. ह्याशिवाय, ब्राह्मणादि द्विज हे शूद्रस्त्रियांबरोबर विवाह करूं लागले तेव्हा तर हे दोन समाज अधिकच एकजीव झाले. आर्यानार्यांच्या एकीकरणाचा हा प्रयोग जगाच्या इतिहासांत पहिलाच होय. परंतु या वैवाहिक संबंधाचे कांही अनिष्ट परिणाम

---

१ हिंदुस्थानांत आर्यांची वस्ती होण्यापूर्वी चातुर्वर्ण्यव्यवस्था नव्हती असें आम्हांस वाटतें. चतुर्वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. ह्याशिवाय निराळीं नांवें कोठेहि आढळत नाहीत. आणि शूद्र हा शब्द तर सगळ्या ऋग्वेदांत एकच ठिकाणीं—म्हणजे पुरुषसूक्तांत—आला आहे. पुरुषसूक्त हें ऋग्वेदांतलें अगदी अखेर रचलेलें सूक्त असावें ही गोष्ट सर्वसम्मत आहे. ह्यावरून चातुर्वर्ण्यव्यवस्थाहि आर्य हिंदुस्थानांत आल्यानंतरची आहे हें अनुमान निघतें. हिंदुस्थानांत येण्यापूर्वी पंचजनात्मक समाज होता, चातुर्वर्ण्यात्मक नव्हता. कृतयुगामध्ये एकच वर्ण होता, असें मत्स्यपुराणांत म्हटलें आहे; "यथा कृतयुगे पूर्वमेकवर्णमभूत्किल." प्रजापतीने यज्ञ केला व नंतर ब्राह्मण आणि क्षत्रिय अशा दोन जाति निर्माण केल्या अशी ऐतरेय ब्राह्मणांत एक आख्यायिका आहे (आ. ४२). अर्थात् त्या वेळीं एकाचे दोन वर्ण झाले होते. प्रथम दोन जाति होत्या; नंतर त्रेता युगांत तीन झाल्या, असें रामायणांत म्हटलें आहे. त्रेता युगांत आर्य हिंदुस्थानांत आले असावे असा तर्क आहे. ह्यावरून चातुर्वर्ण्याची रचना शूद्रांना घेऊन ह्या देशांत करण्यांत आली हें उघड होतें.

ब्राह्मणांच्या लक्षांत येऊन त्यांनी पुढे अशा प्रकारचे विवाह बंद केले. तथापि क्षत्रिय व वैश्य यांचा मात्र शूद्रस्त्रियांबरोबर विवाह करण्याचा प्रघात तसाच चालू राहिला. हीन संस्कृतीच्या स्त्रिया घरांत येतांच क्षत्रिय वैश्यांची संस्कृतिहि लुप्तप्राय झाली व त्यामुळे क्षत्रिय व वैश्य हे दोन वर्ण शूद्रांत समाविष्ट झाले[१]. याचाच अर्थ शूद्र किंवा शूद्रतुल्य समाज वाढत चालला. ही सर्व क्रांति हळूहळू भारती युद्धाच्या पूर्वकालीं होत होती. भारती युद्धाने ह्या क्रांतीला अधिकच गति मिळाली. कारण भारती युद्धांत पुष्कळच क्षत्रिय कुलांचा ऱ्हास झाला, ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे.

ह्यापुढे आपणांस क्षणभर बौद्धधर्माकडे वळलें पाहिजे. इसवी सनापूर्वीच हिंदुस्थानांत बौद्धधर्माचा फारच प्रसार झाला होता. हिमाचलापासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र पूर्वी असलेल्या आर्यधर्मानुयायांनी बौद्धधर्माची दीक्षा घेतली. बौद्धधर्मांत जातिभेद नसल्यामुळे द्विज व शूद्र या दोघांचीहि धर्मांतर केल्यावर एकच जात होऊन बसली. एवंच मोठा थोरला समाज बौद्ध बनला होता ही गोष्ट नाकारतां येण्यासारखी नाही. पुढे बौद्धधर्माचा ऱ्हास झाल्यावर ह्या देशांत कोठेच बौद्धधर्मानुयायी उरले नाहीत, असा प्रसंग आला. हिंदुस्थानांतील बौद्धांनी देशत्याग करून चीन किंवा जपान या देशांत वस्ती केल्याचें इतिहासांत कोठेच नमूद नाही. तेव्हा हा एवढा समाज परत हिंदुधर्मांत अंतर्भूत झाला असेंच अनुमान करणें प्राप्त होतें[२].

---

१ जातो नार्यामनार्यायामार्यादार्यो भवेद्गुणैः ।
जातोऽप्यनार्यादार्यायामनार्य इति निश्चयः ।
तावुभावसंस्कार्याविति धर्मो व्यवस्थितः ॥" मनु

२ या बाबतींत डब्ल्यू. टी. उइल्किन्स ह्यांचें निराधार मत अथवा तर्क कोणासहि मान्य होणार नाही.

ह्याच सुमारास चातुर्वर्ण्य बहुतेक नाहींसें होऊन द्विवर्णात्मक समाज झाला होता. ब्राह्मण व ब्राह्मणेतर हींच सामान्यतः समाजाचीं दोन प्रमुख अंगें झालीं. अर्थात् ब्राह्मणेतर बहुसंख्याक व ब्राह्मण अल्पसंख्याक अशी स्थिति झाली. हिंदुस्थानांत ज्या वेळेस आर्य आले त्या वेळेस आर्येतर संस्कृतिहीन तर होतेच, पण त्यांचा एक संघटित समाज नसल्यामुळे एका अर्थानें बहुसंख्याकहि नव्हते, असें मानण्यास हरकत नाही. आर्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इतक्यांचा अंतर्भाव होत होता. त्यांची वस्तीहि विस्कळित नसून एकेच ठिकाणीं होती. त्यामुळे संस्कृतिहीन, संघहीन, विद्याहीन, अशा अनार्यांवर आर्यांची छाप पडणें अगदी स्वाभाविक होतें. पण ज्ञानेश्वरांच्या पूर्वी हा सर्व प्रकार बदलला होता. त्या वेळचे शूद्र सुविद्य, आचारसंपन्न, धर्मपरायण आणि बहुसंख्याक असे होते. अशा समाजामध्ये पुन्हा चातुर्वर्ण्याचें पुनरुज्जीवन करण्यासारखी परिस्थिति नव्हती. बौद्धधर्माला कंटाळून बौद्धधर्मीयांचें परावर्तन हिंदुधर्मांत जरी झालें होतें तरी हिंदुधर्माचें पूर्ववत् आचरण करण्यास हा समाज सर्वस्वी तयार होणें शक्य नव्हतें. एवढ्या मोठ्या समाजाला धर्माचा कोणता मार्ग काढावा, हा तत्कालीन लोकाग्रणींच्या पुढे प्रश्न होता. ह्या प्रश्नाचा निकाल संतांनी कसा दिला हें आपण पाहिलेंच आहे. भागवतधर्माचा प्रसार करून सर्व लोकांना एका ठिकाणीं जमतां येईल, शूद्र अंत्यजादि सर्व जातींच्या लोकांना एकाच देवतेची भक्ति करतां येईल, अशी त्यांनी योजना केली. पंढरीचा विठोबा हाच सर्वांचा देव. ह्या देवासमोर लिंगभेद नाही, मतभेद नाही. सर्वच वैष्णव वीर, परस्परांनी परस्परांना प्रेमपुरःसर आलिंगन द्यावें, नमस्कार करावा आणि उपदेशामृतपान करावें,

---

१ यथा यथा हि सद्वृत्तमातिष्ठत्यनुसूयकः ।
तथा तथेमं चामुं च लोकं प्राप्नोत्यनिन्दितः ॥

मनु

असा हा पंढरींतील अपूर्व महिमा संतांनी घडवून आणिला. स्त्रीशूद्रादिक समाजांत धर्ममतांचा प्रसार करण्याच्या हेतूने ग्रंथलेखनाची भाषा संस्कृतांतून प्राकृतांत आणली एवढेंच नव्हे, तर विठोबा हें एक नवीनच दैवत स्थापन केलें. यामध्ये संतांचा अतुल मुत्सद्दीपणा दिसून येतो. पूर्वींच्याच देवांपैकी एखादा देव पुढे आणण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांना यावें तसें यश आलें नसतें. गाणपत्यांचा विरोध वैष्णवांशीं, वैष्णवांचा शैवांशीं, शैवांचा देवीभक्तांशीं व देव्युपासकांचा खंडोबाच्या भक्तांशीं असा प्रकार असल्यामुळे कर्नाटकांतून एक नवीनच देव महाराष्ट्रांत आणून संतांनी त्याच्या उपासनेचा नवीन मार्ग काढला. न्यायमूर्ति रानडे म्हणतात की, असें करून संतांनी ब्राह्मणेतरांना ब्राह्मणाच्या योग्यतेस चढविण्याचा उपक्रम केला[१]. ही गोष्ट निःसंशय खरी आहे. तथापि संतांच्या पूर्वी ऋषींच्या हातून असे प्रयत्न झाले नाहीत हा जो अर्थ त्यांनी ध्वनित केला आहे तो मात्र आम्हांस मान्य नाही. आमच्या मतें पूर्वपरंपरेला अनुसरूनच, पण नवीन परिस्थितीला अनुरूप, असेंच हें संतांचें कार्य होतें. शूद्रांचा दर्जा पूर्वीच्या ऋषींनी वाढविला, व या वाढलेल्या दर्जाला उचित असें वर्तन आपण त्यांच्या संबंधाने ठेविलें पाहिजें, असेंहि मत सूत्रकारांनी व पुराणकारांनी प्रदर्शित केलें आहे. "आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यम् ।" असें गौतमसूत्र आहे. ह्या सूत्रावरील टीका येणेंप्रमाणेः— 'आर्यः त्रैवर्णिकः अनार्यः शूद्रः तयोः कर्मणः आचारस्य व्यतिक्षेपे व्यत्यासे सति तयोः साम्यमेव भवति । न परिचार्यपरिचारकभावः'. पुढील उतारा मत्स्यपुराणांतील आहेः—

१ शूद्रवर्गाला पारमार्थिक शिक्षण देऊन, त्यांचें समाजामध्ये महत्त्व वाढवून ब्राह्मणांच्या तोडीस या चळवळीनेच आणून बसविलें.

"मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष."

"कर्मभिः शुचिभिर्देवि शुद्धात्मा विजितेन्द्रियः ।
शूद्रोऽपि द्विजवत्सेव्य इति ब्रह्माऽब्रवीत्स्वयम् ॥"

ह्यावरून शूद्रांची उन्नति करण्याचा उपक्रम ज्ञानेश्वरप्रभृति संतांनीच केला असें नव्हे तर त्यांच्या अगोदर ऋषींनीहि केला होता. संतांनी परंपरा पुढे चालविली एवढेंच. आर्यांचा व शूद्रांचा संबंध कलहांत, द्वेषांत, मत्सरांत झालाच नाही. शूद्रांना आपणांत समाविष्ट करून घेऊन त्यांना आपल्या योग्यतेला चढविण्याचा हेतु प्रथमपासूनच द्विजांचा दिसून येतो. म्हणून ह्या बाबतींत न्या. रानड्यांचें म्हणणें मान्य होण्याजोगें नाही. हिंदुसमाजाच्या संघटनेचा अभ्यास शास्त्रोक्त पद्धतीने होत नसल्यामुळे अशा चुका होण्याचा संभव असतो. वरील त्रोटक विवेचनावरून संतांच्या कामगिरीची यथार्थ कल्पना करतां येईल.

# शिकवावें कसें ?

कोणत्याहि राष्ट्राच्या चिरस्थायी वैभववृद्धीस शिक्षण मुख्यतः कारणीभूत आहे हें निर्विवाद आहे. नैतिक, शारीरिक, औद्योगिक वगैरे बाबतींत प्रगति होण्यास शिक्षण हेंच उत्कृष्ट व मुख्य साधन आहे. शिक्षणप्रसार जेथे सार्वत्रिक झाला आहे, तेथे अनीति, निःसत्त्वता, आळस वगैरे मनुष्यास रानटी स्थितींत ठेवणाऱ्या दुर्गुण-समुच्चयाचा लोप झालाच पाहिजे. ज्याप्रमाणे सूर्योदय होतांच दृष्टि-भंजक तिमिराचा नायनाट आपोआप होतो व त्याबरोबरच प्रकाश व आनंद सर्वत्र पसरला जातो; त्याप्रमाणे शिक्षणागमाबरोबर राष्ट्राची दुःस्थिति जाऊन उन्नतिकारक गुणांचा त्या ठिकाणीं प्रादुर्भाव होतो. युरोपच्या इतिहासाकडे पाहतां स्पष्ट दिसतें की, शिक्षणप्रसाराबरोबर त्या खंडाचें पाऊल प्रत्येक बाबतींत पुढे पडत चाललें आहे. तेव्हा राष्ट्राच्या भरभराटीचें मूळ शिक्षणांत आहे हें उघड आहे. जला-वांचून नौका चालणें जसें अशक्य तसें शिक्षणावांचून राष्ट्राची ऊर्जितावस्था करण्याचे प्रयत्न केवळ अशक्य म्हणून निष्फळ होत. ह्याप्रमाणें, राष्ट्राचें केवळ जीवित असणाऱ्या शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे. पण तेवढ्यानेहि काम भागणार नाही. शेतांत भरमसाट बीं टाकल्याने जसें उत्तम धान्य पिकत नाही, तसेंच मूर्खपणाच्या शिक्षणपद्धतीचा अंगीकार केल्याने शिक्षणाचे इष्ट परिणाम घडून येणार नाहीत. हल्ली प्रचारांत असलेली आमच्या इकडील शिक्षणपद्धति इतकी दोषयुक्त आहे की, त्यासंबंधाने ज्याने विचार केला असेल, त्यासच त्या सदोष पद्धतीची यथार्थ कल्पना करतां येईल.

प्राथमिक शिक्षणाचा बोजा सरकारने म्युनिसिपालिट्यांवर टाकला

आहे व इतर शिक्षणासंबंधानेहि सरकारचा कल आपल्या शिरावरील जबाबदारी संधि साधेल तशी कमी करण्याचा आहे. ह्यामुळे त्या विषयाचा विचार करणें आपलें काम आहे. स्वतःच्या खिशांतून खर्चाकरिता पैसे काढून देणारा यजमान, त्या पैशाचें पुढे काय झालें, हें जर न पाहील, तर त्याच्या अकलेची कल्पना आपण काय करूं? सार्वजनिक गोष्टींतहि तोच नियम लागू पडतो. सरकार परकी व परधर्मी असल्याकारणाने आपल्या मुलांच्या सुशिक्षणाविषयी जिव्हाळ्याची कळकळ बाळगील असें संभवत नाही. तशी कळकळ असणें मनुष्यस्वभावाविरुद्ध आहे. सरकारच्या हातून जेवढें होणें शक्य आहे, तेवढें सरकारने जेमतेम केलें आहे; आपण मात्र ह्या कामांत लज्जास्पद हलगर्जीपणा दाखवीत आहों. सर्वांत जें अतिशय महत्त्वाचें काम त्याची आपण मुळीच परवा करीत नाही. गृहकृत्यांत यजमानास विशेष लक्ष देण्याचें प्रयोजन नाही अशा गोष्टींत मुलांचें शिक्षण मोडतें असा आमचा समज आहे. कित्येक ईश्वराचे लाल असे असतात की, आपल्या चिरंजीवाचें अध्ययन कोणतें व कोठपर्यंत चाललें आहे ह्याची त्यांस चंद्रावरील मनुष्याइतकीच माहिती असते. अशा स्थितींत आमचीं मुलें सुशिक्षित निपजलीं नाहीत तर त्यांत बिलकुल आश्चर्य नाही. लहान अर्भकांस शाळेंत पाठविणें तें घरची गडबड टाळण्याकरिता होय हा जेथे समज, तेथे हल्लीच्यापेक्षा निराळे परिणाम कसे अनुभवास येणार? आम्ही आज मितीस शाळाखात्याकडे जो पैसा खर्च करतों, तो आपल्या मुलांस ज्ञानसंपन्न करावयाच्या सुबुद्धीने करीत नाही. त्याची आपणांस कल्पनाहि नाही. तर कांही ठिकाणी सरकाराने आपल्या शिरावर तें काम लादलें आहे म्हणून करतों व कांही ठिकाणीं स्वोदरपोषणाचा मार्ग म्हणून करतों. इतक्या क्षुद्र हेतूने केलेल्या कृतीचें फल आपणांस मधुर कसें लागावें? हल्लींच्या शिक्षणपद्धतीचा अनुभव आपणांस स्पष्ट येत आहे की, तिच्या योगाने मुलांची

नैसर्गिक बुद्धि तीव्र न होतां उलट मंद होते; ज्ञानतृष्णा शिथिल होऊन विचारशक्तीचा ऱ्हास होतो; निरुत्साह व नेभळेपणा आपला पगडा त्यांच्यावर बसवतात; शोधक बुद्धि व चौकसपणा त्यांस अजी सोडून देतात; स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, नैतिक धैर्य, सहिष्णुता इत्यादि प्रशंसनीय व देशोन्नतिकारक गुणांची त्यांस ओळखहि राहत नाही. ह्या सर्वांचें कारण मागे सांगितल्याप्रमाणे आपण आपल्या मुलांना खरें शिक्षण देण्याच्या हेतूने शिकवीत नाहीं हेंच होय. इतर गुणसमुच्चयाविषयी राहो. अर्वाचीन शिक्षणपद्धतीपासून ज्ञानार्जनतृष्णा लुप्तप्राय होऊन ज्ञानविकास जर होत नाही, तर तीस शिक्षणपद्धति म्हणण्यापेक्षा अज्ञानपद्धति म्हणणें जास्त शोभेल ह्यांत संदेह नाही. सूक्ष्मावलोकन करण्याची ज्याला सवय असेल, त्याच्या पाहण्यांत अशीं पुष्कळ उदाहरणें आलीं असतील की, शिक्षणक्रमाच्या प्रारंभीं मुलाची जी तीव्रता व बुद्धिमत्ता दिसून येते ती पुढे पुढे अगदी नाहीशीं होऊन साधारण प्रतीच्या मुलांत तो मोडूं लागतो. हा जबरदस्त विपर्यास होण्यास त्याची शिक्षणपद्धति कारण होते. असें का व्हावें ह्या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट आहे. आपल्या शाळा आपण शिक्षणालयें मानतों ही आपली चूक आहे. ह्या शाळांतील अध्यापकवर्ग शिष्यवृंदास शिक्षण देण्याचें काम क्वचितच करीत असतो. एवढ्या मोठ्या जबाबदारीचें, महत्त्वाचें व अति श्रेष्ठ काम घरांतील अशिक्षित, विचारहीन व ज्ञानशून्य माणसांवर पडतें आणि वारंवार तर बहुतेक प्रसंगीं गुरुशिष्यांचीं दोन्ही कामें शिष्यालाच उरकून घ्यावीं लागतात. गुरूचें काम म्हणजे नेमलेला पाठ मुलांनी घरीं बरोबर तयार केला आहे किंवा नाही हें पाहण्याचें आहे, असाच सर्वत्र समज आढळतो. निदान क्रिया तरी तशी दिसते. गुरूच्या अत्युच्च पदापासून भ्रष्ट झालेल्या अर्वाचीन मास्तरांची योग्यता, काम करून घेणाऱ्या कामकऱ्यांपेक्षा विशेष आहे असें मानण्यास कारण नाही. हें विधान करितांना व्यक्तींस दोष

येत नाही, हें उघड आहे; कारण, तो बऱ्याच अंशीं पद्धतीचा दोष आहे. तेव्हा सांप्रतची विद्याविभूषित मंडळी गुरुसाहाय्यावांचून पुस्तकाच्या मदतीने स्वतःच्या कर्तबगारीवर तयार झाली आहे, हें ध्यानांत ठेविलें म्हणजे फलसिद्धीबद्दल अगदीच वाईट वाटत नाही हें खरें आहे. तथापि गुरूचें साहाय्य न मिळाल्याने जें नुकसान झालें असतें, तेंहि पतकरलें असतें; पण ह्या पद्धतीचा मुलांत उपजत असलेल्या बुद्धीचा ऱ्हास करण्याकडे जो कल असतो तो मात्र शोचनीय आहे ह्यांत संशय नाही. ह्यावरून हल्लीच्या शाळांना शिक्षणालयें म्हणणें म्हणजे शब्दाचा दुरुपयोग करणें होय. तेव्हा अर्वाचीन गुरुवर्यांनी प्रथम हें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे की, आपलें काम, मुलांनी घरीं बापाजवळून, पालकाकडून अथवा शेजाऱ्यापाजाऱ्याकडून धडा समजून घेतला आहे किंवा नाही, इतकेंच पाहण्याचें नसून आपण स्वतः शाळेंत त्यांस शिकविणें हें होय. मुलांस घरीं नवीन धडे तयार करावयास दिल्यास शिक्षकांची व शाळांची अपेक्षा ती काय राहिली? घरीं पालकाला जर मुलां-करिता कालक्षेप व श्रम करावे लागले, तर दर महिना मुलांकरिता आणखी फी खर्च करण्याचा मोबदला काय? हल्लीच्या पद्धतीने मुलांचें जें कांही थोडेंबहुत शिक्षण होत असेल, तें घरीं होत असून शाळेंतील वेळ निव्वळ व्यर्थ जात असतो. मुलगा वाचावयास घरीं शिकणार; भाषांतर, अर्थ घरीं समजावून घेणार; इतिहास, भूगोल घोटघोटून तयार करून शाळेंत जाणार; आणि शिक्षक शाळेंत काय करणार? तर हें सर्व मुलाने केलें आहे, किंवा नाही तें पाह-णार! ह्यास शिक्षणपद्धति हें नांव देण्यापेक्षा परीक्षणपद्धति हें नांव देणें विशेष यथार्थ होईल. ह्यासाठी शिक्षकवर्गाचें ह्या दुष्ट पद्धती-कडे जितकें लवकर लक्ष जाईल तितकें बरें. कारण, शिक्षकाच्या-ऐवजी बापाला किंवा पालकाला श्रम करावे लागतात, एवढेंच ह्यांत व्यंग आहे असें नव्हे तर शिक्षणाचा हेतुच त्यांत समूळ नाहीसा

होत आहे. सिद्धांताचीं सर्व पुस्तकें मुलाला पाठ येत आहेत ह्यांत शिक्षणाचें पर्यवसान नाही, तर मागल्या सिद्धांतावरून पुढला सिद्धांत कसा निष्पन्न होतो हें त्याच्या ज्ञानशक्तीने त्यास समजणें फार महत्त्वाचें आहे. परंपरेने ज्यास ज्ञान संपादन करतां येईल, एका मागून एक असे ज्ञानतंतु ज्यास अवगत होतील, त्यासच यथार्थ रीतीने ज्ञान संपादन करतां येईल. मुलास घरीं धडे तयार करावयास दिल्याने ह्या परंपरेचा तो कधीच उपयोग करीत नाही. निर्वाहाचें साधन म्हणून लेखकांनी लिहिलेलीं चोपडीं तयार असतात. त्याबरहुकूम उत्तर वठल्यावर आमचा शिक्षकवर्गहि जास्त भानगडींत पडत नाही. ह्याचा परिणाम अर्थात् विचारशक्तीचा ऱ्हास होतो; शोधकबुद्धि पूर्णपणें मावळते; व स्मरणशक्तीवर जबरदस्त भार पडल्याने एकंदर शरीर लवकरच अशरीर होतें. ह्याशिवाय ज्ञानवृद्धीस ह्या पद्धतीपासून आणखी प्रतिबंध कसा होतो तो पहा. शिक्षकवर्ग मुलांस घरीं धडे तयार करावयास देत असल्यामुळे घरचा वेळ व शाळेंतील वेळ मिळून सर्व दिवसभर शाळेंत सुरू असलेल्या दुष्ट पद्धतीवांचून अन्य रीतीने ज्ञान संपादन करण्यास मार्गच राहत नाही. वयाच्या सहाव्या वर्षापासून अखेर अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत म्हणजे जवळ जवळ तिसाव्या वर्षापर्यंत अर्धें आयुष्य अधिकारी वर्गाने नेमलेल्या पांचपन्नास पुस्तकांचें अध्ययन अथवा पाठीकरण करण्यांत जर खर्च होतें, तर खऱ्या ज्ञानवृक्षाचीं अमृततुल्य फळें आम्हांस लाधलीं नाहीत तर त्यांत आश्चर्य नाही. शिक्षणक्रमांतील थोड्याशा पुस्तकांतच गढलेल्या अर्वाचीन पदवीधरांवर व्यवहारज्ञानशून्यत्वाचा आरोप येतो, त्याचेंहि कारण हेंच आहे. अल्पवयापासून कंठशोष होईपर्यंत घोक घोक घोकणाऱ्या मुलाला पाहून कींव येते. त्या बिचाऱ्यास पुस्तकाशिवाय इतर भोंवतालच्या गोष्टींचा विचार करण्यास एक क्षणभरहि फुरसत मिळत नाही. शाळेंत जाण्याच्या पूर्वी मुलाला प्रत्येक गोष्ट समजून घेण्याची जी हौस असते, ती शाळेंत गेल्या-

बरोबर अस्तंगत होते. ज्ञानसीमा संकोच पावते. शाळेंतील धडे घोकणें ह्याशिवाय बाकीचें सर्व अनवश्यक आहे असा त्याचा समज होत जातो. तेव्हा हल्लीच्या शिक्षणपद्धतींत पहिली सुधारणा करणें म्हणजे शिक्षकांनी मुलांकडून सर्व धडे शाळेंत तयार करून घेणें हें होय. ह्यापासून मुलांची तयारी चांगली होऊन तीं परीक्षेंत पास होणार नाहीत असें अविचारी मास्तरांस कदाचित् वाटेल; पण वास्तविक प्रकार निःसंशय तसा होणार नाही. समजा, मराठ्यांचा इतिहास शिक्षणक्रमांत नेमला आहे. हल्लीच्या पद्धतीने तो इतिहास घरीं वाचण्यांत मुलाचा सकाळ संध्याकाळचा वेळ जातो व शाळेंत दुपारीं मास्तराने विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत जातो. ह्याच्या योगाने नेमलेल्या पुस्तकाशिवाय दुसऱ्या पुस्तकांचें अवलोकन करण्यास सवडच राहत नाही. परंतु शिक्षक शाळेंतच प्रथमतः समजून देण्याची तसदी घेतील, तर त्या इतिहासापैकी निरनिराळ्या राजपुरुषांचीं व मुत्सद्यांचीं चरित्रें, युद्धाचीं वर्णनें वगैरे वेगळ्या पुस्तकांतून वाचण्यास संधि मिळेल; आणि अशा रीतीने शाळेंत दिलेली माहिती दृढ होईल. एकच गोष्ट एकाच पुस्तकांतून वारंवार वाचण्यापेक्षा निरनिराळ्या पुस्तकांतून वाचल्याने चांगली ध्यानांत राहते. वाचण्यास कंटाळा न येतां हौस वाटते. निरनिराळ्या भाषेशीं मुलाचा परिचय होतो; वाचनाची सवय वृद्धिंगत होते; 'कमजास्त महत्त्वाच्या गोष्टी आपोआप लक्षांत येतात; व मुलाचें मन जास्त उल्लसित होऊन विकास पावतें.

वरील विवेचनावरून असें दिसेल की, हल्लीच्या अध्यापकांकडून शिष्यवृंदास वास्तविक शिक्षण मुळींच दिलें जात नाही. तथापि त्यांतल्या त्यांत नाइलाजास्तव जें कांही शिकविलें जातें, तें शिकविण्याची पद्धति किती मूर्खपणाची, बुद्धिघातक व नष्ट असते, त्याचा विचार आता केला पाहिजे; पण त्यापूर्वी सामान्य दोषांचा उल्लेख करणें गैरशिस्त होणार नाही. शिक्षकाचें पहिलें कर्तव्य हें आहे की,

त्यांनी, शालागृहें जितकीं मनोवेधक करवतील, तितकीं करून स्वतःच्या गृहापेक्षा विद्यार्थ्यांना तीं विशेष प्रिय होतील असा प्रयत्न चालविला पाहिजे. लहान मुलांस शाळेंत जावयास जितका उत्साह वाटेल, शिकविण्यासंबंधाने त्यांच्या मनांत जितकी आस्था उत्पन्न होईल, त्या मानाने शिकविण्याची तऱ्हा स्तुत्य आहे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाही. वर्गांत शिकवितांना ज्या मास्तराचा बहुतेक अध्यापनकाल आपल्या शिकण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अवधानहीन विद्यार्थ्याला धाकदपटशा देण्यांत जातो, त्या मास्तराने आपल्या धंद्याला कायमचा निरोप देण्यांत त्याचें व विद्यार्थिवर्गाचें हित आहे. शिकविण्याकडे मुलाचें लक्ष लावण्यास बिचाऱ्या मास्तरास अंगभूत गुण नसल्यास आगंतुक आविर्भावाची मदत घ्यावी लागते. पण त्यास असें समजत नाही की, त्यांत मुलाचा वाक नसून तो आपल्या शिकविण्याच्या पद्धतीकडेच आहे. शिकविण्याची हातोटी जर चटकदार, मनोरंजक व ज्ञानविकासक असेल, तर मुलांचें लक्ष विषयाकडे लागलेंच पाहिजे. हें प्रमाण जर खरें असेल तर सांप्रत चालू असलेल्या शिकवण्याच्या तऱ्हेंत मोठीच गोम आहे ह्यांत संशय नाही. व त्याचें कारण असें आहे की, शाळेंत जें कांही आपण शिकतों, त्याचा व्यवहारांत प्रत्यक्ष उपयोग नाही असा शिकणाराला भास होतो. आपल्या सभोंवतीच असलेल्या, हरघडी आपल्या कामीं पडणाऱ्या पृथ्वीवरील नानाविध वस्तूंचा आणि असंख्य घटनांचा खुलासा करून घेण्यास आपण शाळेंत जातों, व हेंच काय तें तेथे शिकावयाचें असा समज त्याचा कधीच केला जात नाही. शाळेंतील शिक्षण म्हणजे कांही तरी गौडबंगाल आहे. व्यवहाराशीं त्याचा अर्थाअर्थी संबंध नाही, द्रव्यप्राप्तीचें साधन आणि थोडाबहुत नांवलौकिक होण्याचा मार्ग ह्याच बुद्धीने जें शिक्षण ग्रहण केलें जातें, त्या शिक्षणाला हल्लीची पद्धतिच पूर्ण अनुकूल आहे हें स्वाभाविक आहे. अशा शिकण्यास घोकण्यास सुलभ पडेल अशा चोपड्यांची

चांगलीच मदत व्हावी व तीं वापरण्यास मास्तरांनी मुलांस ताकीद द्यावी, ह्यांतहि नवल नाही. वास्तविक पाहिलें असतां शिकवणाराने मुलांच्या हातांत पुस्तकें कधीहि देऊं नयेत. कोणताहि नवीन विषय पुस्तकावरून तयार करण्यास त्यांस सांगूं नये. गुरुमुखांतून प्रत्येक गोष्ट समजून घेण्याची पूर्वीची पद्धति फारच प्रशंसनीय आहे. आमच्या पंतोजींनी पक्कें ध्यानांत ठेवावें की, पुस्तकावरून शिकणें हें अप्रत्यक्ष ज्ञान संपादन करणें होय. प्रत्यक्ष ज्ञानापुढे त्याची किंमत काय होय? आमची मास्तर मंडळी तर पुस्तकांत इतकी गढून गेलेली असते की, डोंगराची व्याख्या अल्पवयस्क बालकापासून घोक घोकवून घेत असतां त्यांस जरा बाहेर घेऊन जवळच असलेला डोंगर प्रत्यक्ष दाखविण्याचें त्यांच्या स्वप्नींसुद्धा येत नाही. ह्यामुळे मुलांचा असा विलक्षण समज बनतो की, पुस्तकांतील डोंगर व पृथ्वीवरील डोंगर निराळे आहेत. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. भूक लागली असतां पिठाच्या भाकरीच्या ऐवजीं तदाकृति मृत्तिका भक्षिली तर क्षुधानिवारण न होतां उलट जसा अनिष्ट परिणाम होईल, तसा प्रकार कांही अंशीं शिकविण्याच्या अर्वाचीन तऱ्हेने होत आहे. एवढ्यासाठी सरकाराने, म्युन्सिपालिट्यांनी व लोकाग्रणींनी आपापल्या शाळांत प्रत्यक्ष ज्ञान संपादन करण्याच्या साधनांची तजवीज करणें अगत्याचें आहे. वर सांगितलेंच आहे की, कोणताहि नवीन विषय शिकवतांना शिक्षकाने तो पुस्तकांच्या द्वारा शिकवूं नये. आकुंचित वाक्यज्ञान मुलांस करून द्यावयाचें नाही तर एकंदर विषयाचें ज्ञान द्यावयाचें आहे हें शिक्षकवर्गाने पूर्णपणें लक्षांत बाळगलें पाहिजे. श्रवणलीन शिष्यवर्गास पूर्णपणें अध्ययनविषय मुखद्वाराने स्पष्ट करून सांगितल्याने तो मनावर उत्कृष्टपणे बिंबलाच पाहिजे. त्यामुळे पुस्तकांतील गोठलेल्या कज्जलांत कुचंबत न पडतां पवित्र व स्वच्छ अशा विषयजलांत अवगाहन करण्यास सांपडतें. पुस्तकांना प्राधान्य देणें अगदी गैर आहे. सर्व विषयांचें योग्य परिशीलन झाल्यावर

स्मरणशक्तीस साहाय्यकारक म्हणून पुस्तकांचा उपयोग करणें वाजवी होईल. विश्वविद्यालयाचे विद्वान् व सुशिक्षित आंग्ल पंडितसुद्धा विषयज्ञानापेक्षा पुस्तकवाचनाला इतकें महत्त्व देतात की, पुस्तकाबाहेर आम्हीं प्रश्न विचारीत नाहीं, असा एकेकाचा बाणा असतो. त्याचप्रमाणे, मराठी अथवा इंग्रजी शाळांची परीक्षा घेणारांससुद्धा पदोंपदीं ह्या गोष्टीचा अनुभव येत असेल. ‘ हें पुस्तकाच्या बाहेरचें आहे ’ ‘ तें मुलांस शिकविलेलें नाही ’ हीं मास्तरांचीं ठरीव वाक्यें वारंवार त्यांच्या कर्णरंध्रांवर पडत असतात. असल्या मूर्खोद्गाराचें मुख्य कारण असें आहे की, आपल्यास विषय शिकवावयाचा आहे, त्यास पुस्तक केवळ अल्पसें साधन आहे, ही गोष्ट शिक्षकवर्ग सामान्यतः विसरून जातो. येथे पुस्तक हें जें म्हटलें आहे, तें अर्थात् शाळेंत नेमलेलें पुस्तक होय. अशा तऱ्हेने विषयाची तोंडीच माहिती करून देणाऱ्या शिक्षकास घरीं जास्त श्रम करावे लागतील हें उघड आहे; पण तें त्याचें कर्तव्यच आहे. त्याविषयी कुरकुर करण्यांत अर्थ नाही. पुस्तकांचें विवेचन चाललें असतां, येथे हें सांगणें जरूर आहे की, शाळाक्रमांत नेमलेलीं पुस्तकें फार वाईट आहेत अशी जी ओरड आहे, त्यांत विशेषतः अर्थ नाही. सांप्रतच्या पुस्तकांत सुधारणा करण्यास मुबलक सवड आहे, ह्याविषयी कांहीच वाद नाही; परंतु हल्लीच्या शिक्षणाचे दुष्ट परिणाम प्राधान्यतः त्या पुस्तकांवर लादणें अगदी रास्त नाही. दुर्बलाच्या हातांत पाणीदार तरवार दिली असतां तिचा त्यास उपयोग नाही, त्याप्रमाणे उत्कृष्ट पुस्तकें अज्ञ शिक्षकवर्गाच्या हातांत पडलीं तरीसुद्धा त्यांचा त्यांस कांहीएक उपयोग करतां येणार नाही; परंतु शिकविण्याच्या कामीं पुस्तकांना सर्व महत्त्व देणाऱ्या लोकांकडून ही चूक होत आहे. शिकविण्याच्या पद्धतींत सर्व दोष आहे व त्याचेच दुष्ट परिणाम आज मितीला आपण भोगीत आहों.

पुस्तकाच्या पलीकडे नजर न फेंकणाऱ्या आकुंचित दृष्टीच्या

मास्तरांच्या शिक्षणपद्धतीचा वर उल्लेख केला. आता निरनिराळे विषय कोणत्या रीतीने शिकवावे ह्याचें दिग्दर्शन करूं. विद्याखात्याने निरनिराळ्या वर्गाकरता ज्या इयत्ता ठरविल्या आहेत त्या बऱ्याच समंजसपणाने ठरविल्या आहेत ह्यांत संशय नाही. पण दुर्दैवाने आमचे गुरुजी व त्यांतूनच चढलेले परीक्षक त्याप्रमाणे बिलकुल चालत नाहीत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही; पुष्कळ मुलें पास झालेलीं पाहण्याच्या अविवेकी हांवेने प्रत्येक गोष्ट मुलाकडून तोंडपाठ करून घेण्यांत आमचा शिक्षकवर्ग निष्णात बनला आहे. मग ते तोंडपाठ करण्यासारखे विषय असोत वा नसोत. ह्याचें प्रत्यंतर पाहणें असल्यास गणिताच्या कोष्टकाप्रमाणे इतिहासाचे परिच्छेद घोकतांना मुलांस पाहिलें म्हणजे समजेल. गणितासारख्या दुर्बोध विषयापेक्षा भाषाविषय मुलांस लवकर समजावयास लागतो. तेव्हा प्रथम गणितापेक्षा त्या विषयाकडे विशेष लक्ष देणें योग्य आहे. क्षणोंक्षणीं, विद्यालयाच्या बाहेर त्यांचें भाषाज्ञान चाललेंच असल्यामुळे सुशिक्षणाचा त्यांच्यावर चांगला संस्कार होण्याचा संभव आहे. पण हल्लीच्या पद्धतीने विपरीत परिणाम होत आहे व तसें होणें स्वाभाविक आहे. भाषा शिकवणें म्हणजे अर्थात् निरनिराळ्या वाक्यरचनांशीं व विपुल शब्दसंग्रहाशीं मुलाचा परिचय करून देणें होय. पण तसें करतांना सुबोध व परिचित शब्दांचा अर्थ दुर्बोध व अपरिचित शब्दांनी मुलांकडून घोकून घेणें गैर होय. वस्तुतः मुलांनी कधी न पाहिलेल्या वस्तूचा वाचक शब्द आल्यावर त्या शब्दाचा अर्थ दुसऱ्या एका कठीण शब्दाने न सांगतां वस्तुनिदर्शन करून व्यक्त केल्याने मुलांच्या स्मरणशक्तींतून तो कधीहि जात नाही. शब्दार्थ म्हणजे कठीण शब्दांचा अर्थ सोप्या व परिचित शब्दाने मुलांकडूनच काढून घेतला पाहिजे. त्यांस शब्दार्थांचीं पुस्तकें घोकावयास लावण्याची अवश्यकता नाही. रवि शब्द जोपर्यंत अवगत नाही, तोंपर्यंत सूर्याचा प्रतिवाचक रवि म्हणून घोकवून घेणें

चुकीचें आहे. धड्यामध्ये नवीन शब्द आला असतां वस्तुज्ञान व तद्वाचक पूर्वी गेलेला शब्द ह्यांच्या साहाय्याने तो तितकाच ध्यानांत ठेवणें एवढेंच त्या वेळेस मुलाचें काम आहे. त्याचप्रमाणे शब्दाची व्युत्पत्ति, एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ, त्यांचा परस्पर संबंध वगैरे मुलांकडून काढून घेणें फार अगत्याचें आहे. उदाहरणार्थ, 'तरुस नूतन पल्लव फूटती' ह्यांत फुटणें ह्याचा अर्थ काय? मडकें फुटणें ह्या वाक्यांत तेंच क्रियापद कोणती क्रिया व्यक्त करतें? ह्या दोन क्रियांतील वरवर दिसणारा विरोध वास्तविक नसून दोनहि ठिकाणचे शब्द एकाच क्रियेचे व्यंजक कसे आहेत, वगैरे गोष्टी आपण न सांगतां मुलांकडूनच काढून घेतल्याने विषय किती मनोवेधक होईल हें सांगावयास नको. भाषेशीं व्याकरणाचा निकट संबंध असल्यामुळे, तेंहि अशाच रीतीने शिकविणें जरूर आहे. विशेषणनामादिकांच्या व्याख्या घोकून घेण्याच्या ऐवजी गाय शब्द उच्चारल्याबरोबर किती व्यक्ति डोळ्यासमोर उभ्या राहतात; परंतु पाठीमागे पांढरी हे विशेषण लावल्याबरोबर गाय शब्दाने व्यक्त होत असलेल्या प्राणिवर्गांतून कशी संख्या गळते हें मुलांकडून स्पष्ट करून घेतल्यावर विशेषण म्हणजे काय हें मुलांच्या मनावर दृढपणें विंबलेंच पाहिजे. त्याचप्रमाणे, विशेषणावरून नामाची कल्पना कशी आपोआप उत्पन्न होते, ती व्यक्त करण्यास भाषेंत काय साधन आहे, नामाचीं विशेषणें कशीं होतात, क्रियापदांचीं नामें कशीं होतात इत्यादि प्रकार पुस्तकाच्या साहाय्यावांचून मुलांना सांगतां येतील असा प्रयत्न शिक्षकांनी केला पाहिजे. दुसऱ्या एका गोष्टीकडे हल्ली दुर्लक्ष केलें जातें, ती ही की, नवीन शब्द आल्याबरोबर तद्वाचक वस्तूची संपूर्ण माहिती देण्याचा तादृश प्रयत्न कधी कोणीहि शिक्षक करीत नाही. शब्दज्ञानाबरोबर तद्व्यंजक पदार्थाचें ज्ञान मुलांस त्यांच्या शक्तीच्या मानाने करून देणें अवश्य आहे; परंतु आश्चर्य आहे की, वारंवार उच्चारल्या जाणाऱ्या शब्दांनी दर्शित पदार्थांविषयी पूर्ण अज्ञान

असतां भूमितीसारखे गहन विषय मुलांवर लादले जातात. कोणताहि विषय शिकवावयाचा म्हणजे त्या विषयांत थोड्याशा मदतीने मुलाची स्वतः गति चालेल इतकी त्याची योग्यता आली पाहिजे. घरांहून सिद्धांत तयार करून आणण्यास सांगण्यापेक्षा मागच्या सिद्धांताच्या आधारें पुढला सिद्धांत कसा सिद्ध होतो, हें एकामागून एक प्रश्न विचारून मुलांकडून शाळेंत तो सिद्धांत सिद्ध करून घेण्याचा प्रयत्न जर शिक्षकवर्ग करील, तर मुलांच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही; परंतु हल्लीच्या पद्धतीने युक्लिडचीं पुस्तकांवर पुस्तकें तयार करणाऱ्या सिद्धांतपटु मुलांची योग्यता गुळाच्या गोणी वाहणाऱ्या भारवाहकांपेक्षा तिळभरहि जास्त नाही.

वर सांगितल्याप्रमाणे,इतिहासाचे परिच्छेद मुलांकडून घोकून घेणाऱ्या शिक्षकांच्या तद्विषयक अज्ञानाविषयी फार आश्चर्य वाटतें. परंतु छात्रवर्गाच्या दुर्दैवाने असल्या शिक्षकांचीच विद्यालयांत फार दाटी झाली आहे. इतिहासाचें खरें स्वरूप समजण्यास समाजशास्त्राची बरीच माहिती असणें जरूर आहे. समाज म्हणजे काय, राजा व प्रजा हा संबंध कसा उद्भूत झाला इत्यादि समाजशास्त्रांतल्या नियमांची ओळख असल्याविना इतिहासाचें रहस्य कळणें अशक्य आहे. पूर्वीच्या लोकांच्या रीतिभाती, त्यांचा ज्ञानसंचय, त्यांच्या उत्कर्षापकर्षाचीं कारणें वगैरे माहिती इतिहासापासूनच मिळाली पाहिजे; पण चमत्कार हा की, परीक्षकांच्या प्रश्नपत्रांत असल्या प्रश्नांना बिलकूल थारा मिळत नाही. तारखा आणि लढायांचीं वर्णनें हे ठराविक प्रश्न होत. जणूं काय मुलांना निष्णात शिपाई किंवा सेनाधिपति बनविण्याचा विद्याखात्याचा बेत आहे. लढायांच्या वर्णनाचा सामान्य लोकांस कांही उपयोग नाही. करिता त्यासंबंधाचीं निराळींच पुस्तकें झाल्यास बरें. लढाई उद्भवण्याचीं कारणें, ती केव्हा व कोठें झाली, शेवट काय झाला व जयापजयाचीं कारणें, इतक्याच गोष्टी इतिहासांत सांगितलेल्या असाव्या. बाकी कायदेकानू, राज्यव्यवस्था, रीतिभाती,

धर्म, आचार, विद्या व लोकस्वभाव वगैरे गोष्टींनी तो भरलेला असावा. ह्या दृष्टीने हल्लीचे इतिहास गचाळ ठरतात. आता कोणताहि विषय शिकवितांना शिक्षकाने प्रथम पुस्तकांचा उपयोग करूं नये हें मागे सांगितलेंच आहे. तोच नियम इतिहासासहि लागू आहे. लहान मुलांस तर निःसंशय गोष्टीच्या रूपाने शिक्षकाने इतिहासाची माहिती करून द्यावी. त्याचप्रमाणे, नकाशावरून इतिहास शिकविणें कसें शक्य आहे ह्याची तर कल्पनासुद्धा कोणास होत नाही; अथवा हल्लीच्या विशालबुद्धि शिक्षकांस त्याची अवश्यकता भासत नसल्यास कोण जाणे! ज्या गोष्टी शिकण्याची तादृश गरज नाही, त्यासाठी हल्ली उरस्फोड केली जाते, व ज्या शिकणें अत्यंत अवश्य आहे, त्या कोणी शिकवीत नाही, असा प्रकार सर्वत्र चालू आहे. दक्षिणेंत राहणाऱ्या बाजीराव पेशव्याचा, शिंदे, होळकर, गायकवाड ह्या सरदारांस उत्तर हिंदुस्थानांत जहागिरी देण्याचा उद्देश दिल्लीच्या स्वैरगतीस प्रतिबंध करण्याचा होता, हें आमच्या मुलांच्या लक्षांत आणून देण्याचें कोणत्याहि मास्तराच्या स्वप्नीं देखील येत नाही. पेशव्याने गायकवाडास गुजराथेंत मुलूख दिला इतकें घोकून घेणें मास्तरांस पुरेंसें वाटतें. मग घोकणाऱ्या मुलास गुजराथ कोठें आहे हें माहीत नसलें तरी चालतें. महमद तघलखाने एक राजधानी बदलून दुसरी केली इतका तो वेडा होता, इतकें मुलांनी ध्यानांत ठेविलें म्हणजे त्यांस परीक्षेंत भरपूर मार्क मिळण्यास अडचण पडत नाही. परंतु राजधानी बदलणें हें वेडेपणाचें कृत्य कसें ठरतें हें मुलांस माहीत असलें पाहिजे ही इच्छा शिक्षकांचीहि नसते व परीक्षकांचीहि नसते. ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टीचें कारण जर मुलास समजेल तर ती गोष्ट त्याच्या चटकन ध्यानांत राहते, बुद्धि विकसित होते, विषय मनोवेधक होतो आणि ज्ञानतृष्णा जागृत होते. खालील लढायांच्या तारखा लिहा म्हणून बिनदिक्कत प्रश्न विचारणाऱ्या विद्वान् परीक्षकांच्या मूर्खपणाचें प्रत्यंतर आणखी काय पाहिजे? प्रत्येक गोष्टींचें

महत्त्व आहे हें आम्ही जाणून आहों आणि तें महत्त्व मुलांस समजून द्यावें हाच आमचा आग्रह आहे. असें महत्त्व समजून तारखा ध्यानांत ठेवण्यास आमची हरकत नाही. एका कालांत दुसऱ्या कालापेक्षा लढाया विशेष झाल्या, तर त्या दोन कालांत राज्याची अन्तर्गत स्थिति कशी होती; ज्या तारखेस एक लढाई झाली त्याच तारखेस दुसरें महत्त्वाचें राज्यकारस्थान पाठीमागे असतां तें कसें तडीस गेलें, वगैरे गोष्टी समजण्याकरता तारखांचाहि उपयोग होईल. इतिहासासंबंधी जें सांगितलें तेंच भूगोलाविषयी. घरीं पुस्तकांतून पाठ करण्यास न देतां नकाशावरून शिक्षकाने शिकविणें जरुरीचें आहे. सामुद्रधुनी, भूशिर वगैरेचा प्रथम पदशः अर्थ सांगून शिक्षकाने मुलांस नकाशावरती तीं ओळखण्यास सांगावें. मग नकाशावर नांवें मुलांस वाचण्यास सांगून नद्या, पर्वत, बेटें, शहरें, प्रांत, संयोगभूमि इत्यादि सर्वांची माहिती मुलांस करून द्यावी. अशा रीतीने शिकवलें असतां सामुद्रधुनी दाखव म्हणून विचारलें तर संयोगिभूमीकडे मुलांचा हात धावणार नाही. विचार करण्याची सवय आमच्यांतून इतकी नाहीशी झाली आहे की, अति दूरच्याहि तिबेटांतील सरोवरें घोकतांना मुलांना आम्ही मोठ्या आनंदाने पाहतों व त्यांस उत्तेजन देतों. निरनिराळ्या देशांतील भूशिरें, संयोगिभूमी, सामुद्रधुनी, ह्यांचीं नांवें घेऊन काय नफा आहे, हें एका विद्याखात्यालाच माहीत. ज्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत त्यांची कोणीच परवा करीत नाही. सनद देशांत नदीहीन देशापेक्षा उत्पन्नाची सोय, पर्वत उंच व पुष्कळ असल्याने हवेवर होणारे परिणाम, कोणत्या देशांत कोणते पदार्थ उत्पन्न होतात, व ते तेथेच होण्याचें कारण, निरनिराळ्या देशांत जाण्यायेण्याचे मार्ग, इत्यादि माहिती देण्याची कोणी तसदीहि घेत नाही. एकंदरींत पद्धतवार शिकवण्याची आम्हांला सवयच नाही. इंग्रजी शिकण्यास आरंभ करतांच पहिला धडा घरीं पाठ करून येण्यास मुलांस मास्तराने सांगितलेंच. पण अक्षराची

ओळख प्रथम करून देऊन त्यांचे उच्चार सांगून मग निरनिराळीं अक्षरें एके ठिकाणीं करून त्यांच्यापासून होणाऱ्या शब्दांचे उच्चार मुलांकडून करवून घेणें ह्या कामीं जर शिक्षकांनी पहिले ८।१५ दिवस खर्च केले, तर कोणत्याहि शब्दाचा उच्चार करण्याची मुलांची अडचण बरीच नाहीशी होईल.

इंग्रजी भाषेंतून प्रत्येक विषय हायस्कुलांत शिकवला जातो, ह्यामुळे पूर्ण ज्ञानसंपादनास चांगलाच प्रतिबंध होतो. ज्या मुलांना साधे विचारहि इंग्रजींतून प्रदर्शित करण्याची मारामार, त्यांस त्या परकी भाषेंत लिहिलेल्या राष्ट्राच्या नानाविध चळवळींचा इतिहास वाचावयास लावणें फारच वाईट आहे. इतिहास वाचतांना मुलांचा सर्व रोख इंग्रजी शब्द व वाक्यें ध्यानांत ठेवण्याकडे असतो. कोणताहि विषय शिकतांना त्याच विषयाकडे एकाग्र चित्त लागलें पाहिजे; मध्ये व्यत्यय येत असेल तर एकाग्रता राहणार नाही. उत्तरें इंग्रेजींत लिहिणें भाग असल्यामुळे इंग्लिश वाक्यरचना लक्षांत ठेवण्यांत प्राधान्यतः मुलाचे परिश्रम चाललेले असतात. परंतु वाक्यांतर्गत अथवा इतिहासाचें रहस्य जाणण्याकडे त्याच्या हातून सर्वथा दुर्लक्ष होत असतें. एक विषय शिकत असतां मानसिक शक्तीचा व्यय दुसऱ्याकडे करणें जर अवश्य असेल तर तद्विषयक ज्ञानार्जनांत न्यूनता आलीच पाहिजे. एकाच वेळीं दोन गोष्टींकडे सारख्याच परिणामाने लक्ष राखणें अशक्य आहे. म्हणून प्रत्येक विषय इंग्रेजींतून शिकविण्याची चालू वहिवाट खऱ्या व पूर्ण ज्ञानवृद्धीस व्यत्ययकारक होत आहे. परंतु लहान मुलांच्या शिक्षणाचा पतकर घेणाऱ्या मंडळीच्या ध्यानांत ही गोष्ट येत नाही, हें दुर्दैव आहे. त्या कामांत सरकारावर अवलंबून राहण्याची गरज नाही. खासगी शाळांच्या हातून ही गोष्ट सहज होण्यासारखी आहे. पण उपजीविकेचें साधन म्हणूनच केवळ अंगीकारलेल्या व्यवसायांत सुधारणेची कल्पना कोठून येणार ? सर्व विषय मराठींत शिकविले असतां, हल्लीपेक्षा पुष्कळ वेळ कमी लागेल.

प्रवेशपरीक्षेचे सर्व विषय सहावे इयत्तेंत पुरे होतील, व पुढे वर्ष किंवा दीड वर्ष अनुभवांतीं ठरेल त्याप्रमाणे तेच विषय पुनः इंग्रजींतून शिकविले असतां प्रवेशपरीक्षेच्या प्रश्नांचीं उत्तरें इंग्रजींत देण्यास मुलांस अवघड जाणार नाही. ह्याप्रमाणे विश्वविद्यालयाच्या परीक्षे-संबंधी असलेल्या अटी पाळून आपलें काम होईल. पण हें व्हावें कसें ? खासगी शाळा दर वर्षास नवीन नवीन अस्तित्वांत येत आहेत. पण जुना कित्ता –तोहि गचाळ रीतीने– गिरविण्यापलीकडे त्यांच्या हातून कांही होत नाही. आणि ह्याचें कारण इतकेंच की, विद्यमान पद्धतींतील दोष काढून टाकण्याच्या सद्बुद्धीने एकहि संस्था निघा-लेली नाही. लॉन्टेनिस अथवा क्रिकेट ग्राउंडची अवश्यकता ज्या संस्थाधिपतींस जाज्वल्य भासते, त्यांस नानाविध वृक्षप्रचुर उद्या-निका शाळेसभोंवतीं करून, तत्संबंधी मुलांस सज्ञान करणें जरूर वाटत नाही हें विस्मयकारक आहे. सारांश, विद्यार्थिवर्गांत प्रत्यक्ष व अनुभविक ज्ञान प्राप्त करून देण्याची तरतूद प्रत्येक विद्यागृहांत झाली पाहिजे. सृष्टिवैचित्र्य, नैसर्गिक चमत्कार –निदान आसपासचे तरी– मुलांस दाखवून त्यांची ज्ञानतृष्णा वाढविणें हें खऱ्या शिक्षण-क्रमांत कां येऊं नये ? परीक्षेकरिता मुलें तयार करणें हीच आपली इतिकर्तव्यता न समजतां विस्तीर्ण ज्ञानाशयाशीं त्यांचा परिचय करून देणें ह्या उद्देश शिक्षकांच्या मनांत असेल तर, मुलांच्या ज्ञाना-र्जनांत हल्लीपेक्षा विशेष सुधारणा दृग्गोचर झाल्याविना राहणार नाही. इंग्लिश धर्तीवर अलीकडे बोर्डिंगाचीहि सुरवात इकडे झाली आहे; पण त्यापासून मुलांच्या खाण्यापिण्याच्या सोयीपलीकडे मह-त्वाचा फायदा मुलांस करून देतां येईल ह्या गोष्टीकडे आमचें लक्ष जात नाही. गुरुसंनिध छात्रवर्ग असतां फुरसुतींअंतीं गुरूंस निर-निराळ्या अवांतर विषयांची माहिती, साध्या व सोप्या शब्दांनी व्याख्यानद्वारा मुलांस करून देण्यास उत्कृष्ट संधि मिळते; निर-निराळ्या पुस्तकांतून काढलेल्या निवडक कथांच्या कथनाने मुलांची

नीतिमत्ता वाढवितां येते; मनें सुसंस्कृत करतां येतात; दृढनिश्चय, स्वार्थत्याग इत्यादि उच्च गुणांचा विकास करतां येतो. अशा रीतीने पुढे राष्ट्रधू वाहण्यास मुलें सर्वथैव पात्र होतात. पण सांप्रतच्या पद्धतीने ही भोजनभाऊ मंडळी आलस्य, अनिश्चय व मतशून्यता इत्यादि दुर्गुणांनी मात्र गुरफटून बाहेर पडते.

सारांश, पुस्तकज्ञान मुलांस करून देण्यापेक्षा विषयज्ञान करून देणें अगत्याचें आहे, हें शिक्षकवर्गाने मनांत बाळगणें; शिकवितांना पुस्तकांचा उपयोग मुलांकडून न करवितां व्याख्यान अथवा संभाषणद्वारा तो त्यांस समजाविणें; मुलांची जिज्ञासा वाढेल अशा रीतीने प्रत्यक्ष व अनुभविक ज्ञान त्यांच्याकडून संपादविणें; पांचव्या, सहाव्या इंग्रजी इयत्तेपर्यंत सर्व विषय मराठींतून शिकविणें; मुलांमध्ये सात्त्विक गुण येतील असा प्रयत्न करणें; इत्यादि गोष्टी वरील छोट्याशा निबंधांत आणल्या आहेत, त्यांचा जर शिक्षकवर्ग उपयोग करील, तर भावी प्रजेवर त्यांचे अनंत उपकार होणार आहेत.

---

# सरकारी खर्चाचें स्वरूप

प्रत्येक मनुष्याचा संसार हा एक त्याचा लहानसा राज्यकारभारच आहे. संसारामध्ये प्रत्येक मनुष्याला आपला आदा पाहून खर्च करावा लागतो. त्याप्रमाणे राज्यकारभारांतहि मुत्सद्यांस जमा पाहून त्याप्रमाणे खर्च करणें अगत्याचें असतें. संसारांत व राज्यकारभारांत अशा रीतीने साम्य आहे हें खरें, पण हें साम्य अंशतःच आहे. आणि त्याचें कारणहि उघड आहे. संसारांत मनुष्यास आपलें उत्पन्न एकदम वाढविणें शक्य नसतें. मुत्सद्याची तशी गोष्ट नाही. तो करांच्या रूपाने आपलें उत्पन्न एकदम वाढवूं शकतो. त्यामुळे संसारांत फायद्याचा वाटणारा खर्चहि न करणें उत्पन्नाच्या अभावामुळे भाग पडतें. परंतु या संसारांतील माणसाइतका संकुचित झरा सरकारी तिजोरीचा नसल्याकारणाने अमुक एक खर्चाची बाब प्रजेच्या हिताची अतएव अवश्य आहे असें एकदा ठरलें, म्हणजे सरकारास कर वाढवून तो खर्च करावा लागतो. किंबहुना खर्च करण्याकरताच 'सरकार' अस्तित्वांत आलें आहे, असें म्हटलें तरी चालेल. खर्च करण्याची जर सरकारची इच्छा नसेल तर सरकारला प्रजेकडून पैसा वसूल करण्याचाहि अधिकार पोचत नाही. तेव्हा संसारी माणसांत व राज्यकारभार हाकणाऱ्या मुत्सद्यांत फरक हा आहे की, पहिल्याला आपल्या उत्पन्नाचा अंदाज बघून खर्च करावा लागतो, तर दुसऱ्यास अगोदर खर्चाचा अदमास करून त्याप्रमाणे उत्पन्नाच्या बाबी ठरवाव्या लागतात.

आता अमुक खर्च अवश्य व अमुक अनावश्यक, असा सर्वसामान्य नियम सुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असणाऱ्या राष्ट्राला लागू करणें शक्य नाही. एका राष्ट्राला जो खर्च अवश्यक वाटतो तो दुसऱ्याला केवळ चैनीचा भासतो. तथापि या बाबतींत

कांही नियम बांधतां आल्यास पाहावें, या हेतूने खालील विवेचन केलें आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या सरकारचें मुख्य व आद्य कर्तव्य प्रजेचें संरक्षण करणें हें होय. सरकारच्या या सांरक्षणिक कर्तव्याची पूर्वींची कल्पना फार मर्यादित होती. सद्यःकाळीं ती बरीच विस्तृत झाली आहे. परचक्रापासून प्रजेचें संरक्षण करणें एवढेंच सरकारचें कर्तव्य प्रथमतः समजलें जात असे. नंतर जीव, मालमत्ता, अब्रू इत्यादिकांचें व मनुष्याचे जे कांही नैसर्गिक आणि कायद्याने प्राप्त झालेले हक्क असतील, त्यांचें संरक्षण करणें सरकारच्या कर्तव्यांत येऊं लागलें. सांप्रत तर शारीरिक आणि सामाजिक आपत्तींपासून सुद्धा प्रजेचें संरक्षण करणें ह्याचा सरकारच्या सांरक्षणिक कर्तव्यांत अंतर्भाव होऊं लागला आहे.

(१) लष्कर :—

परचक्रापासून लोकांचें संरक्षण करणें हें सरकारचें पहिलें कर्तव्य आहे, म्हणून वर सांगितलेंच आहे. प्राचीन काळीं सरकारचा सर्व वसूल याच बाबतींत खर्च होत असे. लढाईचा प्रसंग केव्हा येईल याचा नियम नसल्यामुळे नेहमीच सैन्य व आरमार जय्यत ठेवावें लागे. सुधारणेबरोबर हा खर्च कमी होईल असें वाटत होतें. पण हल्ली सर्व युरोपियन राष्ट्रांत हा खर्च वाढविण्याची जी चढाओढ चालू आहे ती पाहतां या बाबतींत बरीच निराशा होण्यास जागा आहे. सुधारणेबरोबरच रानटीपणाचें सहचारित्व विलक्षण दिसतें. तथापि राष्ट्राराष्ट्रांतील तंट्यांचा पंचायतीमार्फत निकाल लावून घेण्याच्या प्रयत्नांस जसजसें जास्त यश येईल त्या त्या मानाने लष्करी बजेटांचे दिवस कमी झाल्यावांचून राहणार नाहीत. पूर्वीइतक्या लढाया हल्ली होत नाहीत, व ज्या होतात त्यांत प्राणहानीचें मान पूर्वींहून फार कमी असतें. म्हणून लष्करी खर्च जरी सांप्रत वाढत आहे तरी मनुष्यहानि कमी होत असल्यामुळे तो फायदाच

आहे असें म्हणण्यास हरकत नाही. सर्वच राष्ट्रें लष्करी खर्च वाढवीत असल्यामुळे युद्धाचे प्रसंग कमी येतात व प्राणहानि कमी होते. युद्धामध्ये लोक मरतात त्या मानाने देशाची उत्पादनशक्ति कमी होते; व ज्या मानानें ही प्राणहानि टळेल त्या मानाने उत्पादनशक्ति वाढेल, हा सिद्धांत खरा असल्यामुळे हल्लीच्या वाढत्या लष्करी खर्चाने सुद्धा विशेष नुकसान होत नाही. कारण हल्ली जो खर्च होतो तो सैन्य वाढविण्याकडे इतका होत नाही, तर शस्त्रास्त्रें व युद्धाचीं दुसरीं साधनें यांत सुधारणा करण्याकडे होत असतो. त्यामुळे मनुष्यबल वाया जात नाही. एकंदरींत उत्तरोत्तर लष्करी खर्चाची बाब कमी महत्त्वाची होईल असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाही.

**(२) पोलिस आणि न्यायखातें :—**

परराष्ट्रापासून प्रजेचें रक्षण करणें हें जसें सरकारचें कर्तव्य आहे तसेंच राष्ट्रांतील एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीचें संरक्षण करण्याची जबाबदारीहि सरकारावर आहे. लोकांच्या जीविताचें, मालमत्तेचें व अब्रूचें संरक्षण सरकारने केलें पाहिजे, ही कल्पना परराष्ट्रापासून संरक्षण करण्याच्या कल्पनेशीं समकालीन नसली तरी बरीच जुनी आहे. "परस्परं च खादन्ति" "प्रीयते हि हरन्पापः परवित्तम्" अशा रीतीने महाभारतांत वर्णन केलेली अराजक स्थिति विद्यमान स्थितीशीं ताडून पाहिली असतां, पृथ्वीवरील बहुतेक राष्ट्रांत न्याय व पोलिस खात्यांची सुधारणा बरीच झाली आहे असें म्हणावें लागतें. तथापि त्या मानाने खर्च मात्र सरकारास फार करावा लागत नाही. याचीं दोन कारणें आहेत. प्रथमतः सरकारला ह्या बाबतींत व्यक्तिशः निरनिराळा खर्च करावा लागत नाही; एकंदर समाज सुरक्षितावस्थेंत ठेवला म्हणजे चालतें. दुसरें असें की, समाजाची सुधारणा जसजशी होत जाते तसतसें व्यक्तिगत जुन्या हक्कांचें पुनरुज्जीवन व नवीन हक्कांचें प्रस्थापन होत असून ते हक्क कबूल करण्यास एकं-

दर समाज तयार असतो; मनुष्याचे विचार उदात्त होतात व ते त्याच्या आचारांचे प्रवर्तक बनतात; म्हणून लोकांच्या हक्कांचें संरक्षण करण्याची अवश्यकता कमी होते. ज्या समाजांत शिक्षण नाही व नैतिक कल्पना उद्भूत झाल्या नाहीत, त्या समाजांत पोलिस व न्यायखात्यांचा खर्च सरकारास फार करावा लागतो; तेव्हा शिक्षणाचा प्रसार केल्यास हा खर्च कमी झालाच पाहिजे. निरुद्योगी व अशिक्षित लोक समाजांत अधिक असतील तर पोलिसचें व कोर्टांचें काम फार वाढतें व त्यामुळे खर्चहि अधिक होतो. लोकसंख्येच्या मानाने पाहतां ज्या देशांत ह्या कामीं फाजील खर्च होत असेल तेथील कारभार लांचलुचपतीचा असला पाहिजे; अगर ज्या कायद्यांची अंमलबजावणी पोलिसांकडून आणि कोर्टांकडून व्हावयाची असते ते कायदे न्यायाचे नाहीत असा लोकांचा समज असला पाहिजे. कारण कायदे न्याय्य नसतील तर मोडण्यास लोकांस हरकत वाटत नाही.

### (३) आरोग्य व नीति :—

जीव व मालमत्ता यांचें संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारावर आहे. त्याचप्रमाणे सामाजिक अनिष्ट गोष्टींची बाधा प्रजेला होणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे. हें कर्तव्य सरकारास नानाविध प्रकारांनी बजवावें लागतें. हें कर्तव्य सरकारावर अर्वाचीन काळींच लादल्यामुळे अलीकडील बजेटांत मात्र तें प्रतिबिंबित झालेलें दिसतें. तुरुंगाची व्यवस्था या सदराखाली येते. अपराध केलेल्या कैद्याला तुरुंगांत टाकण्याचा उद्देश, त्याने गुन्हा केला म्हणून त्यास शिक्षा होणें न्याय्य आहे, असा कोणी हल्ली समजत नाहीत. समाजाचें अशा लोकांपासून संरक्षण व्हावें म्हणूनच त्यांस अटकेंत ठेवण्यांत येतें. व गुन्हे करण्याची त्यांची प्रवृत्ति नष्ट होऊन तुरुंगांतून सुटल्यावर समाजांत येऊन त्यांनी उद्योगप्रवीण व स्वाभिमानी व्हावें

अशा धोरणाने तुरुंगांत कैद्यांना वागवावयाचें असतें. कैद्यांना सार्वजनिक रस्त्यावर खडी फोडण्यास लावणें अथवा अशाच प्रकारचें खडतर काम करण्याकरता त्यांस पैसे घेऊन दुसऱ्याच्या कामावर पाठविणें हे रानटी प्रकार सांप्रतहि अस्तित्वांत आहेत, नाहीं असें नाही. तथापि हे कमी खर्चाचे पण अशास्त्रोक्त प्रकार लवकरच बंद झाल्याशिवाय राहणार नाहींत. वर सांगितलेलें धोरण पुढे ठेवून कैद्यांना वागवणें म्हणजे खर्च फार येतो हें खरें. कारण कैद्यांस तुरुंगांत लिहिण्यावाचण्यास शिकवून निरनिराळ्या उद्योगधंद्यांचें शिक्षण द्यावें लागतें. या नवीन धोरणाची छाप हल्लीं तुरुंगांतील अंतर्व्यवस्थेवर तर पडली आहेच, पण तुरुंगांच्या इमारतीच्या रचनेवरहि पडली आहे. तुरुंगाची जागा सन्मनोवृत्तीची पोषक पाहिजे, ही कल्पना आता दृढमूल झाली आहे. या कामासाठी प्रथमतः जरी पुष्कळ खर्च करावा लागला तरी तो हळूहळू कमी होत जातो. कारण मनावर चांगले संस्कार होऊन बाहेर पडलेले हे लोक पुन्हा गुन्हा करीत नाहींत व उलट कांहीं तरी उद्योगधंदा करून आपलें पोट भरतात. अर्थात् त्या मानाने देशाची उत्पादक शक्ति वाढत जाते.

तसेंच साथीचे रोग उत्पन्न होणार नाहींत व झाले असतां त्यांचा प्रसार होणार नाहीं यासाठी सुद्धा सरकारास उपाय योजावे लागतात. समाजांत स्वच्छता राखून आरोग्यशास्त्राची सर्वांस माहिती व्हावी म्हणून प्रयत्न करणें सरकारचें कर्तव्य असून तें या स्वांरक्षणिक कर्तव्यांत मोडतें. मुंबई सरकारने इंप्रूव्हमेंट ट्रस्टची योजना, प्लेग व इतर रोग नाहीसे करण्याच्या उद्देशानेच केली आहे. हा खर्च प्रथमतः फार वाटतो खरा, पण पुढे जो खर्च वाचेल तो हिशेबांत घेतां अखेरीस हें कृत्य आंतबट्ट्याचें वाटणार नाहीं. याच सदराखालीं गरीबांच्या पोटाची सोय, वयातीतांस पेनशन् , सार्वजनिक धर्मकृत्यांची व्यवस्था, इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होतो. दारिद्र्य हाहि एक प्रकारचा सामाजिक रोगच म्हटला पाहिजे. कारण त्यापासून गुन्हे वाढ-

तात, दुर्व्यसनें जडतात, शारीरिक ऱ्हास होतो व साथींची गर्दी होते. म्हणून दारिद्र्य नाहीसें अगर कमी करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. तें केल्याने व्यक्तीचें संरक्षण होतें व एकंदर समाजाचा ऱ्हास होत नाही. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या सुधारणेबरोबर हा खर्च कमी होईल अगर वाढेल हा प्रश्न आहे; पण तुरुंगांतील कैद्यांच्या संबंधी वर जें विवेचन केलें आहे त्यावरून पाहतां हा खर्च उत्तरोत्तर कमी होत जाईल असेंच उत्तर द्यावें लागेल. सामाजिक कर्तव्यें योग्य रीतीने बजावण्याची तत्परता समाजांत जसजशी अधिक आढळून येईल, तसेंच समाजाची नैतिक व शारीरिक उन्नति जसजशी अधिक होईल, तसतसें संरक्षणाकरता सरकारकडे बघण्याचे प्रसंग कमी येतील व त्यामुळे सरकारला खर्चहि कमी करावा लागेल.

**व्यापारी स्वरूपाचीं कामें:–**

प्रजेपैकी प्रत्येकाच्या उपयोगार्थ सरकारास कांही कामें करावीं लागतात. हीं कामें करतांना सरकारचा प्रजेशीं व्यापारी अगर अर्धवट व्यापारी संबंध येतो. अशा प्रकारच्या कर्तव्यांत व पूर्वी सांगितलेल्या सांरक्षणिक कर्तव्यांत मोठा फरक हा आहे की, सांरक्षणिक कर्तव्यें बजावतांना सरकारास जुलुमी ( Coercion ) अधिकाराचा उपयोग करावा लागतो. संरक्षणाच्या बाबतींत सरकारी अधिकाऱ्यांचें ठरीब वर्तन असावें लागतें, व लोकांनाहि त्याबरहुकूम वागणें भाग पडतें; लोकांच्या इच्छेवर कांहीच राहत नाही. मी पोलिसाचा खर्च देत नाहीं, मला तुमचें पोलिस नको, असें व्यक्तिशः कोणालाहि म्हणतां यावयाचें नाही. अशा रीतीने व्यक्तीचें म्हणणें जर सरकार ऐकूं लागेल तर देशांत शांतता कधीच राहवयाची नाही, व सरकारचें आयुष्यहि अस्तंगत होण्याचा प्रसंग येईल. म्हणून सांरक्षणिक कर्तव्यें बजावण्याचा प्रधान हेतु सरकारचें अस्तित्व कायम राखण्याचा असतो; पण उदमी कर्तव्यें करतांना मुख्य धोरण नाग-

रिकांची सोय पाहण्याकडे असतें; एकंदर समाजाच्या हिताहितापेक्षा व्यक्तीचें हिताहित या कर्तव्यांत सरकार मुख्यत्वाने पाहतें.

आता हीं व्यापारी तऱ्हेचीं कामें सरकार आपल्या अंगावर घेऊन करतें, त्यांत दोन हेतु असणें शक्य आहे:— एक तिजोरी वाढविणें आणि दुसरें लोकांची सोय करणें. हे दोन उद्देश परस्पर-विघातक असलेच पाहिजेत असें नाही. परंतु जसा उद्देश असेल त्या मानाने केलेल्या कामाचा मोबदला ठरविला जातो. जीं कामें सरकार केवळ लोकांच्या हिताकरिता पतकरतें तीं समाजांतील एखाद्या विवक्षित वर्गाच्या अथवा देशांतील विशिष्ट ठिकाणच्या लोकांच्या मात्र उपयोगाचीं असतां कामा नये. सर्वांस ज्यांची सारखीच गरज भासते अशीं तीं कामें पाहिजेत.

लोकांच्या उपयोगार्थ सरकारने अंगीकारलेल्या कामांचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. त्यांत पोष्टखातें हें प्रमुख आहे. सर्व सुधारलेल्या देशांत पोष्टाचें काम सरकार आपण करतें. याहून अंशतः भिन्न अशीं कामें माणसांची व मालाची नेआण करणें व तारा पोंचवणें हीं होत. तसेंच कधी कधी सरकार मजूर लोकांकरिता सेव्हिंग बँक काढतें, विमा कंपनीचा किंवा असाच दुसरा धंदा करतें. ह्या कृत्यांचा समावेश सरकारच्या अवश्य कर्तव्यांत होईल कीं नाही याची शंका आहे. कारण अशा कोणत्याहि कृत्याने सर्व लोकांचा फायदा होत नाही. हीं कामें एका विशिष्ट वर्गाकरताच सरकारने पतकरलेलीं असतात व प्रजेपैकी कांही लोकांनाच त्यांपासून फायदा करून घेतां येतो. असे धंदे सुरू करणें हें सरकारचें कर्तव्य मानतां येणार नाही, असा कित्येकांचा कोटिक्रम आहे, पण तो बरोबर दिसत नाही. समाजांत जे गरजू लोक असतात, बुद्धीने, शरीराने अथवा परिस्थितीने जे स्वतःच्या पायांवर उभे राहण्यास असमर्थ आहेत, त्यांच्याकरताच सरकारचें अस्तित्व आहे, समर्थांकरता नाही. शिवाय समाजांतील एका वर्गाला साहाय्य

करून त्यांना उन्नत स्थितीस आणण्याने एकंदर समाजाचाहि फायदा होतोच. तेव्हा सरकारच्या कर्तव्यांपैकी हें एक आहे, यांत संशय नाही. परंतु या बाबतींत कितीहि मतभेद असला तरी असलीं कामें सरकारच्या उदमी कर्तव्यांत मोडतात याविषयी वाद नाही. सरकारच्या या व्यापारी तऱ्हेच्या कर्तव्यांचें मुख्य स्वरूप असें आहे की, सरकार अशीं कर्तव्यें बजावतांना लोकांचें व्यक्तिशः प्रत्यक्ष काम करतें, व जो कोणी या कामगिरीचा उपयोग करून घेईल त्यास अंशतः अगर सर्वांशीं त्याचा मोबदला देतां येतो. आपणांस कोणा एकास पत्र पाठवावयाचें असेल तर सरकारास एक दिडकी दिली की तें आपलें पत्र त्या इसमास पोंचवतें; आगगाडीचें भाडें भरलें की आपणांस पाहिजे तेथे नेऊन पोंचवतें. या कर्तव्यांचें हें जें विशिष्ट स्वरूप आहे त्यावरून अशा कर्तव्यांत, लोकांनी आपआपसांत केलेल्या करारांचे दाखले ठेवणें, सडका करणें, वगैरे कृत्यांचा समावेश होतो. एकंदर समाजाचा ह्याने जरी फायदा होत असला तरी व्यक्तिशः फायदा होत असल्यामुळे याच व्यापारी वर्गांत हीं कर्तव्यें मोडलीं पाहिजेत. कारण करार नोंदावयास येतो त्यापासून अगर सडकेचा उपयोग करूं इच्छिणारापासून सरकारास फी घेतां येते.

त्याचप्रमाणे ज्या देशांत सरकार निव्वळ वसूल वाढविण्याच्या उद्देशाने आपण होऊन जंगलें राखतें व त्यांतील माल विकतें, पाटबंधारे बांधून लोकांस पैसे घेऊन पाणी देतें आणि खाणी खणून खनिज पदार्थांची विक्री करतें, त्या देशांतहि सरकारचीं हीं व्यापारीं कर्तव्यें मानलीं जातात. परंतु एखाद्या देशांत सरकारी जंगल नसतें, लोक आपआपल्या मालकीच्या जागेंतील झाडें तोडून टाकतात व नवीन लावीत नाहीत. अशा प्रसंगीं सरकारला जंगल राखण्याचें काम अंगावर घ्यावें लागतें. ह्यावेळीं सरकारचा हेतु जमाबंदी वाढविण्याचा नसून जंगलापासूनहोणारे फायदे

सर्व समाजास मिळावे हा असतो; म्हणून त्या देशांत अशा कर्तव्यांचा समावेश पुढे सांगण्यांत येणाऱ्या सरकारच्या अभिवृद्धिकर्तव्यांत केला जातो. हें वर्गीकरण, जो उद्देश मनांत धरून सदरहु कामें केलीं जातात, त्यावर अवलंबून आहे हें उघड आहे.

एथपर्यंत केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल की, सरकारच्या उदमी कर्तव्याचे तीन प्रकार मानतां येतील. केलेल्या कामगिरीबद्दल पुरा मोबदला घेणें हा पहिला प्रकार; सर्व मोबदला न घेतां फक्त कांही प्रत्यक्ष घेणें ( बाकी करांच्या रूपाने वसूल करणें ) हा दुसरा प्रकार; नफ्यातोट्याचा विचार मनांत न आणतां केवळ देशाच्या एकंदर अभिवृद्ध्यर्थ सरकार एखादा धंदा आपण स्वतः करतें व अशा धंद्यांत उत्पन्न होणारे पदार्थ बाजारभावाप्रमाणे विकतें, हा तिसरा प्रकार. या खर्चाच्या तीन बाबींपैकी कोणत्या बाबींत खर्च वाढण्याचा अगर कमी होण्याचा संभव आहे ह्याचा आपण आता विचार करूं.

निव्वळ व्यापारी तत्त्वांवर जे धंदे सरकार उभारतें त्या धंद्यांमुळे राष्ट्राच्या एकंदर उत्पन्नामध्ये कमजास्तपणा होण्याचा संभव नसतो; व सरकारला राज्यकारभाराकरता जो खर्च करावा लागतो तोहि अबाधितच राहतो. कारण या धंद्यांत जितका खर्च होतो तितकें उत्पन्नहि होतें; म्हणून अशा प्रकारचे कितीहि धंदे सरकारने पतकरले तरी त्याचा राष्ट्रीय उत्पन्न अगर खर्च यांवर कांही एक परिणाम होत नाही. परंतु हे धंदे उभारतांना सरकारला कांही गोष्टींचा विचार अवश्य केला पाहिजे. उदा०:— ज्याची मागणी नाही असा धंदा सरकारने सुरू केला तर निष्कारण खर्च होतो व अशा कामीं अडकलेलें भांडवल दुसऱ्या जरुरीच्या धंद्यांत घालून जो फायदा झाला असता त्या फायद्याला सरकार— अर्थात् समाज मुकतो. समजा, हिंदुस्थानांतल्या लोकांस दारूची गरज नाही.

असें असून जर सरकार दारूचे कारखाने काढण्यांत पैसे खर्च करील तर दारूचा खप नसल्यामुळे सरकारास ह्या धंद्यापासून व्हावें तसें उत्पन्न होणार नाही; भांडवल व्यर्थ अडकून राहील. कदाचित् लोकांना दारूची सवय लागून ती खपूं लागली तरी लोकांचे पैसे, शरीराची, बुद्धीची व काळाची हानि करण्यांत जात असल्यामुळे राष्ट्राची उत्पादक शक्ति त्या मानाने कमी होईल. अर्थातच राष्ट्राचें उत्पन्नहि कमी होईल. सारांश, लोकांची नीतिमत्ता व उद्योग यांची वाढ होईल इकडे सरकारचें लक्ष पाहिजेच. शिवाय जो धंदा सरकार आपल्या शिरावर घेईल, त्या धंद्याची अवश्यकता लोकांस असली पाहिजे. पुष्कळ धंदे चांगले असतात, पण लोकांची राहणीच खालच्या पायरीवर आली असेल तर त्या धंद्यांचा कांही उपयोग नाही. ज्या प्रांताच्या लोकांना पोटभर खाण्यासहि मिळत नाही अशा प्रांतांत सरकारने आगगाडी सुरू केली तर तिचा काय उपयोग ? गाडींत बसणार कोण ? लोकांना पायींच जाणें भाग आहे. ज्या प्रांतांतील लोकांस पोटभर खाण्यास मिळतें, पण याहून अधिक पैसे त्यांच्याजवळ नाहीत, अशा प्रांतांत सरकारने आगगाडी सुरू केल्यास त्याचा परिणाम काय होईल पहा. मनुष्यमात्रास सुखाची लालसा स्वाभाविकच असल्यामुळे लोक थोडें कमी खातील. पण पायीं चालत न जातां पैसे देऊन आगगाडीचा उपयोग करतील; परंतु तेणेंकरून त्यांच्या शक्तीचा ऱ्हास होईल व तद्द्वारा राष्ट्राची उत्पादक शक्ति कमी होईल. तेव्हा अशा धंद्याने सरकार सामाजिक उत्पन्न कमी करील. तात्पर्य, धंदा सुरू करण्याचें ठरवितांना लोकांची राहणी सरकारने विचारांत घेतली पाहिजे.

त्याचप्रमाणे जो धंदा सरकार हातीं घेणार तो उत्तम प्रकाराने चालविण्याचें सामर्थ्य लोकांइतकें सरकारांत असलें पाहिजे; कमी असल्यास लोक जितक्या पैशांत तो धंदा चालवूं शकतात त्याहून

अधिक पैसे सरकारचे खर्च होतील. अर्थात् लोकांच्या पैशांचा अपव्यय होऊन सरकारी उत्पन्न व खर्च ह्यांत फेरफार होईल.

याप्रमाणे वर सांगितलेल्या अपवादात्मक गोष्टी बाजूस ठेवल्यावर मूळ सिद्धांत खरा मानण्यास हरकत नाही; तेव्हा निव्वळ व्यापारी तत्त्वांवर उभारलेल्या धंद्यांचें महत्त्व सरकारी खर्चाची मीमांसा करतांना फारसें उरत नाही. समाजाचे पैसे सरकारमार्फत किंवा लोकांमार्फत खर्च व्हावे इतकाच यांत प्रश्न असतो. तथापि निरनिराळ्या देशांतील बजेटांवरून असें दिसतें की, अशा प्रकारचीं कामें उत्तरोत्तर जास्त प्रमाणाने राज्यचालक आपल्या अंगावर घेत आहेत. समाजसत्तावाद्यांच्या मतांचा जसजसा फैलाव होईल तसतशी ही प्रवृत्ति कायम राहील असें मानण्यास प्रत्यवाय नाही.

आता जेथे लोकांच्या उपयोगी पडण्याबद्दल सरकार फीच्या रूपाने अर्धवट मोबदला घेतें त्यासंबंधाने मात्र अधिक निश्चयात्मक रीतीने सांगतां येईल. या प्रकारचीं सरकारचीं कामें सारखीं वाढत जातील. लोकांचे व्यवहार नित्य वाढत आहेतच, पण शिवाय त्या व्यवहारांना नानाविधता व उत्कटता प्राप्त होत आहे. हे व्यवहार निश्चित होण्यास लोकांस सरकारची मदत नेहमी लागणार. लोकांच्या व्यवहारांची नोंद ठेवणें, सर्टिफिकिटें देणें, लोकांना आपले व्यवहार शाबीत करण्यास मदत करणें, इत्यादि प्रकारचीं कामें सरकारचीं हम्मेश वाढत आहेत; व समाजाच्या उत्क्रमणाबरोबर ही वाढ कायम राहील. समाज अपक्रान्त झाल्याशिवाय असलीं कामें कमी होणार नाहीत.

राष्ट्राच्या अभ्युदयार्थ जंगल राखणें, खाणी खणणें, पाटबंधारे बांधणें इत्यादि कामें सरकारास करावीं लागतात; व असें करतांना होईल तितकें उत्पन्न सरकार करीतच असतें. जंगल राखतांना त्यांतील झाडांची तोड करून लांकूड विकणें सरकारास भाग आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना पाणी देऊन पाटबंधाऱ्यांच्या खात्यांत

कांही उत्पन्न दाखवितें. असल्या सरकारी कामांना मर्यादा आहे.

## आभ्युदयिक कर्तव्यें

सरकारी कर्तव्यांचें जें आपण वर्गीकरण केलें त्या तिसऱ्या वर्गांत सरकारच्या अभ्युदयात्मक कर्तव्यांचा समावेश होतो. राष्ट्र या नात्याने आपली अभ्युन्नति व्हावी ही जी प्रत्येक राष्ट्राची उत्कट इच्छा त्या इच्छेमुळे सरकारचीं हीं कर्तव्यें उत्पन्न होतात. त्याकरिता व्यक्तिमात्राची हाव जरी अवश्य असली तरी तिने कार्य भागत नाही. म्हणून एकंदर समाजाची उन्नति होण्याकरिता समाजाने निश्चित पण व्यवस्थित रीतीने कांही गोष्टी करणें अवश्य आहे. कारण अर्वाचीन शास्त्राचा असा सिद्धांत आहे की, ज्या परिस्थितींत मनुष्यें राहतात ती परिस्थिति पुष्कळ अंशाने पालटून टाकण्याचें सामर्थ्य समाजाचें व्यक्तस्वरूप जें सरकार त्या सरकारांत आहे; म्हणून त्या साधनांनी वर्तमान स्थिति व्यक्तींच्या अभिवृद्ध्यर्थ बदलतां येईल अशा साधनांचा अंगीकार करणें सरकारचें कर्तव्य आहे. याप्रमाणे कायदे करणारे व ते बजावणारे यांच्या हातांत समाजाला विशिष्ट वळण देण्याचें सामर्थ्य आहे. तात्पर्य, समाज म्हणजे एक घटना आहे, व व्यक्तींप्रमाणेच आपल्या उन्नत्यर्थ आपली परिस्थिति हवी तशी करतां येणें समाजास शक्य आहे.

सरकारचें प्रत्येक कर्तव्य समाजाच्या व व्यक्तीच्या अभिवृद्ध्यर्थच असतें, तेव्हा कांही कर्तव्यें अभिवृद्धिकारक म्हणून निराळीं समजणें बरोबर नाही असें कोणी म्हणेल. आणि एका अर्थी हें म्हणणें बरोबर आहे. सरकार लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करतें. तेव्हा सर्वत्र शांतता नांदत असल्यामुळे लोकांना उद्योगधंदे करण्यास अनुकूल स्थिति मिळते व त्यामुळे एकंदर समाजाची अभिवृद्धि होते. परंतु सरकारच्या संरक्षणकर्तव्यांचा रोख मुख्यतः समाजांतील अनिष्टें दूर करण्याकडे असतो. ज्या मानाने लोकांच्या

वामगामी प्रवृत्ति दबतील त्या मानाने हीं कर्तव्यें यशस्वी होतात. परंतु अभिवृद्धिकारक कर्तव्यांची तशी गोष्ट नाही. समाजांत जें कांही उपयुक्त असतें, मनुष्यस्वभावांत जें चांगलें असतें, तें ओळखून सरकार आपल्या कर्तव्यांची दिशा ठरवीत असतें. हीं कर्तव्यें यशोदायी होण्यास समाजांतील उपयुक्तता व चांगलेपणा वाढावा लागतो. एकंदर समाजाची अभिवृद्धि होण्यास दोन्ही प्रकारचीं कर्तव्यें सारखींच अवश्य आहेत. परंतु एकाचें स्वरूप दडपशाहीचें असतें व दुसऱ्याचें उत्कर्षकारक असतें व हा या दोन कर्तव्यांतील मुख्य फरक आहे. व सरकारी खर्च ज्या तत्त्वांवर होत असतो त्यांचा विचार करतांना या भेदाचें फार महत्त्व दिसून येतें.

या अभिवृद्धिकारक सरकारी कर्तव्यांचा परिणाम सरकारी तिजोरीवर कसा कसा होत असतो हें पाहण्याकरिता या कर्तव्यांत कशाचा समावेश होतो हें पाहिलें पाहिजे. साधारणपणें या सरकारी कर्तव्यांत पांच बाबींचा समावेश केलेला आढळतो. त्या बाबी येणेंप्रमाणे:—

( १ ) लोकशिक्षण; ( २ ) लोकरंजन; ( ३ ) खासगी उद्योगधंदे योग्य व न्याय्य रीतीने चालवितां येतील अशी कायदेशीर परिस्थिति निर्माण करणें व राखणें; ( ४ ) आपल्या स्वतःच्या प्रगतीबद्दल समाजाला ज्ञान व्हावें, त्याचप्रमाणे लोकसत्ताक राज्यपद्धतीचीं मूलतत्त्वें अबाधित आहेत हें जाणण्यास अवश्य ती माहिती लोकांस व राज्यकारभार चालविणारांस मिळावी, अशा हेतूने निरनिराळ्या लोकहिताच्या बाबींसंबंधाने अवश्य ती माहिती संकलित करणें; ( ५ ) व्यक्तिशः अगर संघशक्तीने लोकांना खासगी रीतीने करतां येणार नाही तें करून राष्ट्राचें बाह्य स्वरूप सुसंपन्न करणें.

(१) शिक्षणविषयक खर्च:— सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत लोकशिक्षणाकरिता कमजास्त मानाने पण भरपूर पैशाचा विनियोग ज्या कारणांमुळे केला जातो तीं कारणें नमूद करण्याकरिता सरकारच्या शिक्षणविषयक कर्तव्याचा विस्ताराने विचार करण्याची अवश्यकता नाही. शिक्षणाच्या प्रसाराने समाजघटना दृढमूल होते, या सर्वमान्य समजामुळेच प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांत लोकशिक्षणाचा बोजा सरकारने आपल्या अंगावर घेतला आहे. सर्व सुशिक्षित राष्ट्रांचा हल्ली असा सिद्धांत झाला आहे की, व्यक्तीची संस्कृति त्याला स्वतःला जितकी महत्त्वाची आहे त्यापेक्षा ती जास्त महत्त्वाची एकंदर समाजाला असते. या सिद्धांताला अनुसरून शिक्षणाच्या बाबींत सरकारने आपलें धोरण ठेविलें पाहिजे. व्यापारी उद्योगधंद्याचें, वाङ्मयात्मक, अथवा शाळांतील कोणत्याहि तऱ्हेचें शिक्षण असो, त्यावरून वरील सिद्धांताला पुष्टिच मिळणार आहे. या प्रत्येक शाखेंतील शिक्षणाचा विचार केला तर असें दिसून येईल की, त्या त्या शिक्षणाचा व्यक्तीला जो फायदा मिळतो तो समाजांतील इतर लोकांना होणाऱ्या फायद्यांहून फारच कमी असतो. उदाहरणार्थः— एखाद्या वैद्याला त्याच्या देशांत मिळणारें शक्य तें वैद्यकीय शिक्षण मिळविल्यामुळे विपुल पैसा व मानमान्यता मिळवितां येईल. परंतु त्या शास्त्राची मर्यादा ओलांडून पलीकडे उड्डाण करण्याचें त्याला प्रयोजन नसतें; कारण त्यामुळे त्यास कोणत्याहि प्रकारचा विशेष फायदा होण्याचा संभव नाही. तथापि एकंदर समाजाची गोष्ट मात्र निराळी असते. त्या शास्त्रांत जितकी जास्त प्रगति होईल तितकी समाजाला जास्त हितावह असते. औषध ज्यांना द्यावयाचें असतें त्यांच्यापेक्षा ज्यांना औषध घ्यावयाचें असतें त्यांच्या ठिकाणींच वैद्यशास्त्र पूर्णावस्थेला पोंचावें अशी प्रबळ इच्छा असते. वैद्यशास्त्राप्रमाणेच इतर शास्त्रांचीहि गोष्ट आहे. तात्पर्य, शिक्षण हें व्यक्तीपेक्षा समाजाला अधिक हितावह आहे या दृष्टीने त्याचा विचार केल्यावांचून,

शिक्षणविषयक कोणत्याहि बाबीचा चांगला उलगडा होणार नाही. शिक्षण सार्वजनिक हिताचें आहे इतक्यामुळे त्याचा बोजा सर्वस्वी सरकारावर पडणें अवश्य आहे असें कदाचित् कोणाला वाटणार नाही. ज्याला शिक्षण मिळतें त्याने त्या शिक्षणाचा खर्च कां सोसूं नये, अगर लोकांच्या देणग्यांनी शिक्षणखर्च कां चालवूं नये, असे प्रश्न कदाचित् विचारण्यांत येतील म्हणून त्यांचीं उत्तरें देणें जरूर आहे.

शिक्षणाची भिस्त लोकांवर न टाकण्याचें हें एक कारण आहे की, कोणत्याहि शास्त्रांत अगर विद्येंत वाकबगार असलेल्या माणसांस त्यांच्या योग्यतेनुरूप पगार देण्याची इच्छा अगर ताकद लोकांत नसल्यामुळे वाकबगार माणसें निपजणें कठीण पडतें. अशा माणसांची खरी योग्यता समजण्यास अनुभव तरी लागतो, किंवा कल्पनाशक्ति तरी तीव्र असावी लागते. आता एकंदर लोकसमूहाला वर सांगितलेल्या अत्यंत बुद्धिमान् माणसांच्या बुद्धिमत्तेचा अनुभव असणें संभवनीय नाही. कारण अशीं माणसें नेहमीच थोडीं असणार; बरें कल्पनाशक्ति तीव्र असावी तर तेंहि शक्य नाही. कारण कल्पनाशक्ति स्वयंभू नसते; अनुकरणशीलतेनेच ती उद्बोधित होते. विशेषतः सामान्य लोकसमूहासंबंधाने तरी ही गोष्ट निर्विवाद खरी आहे. तेव्हा पैसे मिळविण्याच्या हेतूने जो शिक्षणसंस्था काढणार तो पुष्कळ पैसे खर्च करून निरनिराळ्या विद्येंतील निष्णात माणसांचा उपयोग करून घेईल असें नाही. तेव्हा कोणत्याहि शाळेंतील पूर्ण शिक्षण लोकांना सरसहा उपलब्ध करून देण्याकरिता तज्ज्ञ लोकांच्या मताने सर्व प्रकारच्या शिक्षणविषयक बाबींत मुख्य चालकत्व सरकारने पतकरलें पाहिजे.

ज्या राष्ट्राने प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें ध्येय आपल्या डोळ्यांसमोर ठेविलें आहे, त्या राष्ट्राला तर शिक्षणाची भिस्त लोकांवर टाकणें कधीच समंजसपणाचें होणार नाही. कारण शिक्षणसंस्थांना

देणग्या देणारे लोक श्रीमंतच असणार; व देणग्यांच्या रूपाने शिक्षणसंस्था श्रीमंतांच्या हातांत गेल्यास संस्थांत दिलें जाणारें शिक्षण श्रीमंत लोकांच्या धोरणाप्रमाणे चालल्याशिवाय राहणार नाही. आता श्रीमंत लोक तर कोणत्याहि देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धतीला प्रतिकूल असतात. म्हणून अशा देशांत सामान्य जनसमूहाच्या वतीने शिक्षणाचा लगाम सरकाराने आपल्या हातींच ठेवणें अवश्य आहे. यावरून असें दिसून येईल की, प्रत्येक सुधारलेल्या देशांतील बजेटांत शिक्षणविषयक खर्च वाढत चाललेला आढळून येईल.

(२) **लोकरंजनः**— सामान्यतः लोक ज्याला मनोरंजन म्हणतात तें कांही अंशीं बौद्धिक असतें व कांही अंशीं मनाला स्वास्थ्य व करमणूक मिळेल अशा प्रकारचें असतें. उदाहरणार्थः— नाटकें, पुस्तकें, पुस्तकालयें, गायन, पदार्थसंग्रहालय, चित्रकला इत्यादि विषय मनाला शिक्षण देऊन रंजवितात; आणि सार्वजनिक विश्रांतिगृहें व बागबगीचे यांच्या योगाने मनाला शांतता राहते. त्याचप्रमाणे उदात्त व भव्य वस्तूंशीं नेहमी सहवास झाल्याने मनुष्याचें अंतःकरणहि उदात्त होतें. हा एक मनोरंजक विषयांपासून होणारा फायदा गणला पाहिजे. उदाहरणार्थ, एखाद्या शहरांतील रस्ते व इमारती भव्य व प्रशस्त असतील तर त्यांचा परिणाम मनुष्याच्या मनावर होतो. कोणालाहि आयुष्य कंटाळवाणें वाटूं नये म्हणून सरकारने लोकरंजनाची व्यवस्था आपल्या हातीं घेतली पाहिजे. कारण लोकरंजनार्थ केलेल्या व्यवस्थेने व्यक्तीपेक्षा एकंदर समाजाचें कल्याण होतें; आणि एकंदर समाजाचें कल्याण ज्यांत आहे अशीं कृत्यें आपण होऊन करणें हें हल्लीच्या दिवसांत सरकारचें कर्तव्य समजलें जातें. म्हणून या बाबतींतहि खर्च वाढत्या प्रमाणावरच होणार.

**( ३ ) उद्योगधंदे न्याय्य व योग्य रीतीने चालतील अशी परिस्थिति राखण्याकरिता खर्चः**— अलीकडे २०।२५ वर्षांत अर्थशास्त्रवेत्त्यांना असा एक सिद्धांत मान्य झाला आहे की, ज्या नियमांप्रमाणे करार पुरे केले जातील व बिनसरकारी मंडळ्या स्थापल्या जातील, असे नियम करणें सरकारचें कर्तव्य आहे. ज्या वेळेस देशांतल्या देशांतच व्यापार चालत असे त्या वेळेस तशा प्रकारचे नियम करण्याची अवश्यकता नव्हती. परंतु वाफेने गाड्या चालविण्याची युक्ति निघाल्यापासून हल्ली परदेशांशीं व्यापार प्रत्येक देशाचा असून याच व्यापाराचें महत्त्व देशांतल्या देशांत होणाऱ्या व्यापारापेक्षा जास्त आहे. त्याचप्रमाणे व्यापाराचें केंद्रस्थानहि बदललें आहे. मोठमोठें भांडवल खर्च करून प्रचंड कारखाने उभारले गेल्यामुळे व्यापाऱ्यांत स्वाभाविकपणें एक प्रकारची सत्ता निर्माण झाली आहे. यामुळे सरकार व व्यापार यांची फारकत होणें संभवनीय नाही.

व्यापारासंबंधाने सरकारला दोन प्रकारचीं कामें करावीं लागतात. चढाओढीचें तत्त्व चालू ठेवण्यास हरकत नाही अशा ठिकाणीं तें कोठपर्यंत चालू ठेविलें असतां हरकत येणार नाही, अशी मर्यादा ठरविणें. याकरिता सरकारला कायदे करावे लागतात व त्या कायद्याची अम्मलबजावणी करण्याकरिता लोक ठेवावे लागतात. समाजाची बुद्धि सुसंस्कृत होऊन नीतिमत्तेच्या कल्पना सूक्ष्म होत चालल्या म्हणजे या नवीन कल्पनांना अनुसरून पुनः पुनः कायदे करणें सरकारला भाग पडतें. म्हणून निदान कांही काळ तरी बजेटांत प्रत्येक सरकारला यासंबंधाने कांही तरी रक्कम खर्ची करावी लागते.

कांही उद्योगधंदे असे आहेत की, त्यासंबंधाने चढाओढीवर भिस्त ठेवून सरकार जर स्वस्थ बसेल तर एकंदर समाजाचें नुकसान होतें असे धंदे सरकाराने स्वतः आपण होऊन चालविले पाहिजेत, किंवा त्या धंद्यांवर सरकारची देखरेख तरी पाहिजे.

उदाहरणार्थ, देशामध्ये रेलवे काढण्याचें काम सर्वस्वी लोकांवर संपविणें श्रेयस्कर आहे असा कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्राचा समज नाही. आता हे कारखाने सरकारने स्वतःच्या मालकीचे करावे, किंवा फक्त आपल्या देखरेखीखाली चालू ठेवावे, हा वादात्मक विषय आहे. अमेरिकेसारख्या कांही देशांत सरकार आपल्या खर्चाने रेलवे चालवितें. इंग्लंडसारख्या दुसऱ्या देशांत रेलवे कंपन्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणें व त्यांच्या व्यवस्थेंत हात घालणें हे हक्क सरकार बजावितें. जेथे जेथे सरकार आपल्या मालकीचे म्हणून कारखाने काढील तेथे तेथे ते कारखाने सुरळीत चालण्याकरिता अर्धवट न्यायाची कोर्टें सरकारला स्थापावीं लागतात, व त्या कामाकरिता सरकारला खर्च करावा लागतो. नवीन कल्पना व नवीन युक्त्या यांच्याबरोबर अशा प्रकारचा खर्च कमी न होतां उत्तरोत्तर वाढतच जाईल असें अनुमान करण्यास हरकत नाही.

**(४) माहिती गोळा करून ती प्रसिद्ध करण्याकरिता होणारा खर्च :—** समाजाची उत्क्रांति सरकारच्या साहाय्यावांचून होईल किंवा नाही, अगर जेथे साह्याची अवश्यकता असेल तेथे तें साह्य कोठपर्यंत ध्यावें, याबद्दल कोणाच्या कांही कल्पना असोत, उद्योगधंद्यांच्या दिशेने समाजाची उत्क्रांति होण्याकरिता सरकारने अस्तित्वांत असलेल्या धंद्यांसंबंधी भरपूर माहिती गोळा करणें, तिची जुळवाजुळव करणें व ती प्रसिद्ध करणें, हें इष्ट आहे एवढेंच नव्हे तर अवश्यहि आहे. व्यापारांत सरकारने ढवळाढवळ करू नये असें जे लोक प्रतिपादितात, व लोकांच्या मालमत्तेचें संरक्षण करणें व लोकांचे करार व व्यवहार योग्य रीतीने पाळिले जातील अशी व्यवस्था करणें इतकेंच कर्तव्य आहे असें जे लोक मानतात, त्या लोकांच्या समजाप्रमाणे देखील लोकांचें उद्योगधंद्यांत पुढे पाऊल पडावें म्हणून आपल्या देशांतील व इतर निरनिराळ्या देशांतील उद्योगधंद्यांची माहिती गोळा करून ती प्रसिद्ध करणें सरकारचें मुख्य

कर्तव्यच ठरतें. एकंदर समाजाचें हित कोणत्या रीतीने होईल याचा विचार करतांना समाजाला अवश्य असणारे उद्योगधंदे लोक काढतील व चालवतील हें मत एकांगी ठरतें. कांही धंदे असे आहेत की, सरकारने ते स्वतः सुरू केल्याशिवाय अगर सवलती देऊन आपल्या देखरेखीखाली ते लोकांकडून चालविल्याशिवाय, ते निर्माण होणेंच शक्य नाही. सरकारने स्वतः धंदे चालू केले म्हणजे त्या धंद्यांची सर्व माहिती जमविणें सरकारला आपोआपच भाग पडतें. परंतु जेथे लोकांनी चालविलेल्या धंद्यांवर सरकार फक्त देखरेख ठेवितें तेथे सुद्धा चांगली देखरेख करतां यावी म्हणून त्या धंद्यांची पुरी माहिती संकलित करणें अवश्य आहे. सारांश, कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्राच्या बजेटांत देशांतील प्रत्येक बाबीसंबंधाने ज्यावरून कोणालाहि भरपूर माहिती उपलब्ध होईल असे रिपोर्ट वारंवार प्रसिद्ध करण्याचा खर्च वाढत चाललेला दृष्टीस पडेल.

**(५) राष्ट्राचें बाह्यांग सुसंपन्न होण्याकडे लागणारा खर्चः**—सरकारचीं अभिवृद्धिकारक जीं कांही कर्तव्यें आहेत त्यांपैकीच हें कर्तव्य आहे, हें उघड आहे. खर्च केलेल्या पैशाचा मोबदला मिळणार नाही, व मिळाला तरी तो कालांतराने मिळेल, अशा सबबीवर आपल्या पैशाने जीं कामें करण्यास लोक धजत नाहीत तीं कामें आपण होऊन करणें सरकारचें कर्तव्य आहे. उदाहरणार्थ, सडका बांधणें, दीपस्तंभ उभारणें, कालवे खणणें, नदींतील गाळ काढणें, वगैरे प्रकारचीं कामें लोकांकडून होणें संभवनीय नाही. म्हणून अशा कामांप्रीत्यर्थ पैसे खर्च करणें सरकारला अवश्य आहे. लोकवस्ती वाढत जाईल, लोक श्रीमंत होत जातील व यांत्रिक कलेंत नवीन नवीन शोध लागतील, त्या मानाने प्रत्येक सरकारला या बाबतींत अधिक अधिकच खर्च करावा लागेल.

**सिद्धांतः**—येथवर केलेल्या विवेचनावरून असा सिद्धांत निघतो की, सरकारच्या संरक्षणात्मक कर्तव्यांसंबंधी होणारा खर्च हळूहळू

कमी होत जातो व अभिवृद्धिकारक कर्तव्यविषयक खर्च समाजाच्या प्रगतीबरोबर वाढत्या प्रमाणावर होत असतो. यामुळे बजेटावरून राज्यव्यवस्थेबद्दल अनुमान करणें असेल तर, एकंदर रकम राज्य-व्यवस्थेकरिता सरकार किती खर्च करतें इकडे विशेष न बघतां, बजेटांतील कोणकोणत्या खात्यांत किती किती रकमा खर्च पडल्या आहेत हें पाहणें अवश्य आहे. सारांश, प्रागतिक समाजांत लोकांच्या मालमत्तेचें संरक्षण करण्याकरिता एकदा बराच खर्च केला म्हणजे पुनः थोड्या खर्चांत एतद्विषयक कर्तव्यें सरकारला थोडक्या खर्चाने करतां येण्यासारखीं आहेत. हा नियम अर्थातच लष्करी खर्चाला लागू नाही. परंतु अभिवृद्धिकारक कर्तव्यें बजावतांना जितका खर्च करावा त्याहून जास्त खर्चाची अवश्यकता एकसारखी वाढूं लागते.

# अंदाजपत्रकें

[ ह्या लेखांतील आंकडे १९२८-१९२९ सालच्या मुंबईच्या बजेटांतील आहेत. ]

सरकारास जमाखर्चाचें अंदाजपत्रक तयार करणें जसें सुव्यवस्थित राज्यपद्धतीच्या दृष्टीनें अवश्यक तसें कुटुंबाचेंहि बजेट करणें जरूर आहे. पण आमच्या दुर्दैवानें ही दुसरी गोष्ट कोणाच्याच मनांत अद्यापि येत नाही. यामुळे कुटुंबांची जबरदस्त हानि होत आहे. बजेट म्हटलें म्हणजे सरकार व पैसा यांच्यांशीं त्याला आपण निगडित करतों. पण प्रत्येक बाबीचें बजेट करतां येईल व करतातहि. त्या क्रियेला आपण निराळे शब्द वापरतों इतकेंच. वेळेचें अंदाजपत्रक करणें म्हणजे कार्यक्रम ठरविणें. मला इतकी फुरसत आहे, आणि तिचा खर्च ( उपयोग ) मी अमुक कामीं करीन असें आपण ठरविलें म्हणजे तें काम व्यवस्थित होतें. वेळेच्या अगर काळाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे आयुष्याचें सुद्धा अंदाजपत्रक करून तदनुसार वागणें अवश्यक व हितावह आहे. माझ्याजवळ इतकी आयुर्दायरूपी व शरीरस्वास्थ्यरूपी संपत्ति आहे. तिचा मी अमुक रीतीनें व्यय करीन असें प्रत्येकाला ठरवितां येईल. हीं सर्व अंदाजपत्रकेंच होत. पण येथे आपल्याला सरकारी आयव्ययाच्या अंदाजपत्रकाचाच विचार करणें आहे.

सरकार आपलें अंदाजपत्रक दरसाल तयार करतें. या पत्रकांत पुढच्या सालचा जमाखर्च अगोदर मांडलेला असतो. अर्थात् हा ठोकळ असतो. जमाखर्चाची अवश्यकता कां उत्पन्न होते तें आपण

पाहिलें पाहिजे. मनुष्यास खर्च करणें भाग पडतें. खाण्यापिण्या-शिवाय तो जगणार नाही व वस्त्र–प्रावरणावांचून टिकणार नाही. ह्या कामीं अवश्य लागणारा खर्च भागविण्याकरता त्याला पैसा मिळ-वणें जरूर आहे. जी गोष्ट मनुष्याची तीच सरकारची. खर्च कर-ण्याकरता सरकारसंस्था निर्माण झाली आहे. म्हणून खर्च करण्या-करिता व खर्च करण्यापुरतेच पैसे सरकाराजवळ आले पाहिजेत हें उघड आहे. तात्पर्य, खर्च आहे म्हणून जमा. जमा आहे म्हणून खर्च करावयाचा असें नव्हे. पण ही गोष्ट मोठमोठे मुत्सद्दीहि विसरतात. अगोदर जमा आणि मग खर्च ही जी सध्या चालू असलेली पद्धति ती याच विस्मृतीचें निदर्शक आहे. खर्चांतहि दोन प्रकार आहेत. अवश्यक खर्चाने मनुष्य फक्त जिवंत राहील. पण नुसतें जगणें ही कांहीं इतिकर्तव्यता नाही. आपण जगावें आणि आपला आभ्युदय व्हावा ही आपली इच्छा असते. म्हणून अवश्यक व आभ्युदयिक असे दोन प्रकारचे खर्च असतात. अवश्यक खर्च किती केला पाहिजे तें एकदा ठरवून तितका तो केल्यावांचून व्यक्तीला काय किंवा सरकारला काय गत्यंतरच नाही. असा खर्च निराळा दाखविण्याची वहिवाट पडली पाहिजे. आभ्युदायिक खर्चा-मध्ये मात्र तारतम्य असतें. समाजाचा जसा अभ्युदय होत जाईल त्या मानाने त्याचा अवश्यक खर्चसुद्धा वाढता होत जातो.

खर्चाच्या प्रमाणांत कमाई केली पाहिजे हा सिद्धांत खरा असला तरी कमाईला मर्यादा आहेच. लोकांचें उत्पन्न असेल त्याच मानानें सरकारला वसूल करतां येईल. कातकरी, ठाकूर, वारली इत्यादि जंगली लोकांचा– की ज्यांना धड घर नाही, दार नाही, शेत नाही, जमीन नाही, जे अर्धपोटी राहतात– अशांचा राजा आपण एखाद्यास बनविला तर त्याला तें राज्यपद दुस्सह होईल यांत संशय नाही. लोकांना राजाच्या स्वाधीन करतांना त्याला जर आपण जमीन दिली नाही तर कोणीहि राज्यपद स्वीकारणार नाही. म्हणून

कोणत्याहि राज्यपद्धतींत प्रजेचें उत्पन्न व प्रजेची उत्पादक शक्ति यांचा नक्की अंदाज राज्यकर्त्यांनी करून ठेवला पाहिजे. असें न करतां नुसत्या मनःकल्पित जमाखर्चाचा अंदाज करणें मूर्खपणाचें आहे. पण प्रजेच्या उत्पन्नाचा अंदाज हल्लीचे सुधारलेले राज्यकर्तेंहि करीत नाहीत. राज्याचें अंदाजपत्रक तयार करणाऱ्याजवळ माणशी उत्पन्नाचा आंकडा तयार असावयास पाहिजे.

सरकारी अंदाजाच्या अभावीं खासगी रीतीनें केलेला अंदाजच घेऊं व तो घेतला असतां असें दिसतें की, हिंदुस्थानांतील लोकांचें उत्पन्न माणशीं ६० रुपयांवर पडत नाही. नुसत्या जगण्याकरता १०० रु. तरी माणशीं लागतात. अर्थात् हिंदुस्थानांतील लोक अर्धपोटी असतात. अशा अर्धपोट्यांचें राज्य कोणता सात्विक मनुष्य पतकरील ? पण राज्य धडाडीने चाललें आहे खरें. या ६० रुपयांतून सरकार किती घेतें तें पहा. हिंदुस्थान सरकार ४॥ रुपये घेतें. यंदाचें हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक प्रसिद्ध झालें आहे, त्यांत १३२ कोट वसुलाचा अंदाज केला आहे. ब्रिटिश हिंदुस्थानची लोकसंख्या ३५ कोटीहून अधिक नाही. या हिशेबाने आपण प्रत्येकीं ४॥ रुपये हिंदुस्थान सरकारास देतों असें होतें. आता चालू सालचें मुंबई सरकारचें अंदाजपत्रक पहा. तें १५ कोट रुपये वसुलाचें आहे. ब्रिटिश मुंबई इलाख्याची लोकसंख्या सुमारें दोन कोट आहे. तेव्हा आपणां प्रत्येकापासून मुंबई सरकार ७॥ रुपये घेतें असें उघड होतें. ७॥ आणि ४॥ मिळून १२ रुपये आपणांस वर्षाचा कर द्यावा लागतो. याशिवाय लोकलबोर्ड वगैरे स्थानिक संस्थांना ३ रु. जातात. एकूण १५ रु. ६० रु. उत्पन्नांतून प्रत्येक माणसास कर म्हणून देणें भाग पडतें. म्हणजे रुपयांतून चार आणे सरकार व तत्सम संस्था वसूल करतात.

सरकार लोकांना पोशीत नाही; लोक सरकारला पोसतात. आपण आपल्या गव्हर्नरला जेवून खाऊन दरमहा १०,००० रु. पगार

देतों. गव्हर्नरच्या खाण्याचा खर्च सालीना २७,००० असून गव्हर्नरच्या तैनातींतील लोकांनिमित्त होणारा खर्च ६,४७,००० रु. आहे. म्हणजे गव्हर्नरसाहेबांच्या निमित्ताने आपणांस वर्षास ७,९४,००० रु. खर्च करावे लागतात. याशिवाय गव्हर्नरच्या बंगल्यांची दुरुस्ती करावी लागते ती निराळीच.

सरकारला पैसे कां लागतात? लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करणें, लोकांच्या सुखसोयीचीं साधनें निर्माण करणें व प्रजेचा उत्कर्ष जेणेंकरून होईल असे उपाय योजणें या गोष्टी करणें सरकारचें कर्तव्य आहे. परशत्रूपासून प्रजेचें संरक्षण करण्याची जबाबदारी प्रांतिक सरकारवर नसून हिंदुस्तान सरकारवर आहे. सरकारला आपलें कर्तव्य बजावतां यावें म्हणून खर्च करावा लागतो. उदाहरणार्थ, लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें रक्षण करण्याकरता सरकारला न्याय व पोलीस खातीं निर्माण करावीं लागतात. यामध्ये तुरुंगांचा अंतर्भाव होतोच. लोकांच्या सुखसोयीकरता सडका, कालवे बांधणें, दवाखाने स्थापणें वगैरे कामें सरकारला हातीं घ्यावीं लागतात. यांत आरोग्यखात्याचा समावेश होतो. प्रजेच्या अभ्युदयाकरता शिक्षणसंस्था काढाव्या लागतात, जंगलें राखावीं लागतात. हीं कृत्यें करण्यास सरकारला नोकर ठेवून पैसा खर्च करावा लागतो. आभ्युदयिक खातीं अर्धवट व्यापारी खातीं असतात. म्हणजे त्यांवर केलेला खर्च बराचसा भरून येतो. उदाहरणार्थ, पोस्ट, तारायंत्र, जंगल हीं खातीं घ्या. शिक्षणांतसुद्धा औद्योगिक शिक्षण हें व्यापारी खातें बनविण्यासारखें असतें. पण न्याय, पोलीस आणि शिक्षण हीं खर्चाचींच खातीं होत. तसेंच एकंदर राज्यकारभार चालविण्याकरता गव्हर्नरापासून तलाठ्यापर्यंत नोकर ठेवावे लागतात. ही बाबहि सर्वस्वी खर्चाचीच आहे. राज्यकारभारावर २,२३,३३,००० रु. खर्च पडतो. अर्थात् दर माणसामागे २। रुपये सरकारास

या खात्याप्रीत्यर्थ द्यावे लागतात. पोलीस, दिवाणी व फौजदारी कोर्टें, तुरुंग मिळून २,६९,७७,००० रु. खर्ची पडतात. शेतकीसुद्धा एकंदर शिक्षणासाठी २,३८,७६,००० रु. खर्च होतात. दवाखाने, आरोग्य, सडका वगैरेकरता २,०५,२१,००० रु. खर्च केले जातात. जंगलखातें हें सरकारच्या फायद्याचेंच आहे. खर्चवेच जाऊन या खात्यापासून २८,८५,००० रु. नफा सरकारास राहतो. अर्धा कोट रुपये कालव्याप्रीत्यर्थ चालू सालीं खर्च होणार आहेत. सारांश, हा व इतर किरकोळ खर्च मिळून सुमारें ११ कोटी रुपये प्रजेकरता खर्च करावे लागतात.

ही रक्कम सरकार कशी मिळवितें? जमा व खर्च यांसंबंधाने ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की, राखीव खातीं सोडून बाकीच्या खर्चासाठी सरकार कायदेमंडळावर अवलंबून असतें. मंडळाची खर्चाला मंजुरी मिळाली पाहिजे. पण वसुलाच्या बाबतींत सरकार इतकें परतंत्र नाही. कायदे करून घेतल्यामुळे सरकारचा वसूल आपोआप होतो. शेतसारा, स्टँप, नोंदणी, अबकारी ह्या सरकारी उत्पन्नाच्या मुख्य बाबी होत. एकंदर खर्चाचा तृतीयांश नुसत्या शेतसाऱ्यापासून सरकार मिळवूं शकतें. कारण ५,३८,००,००० रु. जमीनमहसुलाचें उत्पन्न आहे. त्याच्या खालोखाल अबकारीचें उत्पन्न ३,९१,१८,००० रु. आहे. जमिनीचा सारा भरला नाही तर सरकारास जमीन खालसा करण्याचा अधिकार कायद्याने दिला आहे. तेव्हा सारा वसूल होण्यास अडचण पडत नाही. स्टँपाचें उत्पन्न १,७०,१०,००० रु. आहे. लोकांचे व्यवहार चालणारच. पण अमुक व्यवहार तुम्ही केला तर अमुक स्टँपावर तो केलाच पाहिजे असा कायदा असल्याने सरकारवसुली बिनबोभाट होते. जंगल व कालवे यांपासून सरकारला फायदा पुष्कळ होतोच. याप्रमाणे सरकारने खर्चाची तरतूद करून ठेवली आहे. कायदे मंडळाने खर्च नामंजूर केल्यास सरकारच्या हातांत पैसा शिल्लक राहील इत-

केंच. पण सरकारकडे जाणारा पैशाचा ओघ बंद होणार नाही. अधिक पैसे मिळण्याकरता नवीन बिलें सरकारने पुढे आणलीं तर, तीं कायदेमंडळास वाटल्यास नामंजूर करून पैशाचे नवीन झरे पाडण्याचें बंद करतां येईल.

लोकांच्या सुखसोयीचीं साधनें वाढतील, व्यापार धंदा भरभराटेल, लोकांना सुखाने खावयाला मिळेल, हा परिणाम ज्या अंदाजपत्रकाने होईल तें अंदाजपत्रक उत्तम. चालू सालीं आभ्युदयिक खात्यांची पिछेहाटच करण्यांत आली आहे. मग सरकार करतें काय? दरिद्री रयतेकडून पंधरा कोट रुपये घेऊन ते राज्यकारभारावर खर्च करावे लागतात. खरोखर पगाराचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. आमच्याकडे नोकरांना फाजील पगार देण्यांत येतो. नोकरी करणाराला सुखाने राहतां यावें, इतकें पगाराचें प्रमाण असावें. पण सध्या पहावें तों नोकरांच्या दोन पिढ्यांना घरीं स्वस्थ बसून चैनीने राहतां येईल इतका पगार देण्यांत येतो. कोणत्याहि ए. कौन्सिलरची किंवा दिवाणांची शिल्लक तपासा आणि काय अनुमान निघतें तें पहा. दोन हजार रुपयांपेक्षा अधिक पगार कोणालाहि राज्यांत मिळतां कामा नये. पण ह्या कल्पना बळावण्यास लोकांना वस्तुस्थितीचें ज्ञान झालें पाहिजे. महागाईमुळे पगार पुष्कळ द्यावा लागतो हें कांही खोटें नाही. इतर लोकांपेक्षा सरकारला तर ही महागाई फारच नडते. सरकार उत्पादक धंदे करीत नाही. कारखानदार सरकाराप्रमाणे मोठा नोकरवर्ग बाळगतो; पण कारखानदारांना महागाईचा फायदा मिळतो, तसा सरकारला मिळण्याचें साधन नाही. एका हाताने कारखानदारास पुष्कळ पैसा द्यावा लागला तर दुसऱ्या हातांत त्याला आपल्या मालाचा पुष्कळ पैसा येतो. म्हणून सरकारने नोकरांची संख्या व पगार आटोक्यांत ठेवला पाहिजे.

लोकांच्या उत्पादनशक्तीला मर्यादा असल्यामुळे सरकारचा करवसुलीचा हक्कहि मर्यादित होणें स्वाभाविक आहे. म्हणून प्रजेचें

उत्पन्न, त्या मानाने खर्च व त्याच प्रमाणांत जमा असा क्रम वसतो. पण जमाखर्चाची अवश्यकता कां या प्रश्नाचें उत्तर आपणांस अद्यापि द्यावयाचें आहे. जवळ असेल तें खर्च करणें किंवा खर्च पडेल तितकें मिळविणें एवढें करून मनुष्याचेंहि भागत नाही. आजार, वार्धक्य, आकस्मिक पंगुत्व यांमुळे अर्जनसामर्थ्य एकदम बंद होतें. अशा वेळीं माणसाने शिल्लक टाकलेला पैकाच त्याच्या कामीं येतो. खर्च हा मरेपर्यंत चालतोच. इतकेंच नव्हे तर मेल्यानंतरहि कांही काल खर्च करावा लागतो. पण अर्जनसामर्थ्य अखेरपर्यंत टिकत नाही. बालपणीं तें नसतें तसेंच वृद्धपणीं तें राहत नाही. बालपणीं आपणांस आपला पिता पोसतो तर आपल्या मुलांना त्यांच्या लहानपणीं आपणांस पोसावें लागतेंच. तात्पर्य, वयाच्या मध्यावस्थेंत आपण जें कांही मिळवूं त्यांतूनच वृद्धावस्थेकरता राखून ठेवणें जरूर आहे. म्हणून जमाखर्च अथवा अंदाजपत्रक करणें भाग पडतें. त्याशिवाय आपली कमाई किती, पैकी शिल्लक किती टाकली पाहिजे आणि खर्चाकरता किती ठेवलें पाहिजे हें नीट समजणार नाही. जी गोष्ट मनुष्याची तीच सरकारची. दुष्काळ, अतिवृष्टि, रोगांच्या सांथी इत्यादि आपत्तींमुळे सरकारला वसूल मिळत नाही. उलट प्रजाच संकटांत पडल्यामुळे सरकारला प्रजेकरता पाण्याप्रमाणे पैसा ओतावा लागतो. जवळ शिल्लक नसेल तर आपत्तीला तोंड देणें सरकारास अशक्य होईल. म्हणून सरकारने दर वर्षीं ठराविक प्रमाणांत शिल्लक ठेवीत गेलें पाहिजे. कायद्याने हें प्रमाण ठरविणें चांगलें. एकंदरींत शिलकेसंबंधाने कायदा असणें जरूर आहे. अशी कांही व्यवस्था आपल्या सरकारने केली आहे ही फार शहाणपणाची गोष्ट आहे. अशी व्यवस्था नसती तर गुदस्ता जलप्रलयाने अनाथ झालेल्या गुजराथेंतील लोकांस मदत करणें अशक्य झालें असतें. कायदेमंडळाने गुजराथवर आपत्ति कोसळतांच ८९,५८,००० रु. या आपत्तिनिवारणार्थ मंजूर केले. सन १९२८ च्या एप्रिल आरंभीं १,९५,-

३२,००० रु. दुष्काळफंडांत शिल्लक होते. या रकमेंतून वरील ८९,५८,००० रु. सरकारास आयत्या वेळीं पुढे करतां आले. सरकारने यापैकी फक्त ७३,००,००० रु. जेमतेम खर्च केले ही गोष्ट निराळी. दुष्काळफंडांतून बरीचशीं कामें होतात. दुष्काळफंड नसता तर प्रजेने दिलेला कर सरकारी नोकरांनीच खाऊन टाकला असता. मराठेशाहींत नोकरांकडून सर्व कामें करून घेण्याची वहिवाट नव्हती. म्हणून चालू राज्याला नोकरराज्य म्हणतात तें योग्यच आहे.

सरकारच्या कांही उत्पन्नाच्या बाबी लोकांनी विचार करण्यासारख्या आहेत. ऑफिशिअल असायनी नादारांतर्फे त्यांच्या सावकारांना हिस्सेरशीने कांही देण्याचें ठरवितो तेव्हा कित्येक रकमा सावकारांनी न नेल्यामुळे अखेरीस त्या सरकारजमा होतात. गेल्या सालीं या द्वाराने सरकारास ८,१२,००० रु. मिळाले. पोष्टांतल्या, कोर्टांतल्या वगैरे रकमा यांत मिळविल्या तर ही रक्कम किती तरी फुगेल. कोर्टांत पक्षकारांना देण्याकरता जमा झालेली रक्कम सरकारी खजिन्यांत असते. (या रकमांचा फायदा हिंदुस्थानसरकारास मिळतो.) तीवरील व्याज एकत्र केलें तर एक प्रचंड रक्कम होईल. अशा रकमा शिक्षणाच्या कामींच खर्चाव्या असा निर्बंध घालतां येण्यासारखा आहे. राज्यकारभारानंतर सर्वांत अधिक खर्च सरकार शिक्षणखात्यावर करतें. यंदाच्या अंदाजपत्रकांत दोन कोटी रुपये शिक्षणदानार्थ खर्च करण्याचा संकल्प सुटला आहे. याचा अर्थ शिक्षणाकरता माणशीं एक रुपया खर्च केला जातो. आपल्याकडे १ रु. तर ग्रेटब्रिटनमध्ये १ पौंड खर्च माणशीं शिक्षणानिमित्त खर्च करण्यांत येतो. १ पौंड म्हणजे १३ रुपयांहून अधिक हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. मुंबई सरकारचें बजेट १५ कोट रुपयांचेंच आहे. पण इंग्लंडचें बजेट ११०० कोट रुपयांचें आहे. लोकसंख्येच्या मानाने पाहतां मुंबई इलाख्याच्या दुप्पट ग्रेटब्रिटन आहे. तेव्हा

आमच्या इकडील मानाने तेथील अंदाजपत्रक ३० कोट रुपयांचें असावयास पाहिजे. तिसाच्या ऐवजी तीनशें नाही, अकराशें कोट रुपयांचें आहे. यावरून इंग्लंडच्या श्रीमंतीची कल्पना करतां येईल. आणि त्याचप्रमाणे आम्ही किती दरिद्री आहों हेंहि समजेल. इंग्लंडला स्वतःला श्रीमंत करून घेतां आलें, मग हिंदुस्तानला तसें कां करतां येऊं नये? १० रुपयांना पौंड या दराने सर्व हिंदुस्थानचें बजेट १३ कोटि पौंड होतें. तेरा कोट कोठे व ऐंशी कोट कोठे!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: निवर्षी
क्रमांक ९०२२ नों: दि: १५८८०

८७९५

REFBK-0005715

---